
# कौटुंबिक हितगुज



प्रा. वा. कोळी

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
क्र. १३६८

REFBK-0011512

# उद्‌बोधक पुस्तकें

१. **अिंद्रधनूचा पूल**— लेखिका — पिरोज आनंदकर. किंमत ४ रु. ट. ख. सह रु. ४—६४ न. पै.

२. **कौटुंबिक हितगुज**— लेखक— श्री. वा. काळे. किंमत— ३ रु. ट. ख. सह रु. ३—६४ न. पै.

३. **नव्या वाटा—नव्या दिशा**— ( डिसेंबर-मध्ये तयार होओील ). किंमत ५ रु.

४. **अुत्तम क्रिकेट कसें खेळाल ?**— लेखक— प्रो. दि. ब. देवधर. किंमत ४ रुपये. ट. ख. सह रु. ४—८७ न. पै.

५. **संपादकाचें जीवनस्वप्न**— लेखक— द्वा. भ. कर्णिक. किंमत ३ रु., ट. ख. सह रु. ३—८१ न. पै.

६. **लघुकथा कशा लिहाव्या ?**— लेखक— बा. कृ. गलगली. किं. २ रु., ट. ख. सह रु. २—६९ न. पै.

७. **टाकांच्या फेकी**— चित्रकार : श्री. शं. वा. किर्लोस्कर व भाष्यकार : प्रा. ना. सी. फडके. किंमत ५ रु., ट. ख. सह रु. ५—९४ न. पै.

८. **नव्या वाटा**— ( पुरुषपात्रविरहित नाटिका ) लेखिका—कै. सौ. आनंदीबाओी किर्लोस्कर. किं. रु. १—५० न. पै., ट. ख. सह रु. २—१९ न. पै.

९. **लेख कसे लिहावे ?**— लेखक—मो. प्र. फडके. किं. रु. २—५० न. पै. ट. ख. सह रु. ३—१९ न. पै.

१०. **मुद्रणकला**— लेखक—ग. पां. विजापुरे. किं. ३ रुपये, ट. ख. सह रु. ३—८१ न. पै.

**किर्लोस्कर प्रेस, स्वार गेट, पुणें २.**

३२९८० निबंध
४१५६२—१२५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३२९८० दि: १८/१/५८
क्रमांक १२५८ कॉ. क्र. २१२१५८

# कौटुंबिक हितगुज

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११५१२

लेखक

श्री. वा. काळे

REFBK-0011512

किर्लोस्कर प्रेस प्रकाशन

किंमत ३ रुपये

★ सर्व हक्क प्रकाशकांच्या स्वाधीन

★ नोव्हेंबर १९६१

★ प्रती २०००

★ मुद्रक व प्रकाशक :
मु. शं. किर्लोस्कर,
किर्लोस्कर प्रेस,
( प्रोप्रा.– किर्लोस्कर ब्रदर्स लि. )
स्वार गेट, पुणें २.

# हितगुज

श्री. श्रीपाद वामन काळे यांचें ' कौटुंबिक हितगुज ' हें पुस्तक वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला फार आनंद होत आहे.

' कौटुंबिक हितगुज ' या नांवानेच ' किर्लोस्कर ' मासिकांत गेलीं सात-आठ वर्षें श्री. काळे अेक वैशिष्टचपूर्ण सदर चालवीत होते, आणि या सदराला वाचकांमध्ये लोकप्रियताहि भरपूर लाभलेली होती. या सदरांत येणारें साहित्य संकलित करून पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यासंबंधी विविध थरांतील वाचकांकडून आम्हांस वारंवार सूचना येत होत्या. वाचकांच्या या आग्रहामुळेच आज आम्ही हें पुस्तक प्रसिद्ध करीत आहों.

' कौटुंबिक हितगुज ' या सदरांत प्रसिद्ध झालेलें श्री. काळे यांचें लेखन वाचकांना जसें आवडतें त्याचप्रमाणे ' किर्लोस्कर ' मासिकालाहि तें अत्यंत जवळचें वाटतें ही गोष्ट या ठिकाणीं नमूद करणें आम्हांस अगत्याचें वाटतें. आपल्या समाजांत सध्या जें संक्रमण चालू आहे त्यामुळे गांगरून न जातां नव्या परिस्थितीशीं अनुसंधान व सुसंवाद निर्माण करण्याबाबत प्रत्येक व्यक्तीने जागरूक, चोखंदळ व आशावादी राहावें, अशीच ' किर्लोस्कर ' मासिकांची प्रथमपासूनची भूमिका आहे. गेलीं चाळीस वर्षें याच भूमिकेचा प्रचार व पुरस्कार करणारें ललित अन् विचारप्रवर्तक साहित्य 'किर्लोस्कर'ने शेकडो लेखकांच्या व कलावंतांच्या सहकार्याने प्रसिद्ध केलें आहे. अशा या सुधारणावादी, आशावादी व बुद्धिवादी परंपरेंत मोलाची भर घालण्याचें काम श्री. श्रीपादराव काळे यांनी अत्यंत अभिनव पद्धतीने व मानसशास्त्रज्ञाच्या सफाअीने केलें आहे, याबद्दल त्यांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच होअील.

' कौटुंबिक हितगुज ' या सदरांत गेल्या सातआठ वर्षांत प्रसिद्ध झालेल्या स्फुटांपैकी अवघ्या २९ स्फुटांचा संग्रह प्रस्तुत पुस्तकांत करण्यांत आला आहे. हीं स्फुटें निवडतांना अेक विशिष्ट दृष्टि ठेवण्यांत आली आहे. ती,दृष्टि अशी, की संसारांत ज्यांनी नुकतेंच पदार्पण केलें आहे किंवा ज्यांचा संसाराचा अनुभव अद्यापि पांचदहा वर्षांपेक्षा अधिक मुदतीचा नाही, अशा स्त्रीपुरुषांना आपापलें जीवन सर्व दिशांनी बहरलेलें करतां यावें, असें साहित्य या पुस्तकांत अेकत्रित करण्यांत आलें आहे. या बहुमोल साहित्याचा अुपयोग आमचे महाराष्ट्रीय बंधुभगिनी योग्य प्रकारें करून घेतील असा विश्वास वाटतो.

— प्रकाशक

अनुक्रमणिका :

१. चालवावें हातीं धरूनिया . . . . . . . . . . . १
२. सोन्याच्या दागिन्यांतील तांब्याचा प्रभाव . . . ५
३. फुकट मिळतें म्हणून विकले जाऊं नका . . . . ९
४. कौशल्य सारें रचनेंत आहे . . . . . . . . . . . १४
५. मित्राच्या घरचें आगतस्वागत . . . . . . . . . १८
६. गृह-प्रपंचांत सहविचाराचें महत्त्व . . . . . . २२
७. नव्या राहणींतील पाहुणचार . . . . . . . . . २५
८. शिखरापर्यंत मोटर पोचत नाही . . . . . . . ३०
९. करूंया सारथी विवेकाला . . . . . . . . . . . ३४
१०. हळुवार हाताने कुसळ काढा ! . . . . . . . ३८
११. चढता आणि पडता काळ . . . . . . . . . . . ४२
१२. पैतीच्या अुत्कर्षाची घरची आघाडी . . . . . ४६
१३. गृहिणीचा वेळ वांचवा ! . . . . . . . . . . . ५०
१४. रफू करण्याची कला . . . . . . . . . . . . . ५४
१५. बिऱ्हाड, घर की नंदनवन ? . . . . . . . . ५८
१६. फुकाचें जीवन तरी पाजा ! . . . . . . . . . ६१
१७. घरोब्यांतील मित्रमंडळी . . . . . . . . . . . ६६
१८. जीव तडफडण्यापर्यंत कोंडमारा नको ! . . ६९
१९. सुखाचा आभास– दु:खाला कारण . . . . . ७३
२०. गृहिणीच्या नोकरीचा प्रपंच . . . . . . . . . ७६
२१. घरच्या गाड्यालाहि वंगण हवें ! . . . . ८१
२२. संभाषणाचा ओघ आटूं देऊं नका ! . . . . ८४
२३. बेकारीचा दुखणेकरी ! . . . . . . . . . . . ८९
२४. शोभेच्या स्वेटरचें रहस्य . . . . . . . . . . ९२
२५. शिंकें तुटलें आणि बोक्याचें फावलें ! . . . . . ९७
२६. नातलगांच्या बदलत्या भूमिका . . . . . . १०२
२७. आलेला डाव कसोशीने खेळायचा ! . . १०७
२८. पाळण्याच्या परीक्षेंत रीतीलाच महत्त्व . . ११२
२९. काटेरी कुंपणें भोवती नकोत ! . . . . . ११५

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 3290 वि: १०-८-५८
क्रमांक 2306 कौं वि: ग्र२१६
11592

# चालवावें हातीं धरूनिया!

शाळेंत व कॉलेजांत बरोबर शिकलेल्या आणि वाढलेल्या सुधा व विजय यांची अेकमेकाला पूर्ण माहिती झालेली होती. विजय पुढे अेंजिनिअर झाला आणि सुधाहि अेम्. अे. पर्यंत पोचली. त्या दोघांनी विवाहबद्ध होतेवेळीं आदर्श पति-पत्नी होण्याचा निश्चय केला. पहिलीं कांही वर्षे अगदी मजेंत गेलीं; पण विजयच्या गतीने व अपेक्षेप्रमाणे सुधाचा विकास होत राहिला नाही. यशस्वी अंजिनिअरच्या पत्नीची भूमिका तिला विजयच्या मनाजोगी सजवितां येअीना! दोघांच्या गतींत फरक पडून त्यांच्यामधील अंतर वाढूं लागलें; आणि तीं अेकमेकांस टाळूं लागलीं. दोघेंहि सुस्वभावी, संयमी, सुसंस्कृत असूनहि त्यांच्या विकासांत सुसंगति न राहिल्याने असा परिणाम घडून आला.

बरोबर निघालेल्या पति-पत्नींतहि असें अंतर पडूं लागतें; मग विवाहाच्या वेळींच पत्नी मागे असेल तर अंतर पडण्याचा जास्तच संभव आहे. वास्तविक, पति पत्नीला हातीं धरून चालला, तर असें घडण्याची शक्यता थोडी कमी होअील. परंतु पतीची अशी अपेक्षा असते, की पत्नीने आपोआप तरबेज व्हावें; त्यासाठी प्रयत्न करण्यास तो स्वतः सहसा तयार नसतो. पत्नीला दूषण दिल्याने किंवा अितर स्त्रियांच्या चातुर्याचें वर्णन तिला अैक-

वण्याने भागत नाही ! नव्या, विस्तार पावलेल्या क्षितिजांचा परिचय तिला करून द्यावा लागतो. वेगवेगळ्या ठिकाणीं तिला घेऊन जाऊन बदलत जाणाऱ्या जगाची माहिती तिला करून द्यावी लागते. तिला अेकदा आवाका आला, म्हणजे मग तीच आपोआप नव्या, चांगल्या गोष्टी तारतम्याने आत्मसात् करूं लागते. आपल्या व्यवसायांतील यशास सोन्याचा मुलामा चढावा, आपल्या लौकिकांत भर पडावी, राहणी अनुकूलतेप्रमाणे सुधारत जावी



**स्वत: मोटार चालवून शोभाताअींनी पतीला चकित केलें !**

अशी पतीची अिच्छा असेल तर त्याने आपण होअून त्यांत कर्ती भागीदार म्हणून पत्नीचें स्वागत केलें पाहिजे आणि तिच्या गुणांच्या विकासास सुंदर वळण लावलें पाहिजे.

पतीची प्रगति होत गेली, तरी तो कित्येक गोष्टींत मागे राहिलेला असतो. हुषार पत्नीला त्याच्यामधील अुणीवा मोठ्या चाणाक्षपणें भरून काढतां येतात. भागीदारींतील आपल्या कामाने त्याच्या यशास मोलाचा हातभार

ती लावूं शकते. पतीला योग्य प्रसंगीं आवश्यक त्या गोष्टीची आठवण करून देणें, त्याच्या पत्रव्यवहाराच्या बाबतींत त्याला मदत करणें, नातेवाअीक सांभाळणें, आळसामुळे राहिलेलें पतीचें काम आपण पुरें करून टाकणें, हिशेब लिहिणें, त्याचा गबाळेपणा गोडीगुलाबीने नाहीसा करणें, त्याची छाप पाडावी ह्या दृष्टीने मागे राहून प्रयत्न करणें, त्याच्या वरिष्ठांशीं व त्याच्या कुटुंबियांशीं आपुलकीचे संबंध राखणें, त्याला आवश्यक अशी माहिती आपण स्वतः गोळा करून पुरविणें, त्यासाठी वेळांत वेळ काढून वाचन करणें, त्याला जाणीव होअूं न देतां त्याचा तोल राखणें, अैपतीची सतत जाणीव ठेवून जबाबदारीने वागणें, ह्यांपैकी शक्य त्या प्रकारें कित्येक स्त्रिया आपल्या पतीच्या यशोमंडपास घिरा देअून झालरीने सजवीत आहेत.

तालुकागावचा अेखादा वकील मंत्री झाला, तर त्याच्या पत्नीलाहि मंत्र्याच्या पत्नीसारखें वावरतां यावें लागतें. ती मागासलेली राहिली, तर त्या मंत्र्याच्या घरचीं सूत्रें दुसऱ्या अेखादीच्या हातीं जावयाचीं ! अेका यशस्वी सर्जनच्या पत्नीने वयाच्या पस्तिशीनंतर हट्टाने नर्सिंगची परीक्षा दिली व ती पतीच्या दवाखान्यांत जाअूं लागली. तिच्या मदतीपेक्षा तिची 'देखरेख'च परिणामकारक ठरली. ह्या आततायीपणामुळे घराची व मुलांची आबाळ होअून पतीच्या व्यवसायाचेंहि खोबरें होण्याची पाळी आली ! पति व पत्नी ह्या दोघांनीहि अेकमेकांकडे संशयी वृत्तीने पाहणें त्यांच्या हिताचें कधीच होत नाही; खिलाडु वृत्तीस थोडा वाव मिळणें श्रेयस्कर असतें, हें थोड्या अवलोकनानंतर सहज पटण्याजोगें आहे.

पतीच्या व्यवसायाचें स्वरूप, त्याचा दर्जा, वृत्ति ह्यास अनुसरून त्याच्या पत्नीला आपण होअून कित्येक गोष्टी आत्मसात् कराव्या लागतील. अुदाहरणार्थ, कांही स्त्रिया जरुरीप्रमाणे नृत्य करूं लागतील, सौंदर्यप्रसाधनें वापरतील, अनोळखी लोकांशीं मनोरंजक रीतीने निरर्थक बोलायला शिकतील, गुप्त राखावयाच्या गोष्टींची वाच्यता करणार नाहीत, पतीच्या आवडीच्या खेळांत भाग घेतील, अेकट्याने प्रवास करतील किंवा स्वतंत्र बिऱ्हाडहि मांडतील ! पतीच्या व्यवसायाचें ज्ञान पत्नीने करून घेतलें व त्यांत गोडी दाखविली म्हणजे पतीलाहि तिच्याशीं बोलतांना आनंद वाटतो; त्याच्या

परिश्रमांची तिने योग्य प्रकारें जाणीव दाखविली म्हणजे त्याच्या अडचणी त्याला सुसह्य होतात. पतीच्या सामाजिक वर्तुळांत पत्नीला वाजवी स्थान मिळालें म्हणजे दोघांचेंहि सुख वृद्धिगत होत जातें.

प्राप्ति वाढत गेली म्हणजे पैशाचे व्यवहारहि वाढतात आणि पत्नीला ते पाहतां येणें अधिकाधिक जरुरीचें होत जातें. पति दोघांच्या नांवाने बँकेंत खातें अुघडतो, जोडनांवाने ठेवी ठेवतो, कॅश सर्टिफिकिटें घेतो, परंतु प्रत्यक्ष व्यवहार मात्र बहुधा तोच अेकटा करतो; पत्नी अज्ञानीच राहते. पत्नीच्या हातून सर्व गोष्टी करविण्याच्या बाबतींत आवश्यक तेवढी आस्था तो दाखवीत नाही.

आणि पत्नीलाहि फार चौकशी करतां येत नाही. केवळ तिच्या कपाटांत हे कागदपत्र ठेवल्याने भागत नाही. पत्नीलाच कित्येक वेळां त्यांत लक्ष घालण्याची अिच्छा नसते, ही गोष्ट वेगळी. कांही प्रसंगीं पत्नीच पुढाकार घेते. घरची मोटार पत्नीहि चालवूं शकली, तर पतीचीसुद्धा कितीतरी सोय होते हें आमच्या शोभाताअींच्या लक्षांत आलें. पण मोटार चालविण्यास त्यांना शिकविणें पतीला कांही जमेना. तेव्हा त्यांनी पतीच्या परोक्ष मैत्रिणीजवळ शिकून परवाना काढला आणि पतीला चकित करून सोडलें! कांही बाबतींत पतीने पत्नीला, तर कांही बाबतींत पत्नीने पतीला प्रोत्साहन देअून, सावरून घेअून, आपल्या बरोबर घेअून, पुढे चालावें. अशा रीतीने हात देण्यांतील व धरण्यांतील गोडी अनुभवल्याखेरीज कळणारच नाही. आंधळा आणि पांगळा हेसुद्धा सहकार्याने वाटचाल करूं शकतात; मग प्रगतिप्रिय अशा दूरदर्शी घट्ट्याकट्ट्यांना काय अशक्य आहे?

★ ★ ★

— २ —

# सोन्याच्या दागिन्यांतील तांब्याचा प्रभाव

शंभर नंबरी सोन्याचा दागिना केला तर तो टिकत नाही, त्याला झीज फार असते व त्याची कांति खुलत नाही. पण, सोन्यांत ठराविक प्रमाणांत तांबें घालून केलेला दागिना लवकर झिजत नाही, झिलई घेतो व चकचकीत राहतो. दागिना चांगला करण्याच्या प्रामाणिक हेतूनें, सोन्यांत तांब्याचें अिष्ट तेवढें मिश्रण करणें योग्यच ठरतें. सोन्याचें किंवा चांदीचें नाणें बनवितांनाहि त्यांत हीण धातु वापरावाच लागतो.

पति-पत्नीच्या संसारांतहि सदात्रिकाळ शंभर टक्के खरेपणाचा दुराग्रह हितकारक होत नाही. परिणामांचा विचार न करतां सत्य आणि सरळ दिसेल तें बेधडक बोलून टाकलें आणि कांहीकांही अप्रिय किंवा अप्रस्तुत बाबींवर झांकण घातलें नाही, तर संसाराला तडा पडून त्याचीं शकलें अुडणें अशक्य नसतें. सत्याचा गाभा सुटूं न देतां पण अप्रियहि न बोलतां, सात्त्विक समाधानाच्या निर्मितीसाठी बोलण्याला जरा मुरड घातली, थोडें वळण दिलें, तर संसाराची गोडी वाढते असा अनुभव आहे.

आनंदराव हा सिगरेटचा अतिशय षौकीन; पण त्याच्या पत्नीला त्याचें धूम्रपान मुळीच आवडत नाही. तिच्याविषयी प्रेम आणि सिगरेटचें आकर्षण ह्यांत तिच्या प्रेमाचाच विजय होतो आणि तिच्यादेखत तो मुळीच

घूम्रपान करीत नाही. पण पत्नी माहेरीं गेली किंवा तो स्वत: फिरतीवर गेला, म्हणजे मात्र त्याला मनमुराद सिगरेट ओढायला मिळते. त्याच्या पत्नीला त्याचा वास लागला तरी ती दर्शवीत नाही; तोहि आपण होऊन सांगत नाही.

अेकमेकांपासून दूर राहावें लागणाऱ्या पति-पत्नींनी संशयी वृत्ति न धरतां, अेकमेकाबद्दल विश्वास बाळगणेंच विवेकाचें असतें. विलायतेला गेलेला पति किंवा पत्नी तेथें संयमाने राहील, असेंच मागे राहणाऱ्या पत्नीस किंवा पतीस गृहीत धरावें लागतें. दूर गेलेल्या आपल्या माणसाच्या खुशाली-विषयीच विशेष काळजी व्यक्त केली जाते. पण त्याच्या वर्तनाविषयी मात्र बेफिकिरी किंवा बेसावधपणा दिसून येतो. आपला पति क्रिकेटचा सामना खेळायला जातो अशी सरलाबाअींची समजूत होती; वास्तविक तो जात असे रेस खेळायला. घरीं जप्ती-वॉरंट आल्यानंतर भ्रमाचा भोपळा फुटला. पतीच्या खेळांत त्यांनी थोडें लक्ष घातलें असतें, तर ही आपत्ति टळली असती.

कित्येक पति-पत्नी कांही गोष्टी निष्कारण अेकमेकाला सांगत बसतात आणि खाजवून खरूज काढतात. कितीतरीजणांना आपलीं विवाहपूर्व खरीं-खोटीं प्रकरणें तिखट-मीठ लावून सांगण्याची व मुद्दाम दुसऱ्याला डिवचण्याची खोडच असते. बहुधा त्यांत फारच थोडें तथ्य असतें; प्रौढीचा व बढाअीचाच भाग मोठा असतो. वास्तविक, विवाहानंतर पूर्वीच्या जीवनांतील, कित्येक गोष्टींवर कायमचा पडदा टाकण्यांत आला पाहिजे.

कित्येक पति आपल्या अुत्पन्नाची कल्पना पत्नीला येअूं देत नाहीत. वाढत्या घरखर्चाबद्दल पति पत्नीला दूषण देतो, पण स्वत:च्या पगारवाढीचा, भत्त्याचा आणि जादा कमाअीचा तिला थांगहि लागूं देत नाही ! अशा रीतीने ती अुत्पन्न-खर्चाच्या बाबतींत अंधारांत राहिली तर तिने घरखर्च फुगवून दाखविणें, बिलें देण्याचीं ठेवून देणें, कांही पैसे लपवून बाजूला काढणें, पतीला न कळत दुपारीं सिनेमाला जाणें, असे प्रकार संभवतात. दोघांनीहि खर्चाच्या बाबतींत आपापली मर्यादा सांभाळल्यानंतर अेकमेकांच्या प्रत्येक पैच्या खर्चाचा हिशेब हक्क म्हणून मागूं नये; पण आपला हिशेब मात्र आपण होअून देण्याची तयारी

दाखवावी. पति निघतेवेळीं त्याला मोजून पैसे देणारी व तो परत आल्यावर त्याच्या खर्चाची शहानिशा करणारी पत्नी पतीला खोटेपणा करायला लावीत असते. त्याचप्रमाणे, पत्नीच्या वाजवी लहानसहान खर्चासहि नकार देणारा पति तिला लबाडी करण्यास प्रवृत्त करीत असतो.

आमच्या राजाभाअूंची पत्नी नेहमी आजारी असते. त्यामुळे बहुतेक ठिकाणीं त्यांना अेकटेच जावें लागतें; सहकुटुंब जातां येत नाही. घरीं आल्यावर ते आपल्या पत्नीला सांगतात, "विमलाबाअी तुझ्या प्रकृतीची चौकशी करीत होत्या. वसंतरावहि म्हणत होते, की तूं फार दिवसांत त्यांना दिसली नाहीस." बहुधा, कोणीं कांही विचारपूस केलेली नसते! शरद आपल्या पत्नीच्या कानांवर तिच्या सासूबाअींच्या तक्रारी मुळीच जाअूं देत नाही. सासूबाअींनी चुकून कधी कौतुक केलें, तरी तें वेगवेगळ्या शब्दांत वारंवार तिला सांगतो. अशा चतुराअीचें अनुकरण केलें गेलें पाहिजे. पण घडतें मात्र विपरीत! परक्यांच्या बोलण्याच्या अनुरोधाने व तुलनेने, पति-पत्नी अेकमेकाला हाणून पाडण्याच्या अनुदार मोहाला बळी पडतात. त्यामुळे होणारी दुखापत थोड्याशा संयमाने सहज टाळतां येणें शक्य आहे.

कधीकधी कटु सत्य सांगावेंच लागतें. अशा वेळीं तें शर्करावगुंठित करून त्याच्या कटुतेवर आवरण घालतां आलें तर फार अुत्तम. अेखाद्या गोष्टीबद्दल मौन राखूनहि आपला विचार प्रभावीपणें व्यक्त करतां येतो, दुर्लक्ष करून नावड दाखवितां यते, भाषणाचा ओघ बदलून अप्रत्यक्ष रीतीने मत देतां येतें. सूचक स्तब्धता, दृष्टिक्षेप, अंगविक्षेप, खुणा, दिरंगाअी, मोघमपणा, टाळाटाळ अित्यादींचा ज्याला अर्थ कळतच नाही, त्याला मात्र अधिक स्पष्टपणें सांगणें भाग पडतें. त्याची खरडपट्टीसुद्धा काढावी लागते. पण साध्या औषधावर भागत असतांना शस्त्रक्रियेचा अवलंब करण्याची आवश्यकता नाही.

पति-पत्नीच्या नात्यांत कपटास मुळीच जागा नाही. दोघेहि मोकळ्या मनाचे, सरळ वृत्तीचे असायला हवेत; पण अुथळ मात्र नकोत. फार खुला कारभार आणि बोचक व अतिरेकी सत्यवक्तेपण सहसा हितकारक होत नाही.

मंगळसूत्र शुद्ध सोन्याचें गाठविण्याचा आग्रह धरणारांना सोनार समजावून सांगतो, की तें कांतिमान व टिकाऊ होण्यासाठी त्यांत दोन रती तांबें असूंद्या. पतिपत्नीच्या संसारांतहि असाच प्रमाणशीर मिलाफ साधायला हवा.

★ ★ ★

— ३ —

# फुकट मिळतें म्हणून विकले जाऊं नका !

"वाटेंत कुणी खाऊ द्यायला लागला तर घेऊं नये. अनोळखी माणूस सलगी करील, मोटारींतून घरीं पोचवतों म्हणेल; अशांशीं बोलूंसुद्धा नका !"— असा सावधगिरीचा सल्ला बालकांना आअीबाप नेहमी देत असतात. साहजिकच आहे. कारण, लहान मुलां-मुलींना भुलवून त्यांच्या अंगावरील दागिने लांबविल्याचीं व मुलींना पळवून नेल्याचीं अुदाहरणें कितीतरी घडतात. पण हींच मोठीं माणसें कधीकधी स्वत:च लालुचीला बळी पडतात आणि अखेर पस्तावतात ! कारण, फुकट किंवा स्वस्त मिळणाऱ्या गोष्टी अखेर महाग पडतात किंवा त्यांच्या किंमतीची अनेकपट भरपाअी अितर मार्गांनी करावी लागते. मिंधेपणा प्राप्त होअून अप्रतिष्ठा वांट्यास येते. अितकेंच काय, आयुष्याचें मातेरें होण्याची वेळ येते !

दुसऱ्याला अगदी नि:स्वार्थीपणानें मदत करणारे विरळाच आढळणार. कुटुंबांतील मंडळी किंवा आस्थेवाअीक मित्र सोडले, तर बाकी सर्वांच्याच वागण्याला स्वार्थाची बैठक बहुधा असते. प्रत्येकजण कमी-अधिक, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मोबदल्याची अपेक्षा बाळगून असतो, हें व्यवहाराला धरूनच आहे. आणि ही अपेक्षा पुरी पडली तरच त्यांचें समाधान होतें. आपला हेतु साध्य होण्यासाठी आपण अितरांशीं नीट वागतों, त्यांची सोय पाहतों नि त्यांच्यावर

प्रेम दाखवून त्यांच्या अडचणी निवारण करण्याचा प्रयत्न करतों. प्रत्येकच जण अशा रीतीनें अेकूण देवघेवींत फायदा अुरावा, अशा खटपटींत असतो. ही देवघेव अेकाच पातळीवर झाली तर ठीक. पण तसें घडलें नाही आणि अेकतर्फीपणा वाढला म्हणजे तिचे दुष्परिणाम जाणवूं लागतात.



शंभुरावांच्या घरीं रेडिओ आला ! पण...

रामभाअूंच्याजवळ सायकल नसल्याकारणाने ते कचेरींत पायींच जातयत असत. त्यांच्याच खात्यांतील अेका सायकलस्वार मित्राने रामभाअू वाटेंत भेटले की सायकलीवरून अुतरून त्यांच्याबरोबर चालत जाण्यास अेकाअेकीं प्रारंभ केला. अेकदोन वेळां त्याने वाटेंत चहाहि दिला. अेके दिवशीं संध्याकाळीं अशाच प्रकारें त्याने रामभाअूंना चहा पाजला व थोडयाच वेळाने त्यांच्या घरीं जाअून अुसने पैसे मागितले ! बेसावध असलेल्या रामभाअूंना त्याला नकार

क्रमांक 32920 दि: 17.9.9
9360
नों. दि:

देणें अवघड झालें आणि ते आपले पैसे गमावून बसले! दुसऱ्याचा धूर्तपणा पक्का जाणून, पण त्याची ओळख न दाखवितां, 'चोरावर मोर' होणारे चाणाक्ष लोक थोडेच असणार. सामान्य लोकांत रामभाऊंच्यासारखे बळी पडणारेच जास्त आढळणार. त्यांनी स्वत:ची फसवणूक होऊं नये अितपत तरी अवधान राखणें अिष्ट होअील.

शेजाऱ्याकडून वरचेवर उसनें आणणाराची सोय झाली तरी त्याची चाळींत किंवा वाड्यांत कुचेष्टा होते. लग्नघरीं आहेर न करतां मेजवानीस गेलों, तर जेवण बाहेर पडतें; पण त्याची नोंद झाल्याखेरीज राहात नाही. कोणाकडे कांही दिवस जाऊन अुतरलों, आणि त्याचा मोबदला कोणच्या तरी प्रकारें वेळींच पोचता झाला नाही तर त्याबद्दल निंदा चालू राहते. "आमची दिल्लीची ट्रिप फक्त ५० रुपयांत झाली!" असें विजयपूर्वक सांगणारांनी दिल्लीच्या आपल्या यजमानाकडे पुन:पुन्हा जाऊन अुतरून दाखवावें! श्रीमंत मामांच्या घरीं सिगरेट फुकट ओढायला मिळाल्या तरी स्वत:च्या घरीं आल्यावरहि धूम्रपानाची सवय चिकटून राहते. भाजी बाजारभावापेक्षा पाडून मागितली तर खोटें माप मिळतें किंवा किडका माल पदरांत पडतो.

दुसऱ्याच्या पैशाने व सोबतीने सिनेमाला जाणाराला अंधारांतून व गर्दींतून वाट काढतांना त्याच्या हातांत निमूटपणें हात घालावा लागतो; पाठ चोरतां येत नाही. जज्जसाहेबांनी देवदर्शनासाठी किंवा अक्षत देण्यासाठी अेखाद्या वकिलाची मोटार घेतली, तर त्याने मागितलेली मुदत किंवा तहकुबी द्यावी लागते; आणि असें अनेकदा घडलें तर कोर्टाच्या नि:पक्षपातीपणाबद्दल संशय व्यक्त करण्यांत येऊं लागतो. अशा रीतीने थोडेंसें फुकट मिळालें म्हणून तें चाटल्याने पोट तर भरत नाहीच, पण बाट मात्र लागून कमीपणा प्राप्त होतो; बोज राहात नाही. प्रत्यक्ष डाग लागलेल्याला त्या कलंकाची कधीकधी कल्पनाहि नसते!

आंतल्या गाठीचे, दीर्घसंधानी लोक अतिशय पुढच्या धोरणाने दुसऱ्याला मदत करतात; आणि त्या मदतीबद्दल मुद्दामच कोणत्याहि प्रकारें मोबदला तात्काळ पत्करीत नाहीत. मदत घेणारा सापळ्यांत आवळला जात असतो;

पण तें त्याच्या लक्षांतच येत नाही. किंवा त्याला फार अुशीरा अुमगतें आणि मग त्याचा कांहीच अुपयोग नसतो ! ह्यासाठी आधीपासूनच सावधगिरी बाळगलेली हितावह असते.

शंभुरावांच्या पत्नीने रेडिओसाठी हट्ट धरला; परंतु तो पुरविण्याला त्याच्याजवळ पैसे कुठे होते ? गुलाबला हें परस्पर समजलें आणि तो शंभुरावांच्या घरीं येअून म्हणाला, " माझे पैसे बँकेंत चालू खात्यावर पडून आहेत. मी तुम्हाला रक्कम देतों; तुम्ही ती तुमच्या सवडीनं, सावकाश परत करा ना ! " अशा रीतीने शंभुरावांच्या घरीं रेडिओ आला आणि गुलाबला हवा होता तो त्यांच्या माजघरापर्यंत प्रवेश मिळाला. शंभुरावांच्या पत्नीवर कालांतराने आजारीपण ओढवलें, तेव्हाहि गुलाबने पुढाकार घेअून 'वहिनीं'च्या औषधपाण्याकडे व तब्येतीकडे आपुलकीने लक्ष पुरविलें. वहिनी आजारांतून मुक्त झाल्या खऱ्या; पण त्या झोंबड्या ठकाच्या मुठींत मात्र कायमच्या अडकल्या ! शंभुरावांना फार अुशिरा अुमगलें, की ते घराची अब्रू वारेमाप गमावून बसले होते ! रेडिओवरील कर्णमधुर संगीत त्यांना आता कर्णकटु व मर्मभेदी झालें नाही तरच नवल ! दाम करी काम, बिबी करी सलाम !

स्वार्थासाठी दुसऱ्यावर अुपकार करणारांचा दुष्ट हेतु वेळींच ओळखून त्यांना अंतरावर ठेवलें नाही तर कोणत्या थरापर्यंत गोष्टी जाअूं शकतात हें वरील अुदाहरणावरून स्पष्ट होओील. गुलाबच्या तोडीचे कारस्थानी भामटे थोडेच असले तरी त्यांच्या जातीचे कमी-अधिक पटाअीत लोक आयुष्यांत नेहमी भेटतात आणि आपलीं जाळीं टाकीत असतांना दिसतात. गरजू आणि अनुभवी तसेंच सुखाला चटावलेलीं हावरीं माणसें भुलून त्यांत सापडतात.

दिसायला फुकट किंवा स्वस्त असलें की त्यांत कांहीतरी गोम असणारच, हें कळणाऱ्यांनाहि सारासार विचार पुष्कळदा अुरत नाही. त्यामुळे किरकोळ व तात्कालिक सोयीच्या किंवा सुखाच्या पायीं कधीकधी मोठें व कायमचें नुकसान होअूं शकतें. घेतलेले अुपकार अनेक पटींनी व अनेक प्रकारें फेडावेच लागतात ! स्वाभिमानी माणसाच्या अंगावरील वस्त्र तोकडें, जीर्ण व जुनें असलें तरी त्याची प्रतिष्ठा टिकून राहते. पण बोटचेप्याने मनलज्जा सोडून

परक्याकडून लांबरुंद, अुंची व सुंदर वस्त्रें नेसवून घेतलीं म्हणजे जनलज्जाहि सोडावी लागते आणि तें लेणें सावरणें कठीण जातें ! क्षुद्र लोभासाठी आणि चोचल्यांसाठी ती व्यक्ति विकली गेलेली असते; ऋणदास बनलेली असते ! सुसंस्कृत समाजांत तिला मान अुरत नाही; अुलट तिचा वीट व तिटकारा येतो !

★ ★ ★

-- ४ --

# कौशल्य सारें रचनेंत आहे!

प्रवासाला निघतांना आपण बॅगेंत जरुरीचें सामान भरूं लागतों. पण तें सर्व मावलें नाही म्हणजे कोणत्या जिनसा बरोबर घेतल्याच पाहिजेत आणि कोणत्या जिनसांवांचून चालवून घ्यावयाचें हें पुन्हा ठरवून त्याप्रमाणे कांही जिनसा काढून ठेवाव्या लागतात. कांही लोकांना बॅग भरण्याची युक्ति चांगली साधलेली असते व त्यांच्या बॅगेंत अितरांच्यापेक्षा जास्त सामान व्यवस्थितपणें मावतें.

आपल्या खर्चाचें बजेट अुत्पन्नांत कसें जमवायचें, त्यासाठी कोणत्या गरजांना प्राधान्य द्यावयाचें व कोणत्या खर्चाच्या बाबी टाळावयाच्या; आणि आवश्यक, जरुरीच्या व हौसेच्या गोष्टी अुत्पन्नांत कशा भागवावयाच्या ही अेक मोठी कलाच आहे. गरजा व सुखाच्या अपेक्षा अमर्याद असल्याकारणाने त्यांपैकी थोड्याच पार पडणें शक्य होतें; म्हणून आहे त्या मिळकतींत जास्तींत जास्त काय हस्तगत करतां येअील ह्याची चिकित्सा तारतम्याने करावी लागते.

'पैसे पुरत नाहीत; परवडत नाही,' अशी प्रत्येकजण तक्रार नेहमी करीत असतो. अशा परिस्थितींत साहजिक गरजांचा दूरदृष्टीने अनुक्रम लावण्याची पाळी येते. पण नेहमीच विवेकपूर्ण खर्च केला जातो असें नाही. अुसने

किंवा अुधार जिन्नस मिळूं शकतात म्हणून कित्येक लोक अैपत नसतांनासुद्धा अनावश्यक बाबींवरहि पैसे खर्च करीत असतात असें कधीकधी दिसून येतें.

ह्या सर्वाचा परिणाम असा होतो, की नेमक्या हितकारक बाबींची अुपासमार होते ! अपरिहार्य खर्च चुकत नाहीत आणि तात्कालिक सुखास किंवा मोहास बळी पडल्यामुळे होणाऱ्या खर्चाची त्यांत भर पडते ! खऱ्या-खुऱ्या अर्थानें जीवन समृद्ध करणाऱ्या कल्याणकारक गोष्टींवर खर्च करण्याच्या वेळीं तेवढी ओढघस्तीची जाणीव प्रकर्षानें होते आणि अपुऱ्या पैशाच्या सबबी पुढे येतात.

आपल्या अुत्पन्नाचा अधिकांत अधिक चांगला विनियोग करण्याचा दृष्टिकोन प्राप्त होण्याचा प्रश्न येथे महत्त्वाचा ठरतो. पैसे अपुरे पडत असतांनाहि कोणता खर्च पुढे ढकलून किंवा टाळून दुसऱ्या कोणत्या खर्चास वाव निर्माण करून द्यावयाचा, हें तारतम्याने ठरवावें लागतें. अुदाहरणार्थ, सिनेमावरील आपल्या खर्चाच्या बचतीमधून मुलांच्यासाठी अेखादें मासिक सुरू करतां येअील. हॉटेलांत स्वतः कमी वेळां चहा घेतला, तर घरीं येणारांचें स्वागत चहांच्या कपाने करणें शक्य होअील. दूरच्या नातलगाच्या विवाहासाठी मुलांबाळांना जबर भाडेंखर्च करून धाडल्यामुळे त्यांच्या वर्गाच्या शैक्षणिक सहलीच्या आड पैशांची कमतरता आली तर तें कसें चालेल ?

शरदला नोकरी लागल्यावर त्याने त्याच्या वर्गमित्रांना नोकरीच्या गावीं दोनचार दिवस गमतीखातर बोलावलें. त्या सर्वांच्या खानावळीचा खर्च अर्थातच शरदने केला. हा जास्त खर्च भरून काढण्यासाठी त्याने खाना-वळींत जरूर तेवढे खाडे अधूनमधून केले. मित्रांना ह्या काटकसरीचा त्याने पत्ताहि लागूं दिला नाही.

रामभाअू हे अेका प्राथमिक शाळेंत साधे शिक्षक आहेत. त्यांच्या पत्नीने कायम अंथरूण धरलेलें आहे व घरांत दुसरें कोणीहि माणूस नाही. जादा शिकवण्यांच्या पैशांतून त्यांनी पत्नीच्या मनरंजनासाठी रेडिओ विकत घेतलेला आहे. त्यामुळे तिला शेजाऱ्यांची आयती सोबतहि मिळते. अिकडे रामभाअू शाळेंत व शिकवण्यांना निश्चितपणें दिवसभर जाअून रोजगार करूं शकतात.

मुलांचे वाढदिवस साजरे करण्यांत किती मौज असते व मुलांना त्यापासून किती आनंद वाटतो! आमच्या शेजारच्या मनोहरांच्या घरीं सगळ्या मुलांचे वाढदिवस मोठ्या कौतुकाने व अुत्साहाने पाळतात व त्यासाठी दुय्यम महत्त्वाच्या सणांना फाटा देतात. मुलांच्या आवडीच्या किंवा त्यांना हव्या असलेल्या जिनसा त्यांच्या वाढदिवशीं आठवणीने रंगीत कागदांत व फितीने बांधून आणल्या म्हणजे दोन्ही साधतें.

महाबळेश्वरच्या 'हॉलिडे कँप' मध्ये गेल्या मे महिन्यांत मुंबअीमधील कांही कुटुंबें बरोबरीने येअून अेकत्रच राहिलीं होतीं. त्या सर्वांचें अेक 'सहल मंडळ' आहे. मंडळाचा प्रत्येक सभासद ठराविक वर्गणी दर महिन्याला चिटणिसाकडे देतो. हें मंडळ प्रतिवर्षी अुन्हाळ्याच्या सुट्टींत कोठेतरी सहलीला किंवा प्रवासाला जात असतें. त्याचा खर्च बारा महिन्यांवर विभागला गेल्या-कारणाने तो कोणालाच जाचक वाटत नाही आणि सहकार्यामुळे कार्यक्रम पद्धतशीरपणें पार पडतात.

दादासाहेबांनी आपल्या आवडीच्या पुस्तकांचा अेक छोटासा संग्रह केला आहे. विजयरावांनी आपल्या आअीला तीर्थयात्रा घडविल्या आहेत. जयवंतरावांनी आपल्या मुलाला मोठा मेकॅनो घेअून दिला आहे. लीलाताअींनी काश्मीरला जाण्यासाठी तयारी चालविली आहे. सुभाषने स्वतः घेतलेल्या फोटोंचा आल्बम् केला आहे. कुमुदने तिच्या कॉलेजांत टेबलटेनिस व बॅडमिंटन-मध्ये पारितोषिकें मिळविलीं आहेत. त्यामागोमाग तिला भिडू करून घेण्यासाठी मागण्या येअूं लागल्या आहेत!

अशा रीतीने कितीतरी घरांत आनंदाची, ज्ञानाची व अनुभवाची भर पडत आहे. ह्या सर्व गोष्टी शक्य झाल्या त्या काय त्यांच्याजवळ त्यासाठी पुरेसा पैसा होता म्हणून की काय? मुळीच नाही! स्वतःच्या जीवनांत रस निर्माण करण्यासाठी त्यांनी नेट धरला व अितरांनाहि जें शक्य झालें असतें तें स्वतः साध्य करून दाखविलें, अेवढेंच.

दिसण्यास लहान पण अतिशय अुपकारक अशा कित्येक वेचक गोष्टी प्राप्त करून घेणें सामान्यतः कोणाच्याहि अगदी आटोक्याबाहेर नसतें. अुऱ्या

प्राप्तीची रड कधीच थांबणार नाही. तेव्हा आहे त्या प्राप्तींत किती जास्त, खरेंखुरें हित सामावून घेतां येअील हें पाहिलें पाहिजे.

अेकाच पंचपाळ्यांतील तोच मीठमसाला अुपयोगांत आणणाऱ्या दोन जावांपैकी अेकीची आमटी सरस, अधिक चवदार होते. अेकाच खाणींतील दगड आणि अेकाच घाणींतील चुना वापरून बांधलेल्या, समोरासमोरच्या दोन घरांपैकी अेक घर स्वस्त, सुंदर व सोयींनी युक्त असें होतें; दुसरें होत नाही. त्याचप्रमाणे अेकाच पातळीच्या परिस्थितीमधील लोकांची तुलना केली, तर त्यांपैकी कांहींनाच चांगले संसार अुभारणें साधतें असें दिसून येअील. योजकावर सर्व कांही अवलंबून असतें. अुपलब्ध साधनसामग्रीच्या रचनेंत सारें कौशल्य आहे हेंच खरें.

* * *

-- ५ --

# मित्राच्या घरचें आगतस्वागत

" माझ्याकडे येणाऱ्या सर्व मित्रांना मी अगत्याने चहापाणी देतों, त्यांना आंतल्या खोलींत बसवितों; माझी पत्नीहि यांच्यासमवेत चहा घेते. तिला दुसरें काम असलें तरीसुद्धा तीच चहा आणून देते; त्यासाठी दोन मिनिटें तरी ती सवड काढते. पण माझ्या बहुतेक मित्रांच्या घरीं मला असा अनुभव सहसा येत नाही. चहा मिळाला तरी तो बहुधा बाहेरच्या बाहेरच ! सुशिक्षित व सुधारलेले म्हणविणारांना दुसऱ्याच्या घरीं जाऊन तेथील वातावरणाचा फायदा घ्यायला हवा; पण स्वत:च्या घरीं मात्र तो द्यायला नको ! " अशी तक्रार कित्येक वेळां अैकूं येते.

पंडितरावांचें अुदाहरण पाहा ना. ते स्वत: साहित्यप्रेमी, अिंग्रजी संस्कृतीचे चाहते. आपली पत्नी आपल्यासारखीच सुविद्य हवी, असा हट्ट धरून त्यांनी अेका विदुषीला आपल्याशीं विवाहबद्ध केलें. पण आता तिला घरच्या साहित्यिकाच्या सहवासाचाहि लाभ दुर्मिळ झाला आहे. त्यांच्या घरीं त्यांच्या मित्रांना व त्यांच्या पत्नींना गृहिणीच्या हातचा चहा मिळतो, पण तिचें दर्शनहि त्यांना सहजीं घडत नाही; त्यांच्या हास्यविनोदांत किंवा चर्चेंत ती सामील होण्याची मग गोष्टच कशाला ? अुलट अितर स्त्रियांची वाखाणणी तिला सैंपाकघरांत अैकूं आली नाही तर नशीब बिचारीचें !

आपल्याकडे येणाऱ्या मित्रांशीं आपल्या पत्नीचा परिचय करून देण्याची आवश्यकताच कित्येकांना वाटत नाही; तेव्हा त्यांच्याशीं बोलण्या-चालण्याला तिला संधि मिळण्याचा प्रश्नच अुपस्थित होत नाही. पत्नीच्या मैत्रिणीहि केवळ तिच्याच मैत्रिणी म्हणून येतात-जातात; त्यांनाहि तिच्या पतीची ओळख घडूं शकत नाही. वास्तविक, पति आणि पत्नी ह्यांचे सवते सुभे घरांतहि कायम राखण्याचे दिवस आता अुरलेले नाहीत. दोघांनाहि शक्य व अिष्ट त्या सर्व प्रसंगीं जोडीनें वावरणें आवश्यक असतें. घरीं येणाऱ्या सर्व स्त्री-पुरुषांचा



**मित्रांशीं पत्नीचा परिचय करून देणें कित्येकांना जरूर वाटत नाही.**

पति व पत्नी ह्या दोघांशींहि दृढ परिचय व्हावा असें म्हणणें मात्र चुकीचें होईल; त्यांपैकी कांहींना अधिक जवळ करणें किंवा कांहींना दूर राखणें हें क्रमप्राप्तच असतें.

कांही पुरुष स्वत:च्या पत्नीला बंदोबस्तांत राखूं पाहतात, परंतु दुसऱ्याच्या पत्नीला ते त्याच्याकडे गेले असतांना सैपाकहि धड करूं देत नाहीत, गप्पा-गोष्टींसाठी तिष्ठत ठेवतात असें आढळतें. पण कधीकधी पतीच्या मित्रांना

पत्नीच स्वत: टाळूं अिच्छिते हेंहि खरें आहे. ती अशी कां चुकविते, त्यांत तिची चूक आहे का आपली आहे, अितरांच्या व आपल्या वागण्यांत काय फरक आहे अित्यादि गोष्टींची छाननी केली तर ती बोधप्रद होअील.

पतीकडे येणारा मित्र केवळ पतीलाच हवासा वाटून अुपयोगी नाही; त्याच्या पत्नीलाहि त्याचें येणें आनंददायक झालें पाहिजे. तसें झालें नाही तरीसुद्धा ती त्याच्यासाठी कर्तव्य म्हणून, निदान पतीची आज्ञा म्हणून तरी चहा-सरबतहि करून देअील; पण मनापासून मात्र नव्हे! पतीकडे येणाऱ्या त्याच्या मित्राची योग्यता चाणाक्ष पत्नी ओळखूं शकते. भलत्याला भलत्या वेळीं चहा करून देण्यास ती सहजासहजीं वरचेवर कशी तत्परता दाखविणार? पतीचे कांही मित्र त्याचें नुकसान करीत आहेत अशी तिची समजूत झाली तर तिच्या हातून तरी त्यांचा पाहुणचार नीट कसा होणार? लहरी किंवा बेपर्वाअी पत्नीचा विचार येथें अर्थातच केलेला नाही.

मित्रमंडळी व त्यांच्या पत्नी ह्या सर्व अेकाच संस्कृतीच्या, समान पातळीच्या आहेत, असें गृहीत धरलें तरीसुद्धा प्रत्येकाच्या घराच्या स्वागतांत फरक पडतो. अुदाहरणार्थ, विजयच्या घरीं मित्रमंडळी अगत्य दाखवून वरचेवर येतात; परंतु तो व त्याची पत्नी ह्यांना ह्या मित्रांच्या घरीं जाण्यास अुत्साह वाटत नाही. मेजवानीच्या वेळीं कांहींना टोमॅटोची कोशिंबीर जास्त वाढली जाते, निवडक ताजीं भजीं त्यांच्या पानांत आणून घातलीं जातात, अितरांपेक्षा जास्ती आग्रह केला जातो किंवा त्याच्या अिच्छेला मान देऊन आग्रह मुळीच केला जात नाही, हें पुष्कळांच्या परिचयाचें असेल. कांहींना वाढतांना गृहिणी विशेष दक्षता घेते, त्यांच्या आवडीनिवडी लक्षांत ठेवते, वाढतांवाढतां कुशल विचारते; तर कांहींचा समाचार वेगळ्याच प्रकारें घेतला जातो! ह्याचीं जीं कांही कारणें असतील तींच कारणें अेखाद्याला त्याच्या मित्राच्या घरीं आपुलकीची वागवणूक मिळण्याची किंवा न मिळण्याचीं असूं शकतील.

ज्याच्या घरीं आपण जातों, त्या घरच्या गृहिणीच्या मनांत आपलें नीट स्वागत करावेंसें असलें तरच तें तसें होअूं शकतें; ती मनापासून चहा करते आणि चहाबरोबर अेखादा ताजा जिन्नसहि खायला देते. पतीनें तिला सूचना देण्याची आवश्यकताच नसते. पति घरीं नसला तरीसुद्धा, "माझा दुसरा

चहा अजून व्हावयाचाच आहे; मलाच चहाला सोबत हवी आहे," असें म्हणून ती अगत्य दर्शविते. ज्याच्या घरीं जावयाचें, त्याच्या गृहिणीच्या वृत्तीवर व भावनेवर सर्व कांही अवलंबून राहतें. म्हणूनच ज्या मित्रांच्याविषयी तिला आदर असेल, त्यांनाच तिच्या हातून आपुलकीने चहापाणी होओील व जेवणानंतर मागूनचें आवरण्याची सबब न सांगतां ती त्यांच्याबरोबर गप्पागोष्टी करण्यासाठी विडा-सुपारी घेअून येणार. हा आदर व ही सद्भावना निर्माण करण्याचें व जपण्याचें ज्याला जमणार नाही त्याला मित्राच्या घरीं प्रेमळपणाचा अनुभव कधीच येणार नाही.

पुरुषांच्या बोलण्या-चालण्यांतील सूक्ष्म भेद स्त्रिया जाणूं शकतात. मूळ सत्प्रवृत्तीला हुषारी, तरतरी, विनोदबुद्धि, व्यवहारज्ञान, घरांतील मतभेदांचा फायदा न घेण्याचा नि:स्वार्थीपणा, पाय केव्हा काढला पाहिजे ह्याचें तारतम्य, अित्यादींची जोड असलेले पति-मित्रच तिला घरीं वरचेवर यावेसे वाटतात. अवेळीं येअून तिच्या अुपस्थितीची अपेक्षा बाळगणाऱ्या मित्राकडे तिचें दुर्लक्ष होणें स्वाभाविक आहे, हें त्याला ओळखतां आलें पाहिजे.

ह्या बाबतींत सर्वांकडून नेहमीच तारतम्य व औचित्य राखलें जाओील असें सांगतां येणार नाही; परंतु त्यावर अुपाय मात्र आपल्या पत्नीला चुलीपाशीच ठेवून आपण दुसऱ्याच्या चुलीपर्यंत जाणें हा नव्हे. "मला सिनेमाला यायला सवड नाही; पण माझ्या मिसेसला तुम्ही जरूर घेअून जा," असें म्हणून दुसऱ्याच्या सौजन्याचा फायदा घेअून त्यांना अडगळ करावयाची आणि आपण स्वत: मात्र चोरगस्तीने अितरत्र रमावयाचें, अशा नियतीच्या लोकांचा तर जास्तच तिटकारा वाटतो. ज्यांना आपल्या पत्नीला, तिची तयारी असतांनाहि सहजीवनाचा आनंद मिळवून देण्यासाठी स्वत: प्रयत्न व थोडासा त्याग करायला नको असेल, त्यांनी निदान तिला कमीपणा तरी येअूं देअूं नये. मित्र व त्यांच्या पत्नी ह्यांच्या वर्तुळांत तिला वगळून अेकट्यानेच रमण्याचें टाळावें. घरांत सोवळें व बाहेर ओवळें अशा दुटप्पी जीवनाच्या विसंगतीमागील स्वार्थ व ढोंग न कळण्याअितपत अशिक्षित स्त्रियासुद्धा अडाणी राहिलेल्या नाहीत.

★ ★ ★

-- ६ --

# गृह-प्रपंचांत सहविचाराचें महत्त्व

कौटुंविक अर्थकारणाचा विचार केला, तर सामान्यतः पति हा पैसे मिळवितो आणि पत्नी ही घर चालविते असें दिसून येतें. ह्याचा अर्थ पतीचा दर्जा श्रेष्ठ असतो असें मात्र मानतां कामा नये. पत्नीचें घरकाम विचारांत घेतलें आणि त्या कामासाठी पगारी माणसें नेमणें किती खर्चाचें होईल ह्याचा हिशेब केला म्हणजे पतीला बढाओ मारण्याचें कारण अुरणार नाही. कित्येक सुसंस्कृत व सुशिक्षित कुटुंबांतून पत्नीला तिचा वाजवी दर्जा आता मिळूं लागला आहे हें योग्यच आहे.

कांही लोक आपल्याच हातांत पैशाचीं सर्व सूत्रें ठेवतात. पत्नीला दळणासाठी किंवा साध्या काचेच्या बांगडयांसाठीसुद्धा पतीकडून दोन पैसे मागून घ्यावे लागतात. मिळवत्या पत्नीलाहि अशाच रीतीने वागविणारे कांही घरबसे पुरुष आढळतात. स्त्रियांना पैशाचे व्यवहार कळत नाहीत अशी त्यांची समजूत असते. ही समजूत कशी चुकीची असते हें सिद्ध करून दाखविण्यास बिचाऱ्या पत्नीला संधीच मिळत नाही. वास्तविक पाहतां कांही स्त्रिया पुरुषांच्यापेक्षा जास्त व्यवहारकुशल असतात. पण त्यांना वाव मिळेल तर ना ?

कौटुंबिक मिळकतीचा विनियोग कसा करावयाचा हा खरोखर पतीने व पत्नीने सहविचाराने ठरविण्याचा प्रश्न आहे. कित्येक स्त्रियांना त्यांच्या

पतीच्या आर्थिक परिस्थितीची व प्राप्तीची कांहीच कल्पना नसते. पति स्वत:वर मुबलक खर्च करतो. मोटरगाडी, सिगरेट, चहा, सिनेमा, पत्ते, अिस्त्रीचे कपडे, विदेशी महाग खेळ अित्यादि बाबींवरील त्याचा खर्च पाहिला म्हणजे पत्नीने अेखाद्या पर्सची किंवा लायब्ररी सुरू करण्याची अिच्छा व्यक्त केली तर तें चुकीचें नसतें. परंतु घरच्या खर्चाच्या वांटणींत पत्नीला योग्य तें स्थान दिलें जात नाही असेंच कित्येक ठिकाणीं आढळतें. पुरुष आपल्या खर्चाचा तपशील देण्यास व त्या खर्चाच्या अिष्टतेची चर्चा करण्यास तयार नसतात आणि स्त्रियाहि त्याची अपेक्षा करण्याचें सोडून देतात.

माधवची पद्धत अशी आहे, की तो त्याच्या पगारापैकी घरखर्चाची रक्कम पत्नीच्या स्वाधीन करतो. त्या रकमेंत ताराबाअींनी सर्व खर्च भागवावा. पुढच्या महिन्याचा पगार होअीपर्यंत त्यांना जास्त पैसे साधारणत: मिळावयाचे नाहीत आणि त्यांच्या खर्चांत माधव हस्तक्षेपहि करणार नाही. अर्थात् घरखर्चासाठी दिलेली रक्कम अपुरीच पडते व महिनाअखेरीच्या वेळीं तर ताराबाअींची फारच ओढाताण होते. तथापि, माधवच्या खर्चाची वृथा चौकशी ताराबाअी करीत नाहीत. अशा परिस्थितींतहि त्या थोडेथोडे पैसे बाजूस काढून ठेवतात आणि अडचणीच्या वेळीं ते पुढें करून माधवची शाबासकी मिळवितात.

वसंत आणि शांता ह्यांच्या संसारांत दोघांनाहि सारखेच अधिकार आहेत. त्यांची सर्व प्राप्ति तीं अेकाच डब्यांत ठेवतात व त्यांतून जरुरीप्रमाणें आधी योजलेल्या अनुक्रमाप्रमाणे खर्च करतात. डब्यामध्येच हिशेबाची वही ठेवलेली असते; तीमध्ये ज्याचा तो खर्च लिहितो. रात्रीं जेवण झाल्यावर खर्चाचा आढावा घेतला जातो. त्यामुळे दोघांनाहि अेकमेकांचें दैनंदिन आयुष्य नीटपणें समजतें. अवास्तव खर्चाचा वसंतला अेखाद्या वेळीं मोह झाला तर त्यास साहजिकच हितकारक आळा बसतो. तथापि, कधीकधी शांता आपण होअूनच वसंतला थोडी चैन करावयास सांगते. तिचा काटकसरीपणा वसंतला समजून येतो आणि त्या दोघांनाहि अेकमेकांबद्दल अभिमान वाटूं लागतो. "आपल्या दोघांचा खर्च बजेटांत बसणार नाही; तेव्हा तूंच माथेरानच्या ट्रिपला जा," असें पत्नीला आग्रहाने सांगणारा पति आणि "माझं पोलकं

अजून चांगलं आहे, तेव्हा तूंच गरम कोट शीव," असें सांगणारी पत्नी अेकमेकांस सुखी कां करणार नाहीत ? अेकमेकांच्या काटकसरीची व त्यागाची प्रशंसा करीत तीं दोघेंहि आज गरिबींतसुद्धा मोठ्या समाधानाने संसार करीत आहेत. शेजाऱ्यांना त्यांचा हेवा न वाटला तरच आश्चर्य.

पतीने आपली वाअीट आर्थिक परिस्थिति अत्यंत अुदात्त हेतूने का होअीना, पत्नीपासून लपवून ठेवून कुटुंबियांची दिशाभूल केली तरी त्याचे दुष्परिणाम त्यांना दीर्घ काळ भोगावे लागतात. पतिनिधनानंतर कांही तासांच्या आंतच सुखवस्तु समजल्या गेलेल्या अेका स्त्रीला घरची चीजवस्तु विकण्याची पाळी येअून मुलांबाळांसह अनाथालयाचा आश्रय घ्यावा लागला. पतीने तिला योग्य वेळीं योग्य कल्पना दिली असती, तर ती जास्त सावध राहूं शकली असती. पतीचे आर्थिक व्यवहार पत्नीला माहीत नसले म्हणजे त्याची मोठी अिस्टेट असली तरीसुद्धा ती पत्नीच्या हातीं येणें अवघड होअून बसतें.

हें सर्व टाळतां येणें शक्य आहे. कौटुंबिक आर्थिक व्यवहारांत पत्नीला योग्य तें स्थान दिलें तर तिचा चेहरा अधिक तेजस्वी होअील; घरांत आपण कोणी आहोंत ह्या जाणिवेने तिची प्रफुल्लता वाढेल; पतीची जबाबदारी हलकी होअील व संसारहि नेटका होअील. पत्नीला अडाणी ठेवून पतीने जानव्याला तिजोरीची किल्ली लावून हिंडण्याचे दिवस आता संपले आहेत.

★ ★ ★

-- ७ --

# नव्या राहणींतील पाहुणचार

माझा मित्र वसंत व त्याची पत्नी सुमित्रा ह्यांनी आम्हां अुभयतांना त्यांच्याकडे कांही दिवस राहावयास बोलावलें. त्यांनी मोठ्या आस्थेने निमंत्रणाचें पत्र पाठवलें, त्यांत आम्हीं त्यांच्याकडे किती दिवस राहावें अशी त्यांची अपेक्षा आहे हेंहि सूचित केलें होतें आणि त्यांच्या सोयीच्या तारखाहि कळविल्या होत्या. त्यांच्या व आमच्या सोयीच्या तारखा जुळल्यानंतर आम्ही कोणत्या गाडीने सकाळीं पोचणार हें आगाअू कळवून निघालों. आम्ही केव्हा परतणार हेंहि त्यांत लिहून ठेवलें होतें. स्टेशनवर अुतरून घेण्यासाठी सुमित्रा आली होती. "वसंताला थोडं काम अचानक निघाल्यामुळं तो येअू शकला नाही; पण आपण घरीं पोचेपर्यंत तो घरीं आलेला असेल," असा तिने खुलासा केला. वसंत दरवाजांत आमची वाटच पाहात होता. "तूं ह्यांना वर घेअून जा, सामानाची व्यवस्था मी करतों," असें वसंताने सुमीला सांगितलें. "प्रवास कसा काय झाला, गाडींत गर्दी कितपत होती, निजायला जागा मिळाली की नाही ?" अित्यादि प्रश्नोत्तरें संपण्याच्या आंतच चहा आला. चहापानानंतर आम्हांला कपडे ठेवण्याची जागा, हातपाय-तोंड वगैरे धुण्याची व्यवस्था अित्यादि दाखविण्यांत आलें. आम्हीं दोघांनी आमच्या बॅगा व बेडिंग अुघडून जरुरीचें सामान बाहेर काढलें आणि आमचे प्रातर्विधि आटोपले तोंवर अिकडे न्याहारीची तयारी झाली. गप्पा मारीतमारीत आमची न्याहारी तब्बल तासभर चालली होती.

न्याहारी संपल्यावर आमचा तीन दिवसांचा कार्यक्रम त्या दोघांनी मिळून कसा आखला आहे व तो कसा लवचिक आहे तें त्यांनी सांगितलें आणि त्यांत कांही दुरुस्ती, सुधारणा हवी आहे का, असें विचारलें. "तुम्हाला अिथं कुणाला भेटायचं आहे का ? असलं तर त्यांनाच चहाला किंवा जेवायला बोलावूं म्हणजे झालं–" असेंहि त्यांनी सुचविलें. कार्यक्रमांतील कांही बाबी सर्वांच्यासाठी होत्या, तर कांही फक्त पुरुषांच्या, तर कांही फक्त स्त्रियांच्यासाठी होत्या.



"...त्यांनाच चहाला किंवा जेवायला बोलावूं म्हणजे झालं !"

अशा रीतीने मोठ्या आपुलकीने व पद्धतशीरपणें आमच्या पाहुणचारास प्रारंभ झाला. आमचे तीन दिवस अगदी मजेंत गेले. परत जातांना खरोखरच पाऊल बाहेर निघेना. आम्हांला गाडींत बसवून देण्यासाठी तीं दोघेंहि आलीं होतीं, तेव्हा आम्हीं त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. त्यावर अुलट त्यांनीच आम्हीं त्यांच्यासाठी सवड काढल्याबद्दल आनंद व्यक्त केला आणि पुन्हा

येण्याचें आमंत्रण आम्हांला देऊन ठेवलें. पाहुणचाराचा अितका चांगला अनुभव क्वचितच येतो.

पाहुण्यांचे तीन वर्ग करतां येतील :–(१) आपण आपल्या घरीं कांहीं दिवस राहावयास बोलाविलेला; (२) स्वत:च्या प्रेरणेने प्रसंगविशेषीं आपल्या घरीं राहावयास आलेला पण आपल्याला प्रिय असलेला; आणि (३) स्वत:च्या सोयीने व स्वत:च्या हितासाठी राहावयास आलेला, यजमानाच्या हालहवालावद्दल बेफिकीर असणारा, अनाहूत अतिथि. ह्यांपैकी बोलाविलेला पाहुणा आणि आपल्याला हवा असलेला परंतु बोलवावयाची वाट न पाहतां आलेला पाहुणा ह्यांच्यांत फरक करण्याची आवश्यकता वाटणार नाही. आपल्यावर पाहुणेपण लादणाऱ्या तिसऱ्या वर्गाच्या पाहुण्याचाहि पाहुणचार करावा लागतो. पण तो केवळ गृहस्थधर्म म्हणून. अशा पाहुण्याला जरा कमी प्रतीची वागवणूक मिळणें क्रमप्राप्त आहे. तरीसुद्धा त्याच्या वर्तनाच्या मानाने त्याचा होणारा पाहुणचार बहुधा कितीतरी चांगला असतो, त्याचें सर्व श्रेय यजमानाच्या सभ्यपणालाच दिलें पाहिजे.

नकोशा पाहुण्यांच्या वर्दळीमुळे प्रिय व हव्याशा पाहुण्याचाहि पाहुणचार, मनांत असूनसुद्धा, पाहिजे तसा आपल्या हातून होत नाही. कुत्रीं डसतात किंवा आवडत नाहीत म्हणून त्यांना नेहमी हडहड करणाऱ्यांना चांगल्या, पाळीव कुत्र्याला कसें कुरवाळायचें हें समजतच नाही! तसेंच कांहीसें येथें घडतें. ह्या बाबतींत सुधारणेची दिशा कळली तर स्वत:ला विशेष तोशीस न लागतांहि पाहुण्याला जास्त सुखी करतां येअील. त्याचप्रमाणे त्याची अप्रियता कमी होअू शकेल.

पाहुण्याला तुम्ही खायला-प्यायला किती देतां ह्यापेक्षा त्याच्याविषयी तुमची आपुलकी किती आहे व ती कशी व्यक्त करतां ह्यावर सर्व कांही अवलंबून राहतें. पाहुण्याचें अुंबरठ्यापासूनच स्वागत चांगलें झालें, अधूनमधून त्याची विचारपूस केली, त्याच्या कामाच्या तपशिलांत खोलवर न शिरतां मदत मात्र देअू केली, तर त्याच्या पाहुणचारांत झालेल्या कित्येक चुका खपून जातात. ‘कुभोजनं चोष्णतया विराजते’ हा अनुभव येथेहि लागू पडतो. पाहुण्याच्या किरकोळ आवडी-निवडी व पथ्यें-अपथ्यें लक्षांत ठेवून

त्याप्रमाणे जिन्नस केले तर चांगलें वातावरण अनायासें निर्माण होतें. "मी गोड खात नाही, मागच्या वेळेलाहि मीं शिकरण खाल्ली नव्हती," असें जेवणारांनी सांगण्याची पाळी पाहुण्यावर न आलेली बरी. ह्याउलट, पाहुण्यांच्या खास आवडीचें पळीवाढें पिठलें, मुगाच्या डाळीची खिचडी किंवा लसणाची चटणी त्याला कितीतरी संतुष्ट करील. पाहुणा लवकर उठणारा असेल तर त्याच्यासाठी चहाची तयारी करून ठेवली म्हणजे तो खुषीने स्वतःचा चहा करून घेतो.

पाहुण्याला वापरण्यासाठी द्यावयाच्या जिनसा चांगल्या स्थितींत आहेत ना, हें अगोदर पाहून ठेवलेलें असलें म्हणजे बरें. आरसा चकचकीत नसेल तर कुंकू किंवा लिपस्टिक लावायला अथवा दाढी करायला त्यांत नीट कसें दिसणार? टेबलावर मासिकें, वृत्तपत्रें, कागद-पेन्सिल, दौत-टाक, आगगाडीचें व बसचें वेळापत्रक हीं जरूर असावींत. दिवा भरपूर अुजेड देणारा आणि अुशी आराम देणारी असणें आवश्यक आहे.

शहरांतील राहणींत घरच्या प्रत्येकाची, नोकरा-चाकराचीसुद्धा वेळ बांधलेली असते. त्या प्रत्येकाला ठराविक वेळीं कामें व अुद्योग असतात. त्यांत व्यत्यय येअूं न देतां पाहुणचार करावा लागतो. यजमानाच्या पूर्वयोजनेचें व पूर्वतयारीचें चीज झालें, पाहुण्याने जाण दाखविली तर ठीकच; नाहीतर यजमानानेच पुढाकार घेअून, पाहुण्याचें मार्गदर्शन करून, त्याला आपल्या घरांतील पद्धतींत रुळवावें हें बरें. "आता अिथं थंडी पडूं लागली आहे, तेव्हा येतांना भरपूर पांघरूण आणा," "आठ वाजतां पाणी जातं, स्नान करून घ्या," "रात्रीं साडे-सातला जेवण तयार होअील, तेव्हा आठपर्यंत जरी आलां तरी चालेल," "अंथरूण थोडं गुंडाळून ठेवतां का?" अशा तऱ्हेच्या सूचना यजमानाने पाहुण्याला, तारतम्य राखून, युक्तिकौशल्याने देण्यास कांहीच हरकत नाही. कांहीकांही पाहुण्यांना अधिक स्पष्टपणें सांगितल्याखेरीज कळणारच नाही, तर अेखाद्या खाष्ट किंवा कोडगेल्या पाहुण्याला कारणपरत्वें सुनाविणेंसुद्धा श्रेयस्कर ठरेल. अितकें करूनहि पाहुण्यांच्यामुळे कांही न्यूनाधिक्य होणारच. त्या वेळीं तोल सांभाळतां आला पाहिजे. कारण अेखाद्याच शब्दामुळे किंवा चर्येवरील विकारामुळे आधीच्या सर्व पाहुणचारावर पाणी पडतें.

जागा, वेळ, ऐपत व मनुष्यबळ ह्यांची अनुकूलता असली म्हणजे पाहुणचाराचें ओझें वाटण्याचें कारण नसतें. परंतु ह्या सर्वांचीच उणीव तीव्रतेने भासत असणाऱ्या शहरांतील बहुसंख्य सांसारिकांनाहि आताच्या परिस्थितीनुसार सुटसुटीत पाहुणचार करतां येणें अगदी शक्य आहे. आस्था व अगत्य ह्यांना आखणीची थोडी जोड दिली आणि भिडस्तपणा मर्यादेंत राखून खेळाडू वृत्ति ठेवली– थोडक्यांत म्हणजे नव्या टापटिपीच्या राहणीशीं पाहुणचाराची रीति जुळती करून घेतली म्हणजे झालें.

* * *

-- ८ --

# शिखरापर्यंत मोटर पोचत नाही !

लंडनमधील अेका हॉटेलांत नोकरी करणाऱ्या जेनेट हिक्स नांवाच्या मुलीने मेमिनसिंगच्या महाराजांशीं विवाह केला आणि ती महाराणी बनून कलकत्ता येथे आली. पण तिने आता लंडनला परत जाअून घुलअीच्या यंत्रांच्या दुकानांत नोकरी पत्करली आहे. "कलकत्यामधील अषआराम, मेजवान्या आणि आळशी जीवन ह्यांचा मला वीट आला. श्रम करून चरितार्थ चालविण्यांत मला अधिक समाधान वाटतं." असें ती म्हणते.

पुण्यांतील अेका धनाढ्य सरदाराच्या कुटुंबांत जन्मलेल्या प्रमिलेने श्रीमंतीला कंटाळून जाअून धुणीं धुण्यांत व भांडीं घासण्यांत आनंद मानला. विवाहापूर्वी ती घोडागाडींतून शाळेंत जायची, तेव्हा तिचें दप्तर वाहण्यासाठी पाठीमागे हुजऱ्या अुभा असायचा. कॉलेजांत तिला न्यायला आणायला मोटर असायची. आता तीच प्रमिला आपल्या मुलामुलींना स्वत: सायकलवरून शाळेंत नेते व आणते, दुपारीं मॉंटेसरी शाळा चालविते आणि तळमजल्यावरच्या दोन छोटया खोल्यांच्या बिऱ्हाडांतील सदानंदाची ही हृदयेश्वरी हसत-खेळत संसार करते. हातपाय हलविण्यांतला आणि श्रमिकांशीं सहजीवनाचा निर्भेळ आनंद तिला हवा होता; श्रीमंतीच्या गाद्यागिरद्या तिला खुपत होत्या.

काबाडकष्ट करणाऱ्यांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोंत, असें श्रम न पडणाऱ्या बहुतेक लोकांना वाटत असतें. काम करावें न लागण्यांत खरें सुख आणि प्रतिष्ठा

आहे अशी सामान्य कल्पना. फुलपाखराप्रमाणे मन मानेल तसें अुडत चरणें, नाहीतर आळसांत लोळणें ह्यांत आनंद मानला जातो. घाम गाळणाऱ्या लोकांच्या परिस्थितीबद्दल करुणा येअून, सहृदय कवींनी व लेखकांनी कितीतरी हृदयद्रावक वाङ्मय निर्माण केलें आहे. अुलट, श्रमजीवि माणसांना खुशाल-चेंडू अैदी लोकांच्याबद्दल हेवा तर वाटत नाहीच; तिरस्कार मात्र वाटतो. पण त्यांच्याजवळ प्रसिद्धीचें साधन कुठे असतें?

येन केन प्रकारेण आराम करूं शकणारे लोक बौद्धिक, धार्मिक, नैतिक व सामाजिक श्रेष्ठत्व सांगूं लागतात व त्याचे ठेकेदार बनूं पाहतात. पण केवळ शारीरिक श्रमांनीच प्राप्त होणारें आरोग्य, शरीरसौष्ठव व तेजहि त्यांना विनासायास हवें असतें. म्हणून, अैपतवान लोक खेळ खेळतात, फिरावयास जातात, फुलझाडांचा बगीचा करतात. पाश्चात्य देशांतील सुखवस्तु स्त्रिया तर आपल्या त्वचेचा फिक्केपणा घालवून त्याला 'सन टॅन' चा मुलामा देण्या-साठी हौसेने अून खात पहुडतात. अवयवांच्या अुठावासाठी कृत्रिम साधनांचा वापर शहरांतील स्त्रिया सर्रास करीत आहेत. पण त्यामुळे वडारणींच्या रस-रशीतपणाशीं थोडीच बरोबरी होअूं शकणार?

"आराम हराम है," हें माहीत असूनहि आरामाच्या खोट्या प्रतिष्ठेने दिपून जाणारेच फार. त्याचा आपल्या कौटुंबिक राहणीवर घातक परिणाम होत आहे. घर सुव्यवस्थित राखण्यासाठी मेहनत घेण्यापेक्षा अैदीपणाने पसरणें श्रेयस्कर मानलें जातें. वेळेवर सर्व कांही व्हावें ह्यासाठी झटणारांचें हसें होतें. प्रत्येक गोष्ट आरामाने घेणारी व्यक्ति सुखी असते, असा भास निर्माण होतो. स्वतःच्या बुटांना स्वतःच पॉलिश करणारा, आपले कपडे स्वतः धुअून त्यांना अिस्त्री करणारा, सायकल घरींच दुरुस्त करणारा, झाड-सारवण करणारा माणूस हीं कामें मोलाने करवून घेणारापेक्षा असुखीच असणार, अशी समजूत प्रसृत आहे. मोटारींतून 'ड्राअिव्ह'ला जाण्याअितकाच आनंद चालत फिरायला जाण्यांत मिळूं शकतो. पण सामाजिक दर्जाची कल्पना विपरीत आहे आणि त्या कल्पनेच्या विरुद्ध मत व्यक्त करणारे आपलें दारिद्र्य लपविण्यासाठीच तत्त्वज्ञान लढवीत असतात असा युक्तिवाद केला जातो. त्यामुळे आळशी व स्वच्छंदी जीवनांतल्या नीरस आणि बेचव अशा तक-लादी आनंदाच्या पाठीमागे लोक लागतात.

ठरल्यावेळीं ठरलेलीं कामें श्रम पडले कसोशीने तरी पार पाडणारांना मिळणाऱ्या कसदार आनंदाची कल्पना भटकभवानींना आणि टोळभैरवांना कशी येणार? रात्रीं जागरण झालें तरी दुसऱ्या दिवशीं वेळेवर अुठून नियोजित काम पार पाडून आपण स्वतःलाच दिलेला शब्द राखण्यांत किती अभिमान वाटतो! त्याची सर नाटकाची किंवा अनावर झोपेची सबब सांगून काम चुकविण्यांतील आरामबाजीला कशी येणार? कार्यक्षमतेचा आनंद आणि कामचुकारपणाचा आनंद ह्यांची तुलना धारोष्ण दूध आणि ताकवणी ह्यांच्याशींच फक्त होअू शकेल. श्रमलेल्या स्नायूंना कुरवाळण्यांतला कृतार्थतेचा ब्रह्मानंद आयतोजींनी अनुभवूनच पाहायला हवा.

अैपतवाल्यांनी आळसाला सुखाचें पांघरूण घातलें तरी त्याचें अनुकरण बाकीच्यांनी करून कसें चालेल? श्रमाला तुच्छ लेखून, कार्यक्षमतेला नांवें ठेवून वागण्यास अितरांनी प्रारंभ केला तर त्यांना धारोष्ण सुख तर मिळणार नाहीच, पण आळसहि न परवडल्यामुळे सुखाची ताकवणीसुद्धा त्यांच्या वांट्यास येणार नाही. म्हणून प्रत्येक कुटुंबांत कामसूपणाविषयी आदराची भावना निर्माण व्हायला हवी; श्रम चुकविण्याचा मोह टाळायला हवा. आमच्या तरुण-तरुणींपुढे मधमाशीचा आदर्श हवा; फुलपाखराचा नको. पण घडतें नेमकें अुलट! फुलपाखराचें आकर्षण वाटणें सौंदर्यदृष्टीस धरूनच आहे; पण त्याची चंचलता आणि अशाश्वतता लक्षांत येत नाही. फुलपाखरू रोज दिसलें तरी कालचें आज नसतें आणि आजचें अुद्याला टिकत नाही, हें वरवर पाहणाराच्या ध्यानांत येत नाही.

हाताखाली कामाला पोरगा असावा, आयते जिन्नस विकत घ्यावे, बाजारचें आणून खावें, चालण्याचें टाळून भाड्याचें वाहन करावें, संध्याकाळीं नटूनथटून हिंडावें आणि हॉटेलांत जेवावें, अुरलेला वेळ कुटाळक्यांत घालवावा; हें सर्व परवडलें नाही तरी देखावा चालू ठेवावा; तेंहि जमलें नाही म्हणजे अखेर कळकट कपडे घालावे, केर न काढतां आणि पांघरूण-अंथरूण न झटकतां निजावें; पावांच्या तुकड्यांवर भागवावें, पण कसलीहि तसदी घेअू नये, अशा राहणीस प्रारंभ होतो. त्यांत कुणालाच सुख लागत नाही. थोडेसे श्रम घेण्याची तयारी असणारांना हें सर्व सहज टाळतां येणें शक्य आहे. श्रमांची लपवाछपव करण्याचें काय कारण आहे? खिडक्या-दरवाजांना लावण्यांत येणाऱ्या

रंगीत व मोहक पडद्यांप्रमाणे, गृहिणीने बाहेर चापचोप वाळत घातलेले पांढरेशुभ्र कपडेहि रसिकाला शोभादायक वाटतात.

वीणाने आपले केस बॉब केले ते प्रथम वसंताच्या आवडीखातर. ते तिला शोभिवंत दिसतात आणि सोयिस्करहि वाटतात. केस कुरळीत राखण्याच्या खर्चाची भरपाअी ती आपले स्वत:चे व मुलीचे कपडे घरीं शिवून करते. आपला बॅडमिंटनचा आणि पोहण्याचा पोषाकहि तिनेच बेतून शिवलेला आहे. तिच्या खेळावरला खर्चहि संसारावर पडत नाही; घरीं ठेवलेल्या पेअिंग गेस्टच्या अुत्पन्नांतून तो सहज भागतो. वसंताच्या आवडीचे 'नॉनव्हेज' पदार्थ घरीं करण्यास ती आपल्या मैत्रिणीजवळ शिकली आहे. सासूबाअींचा मान राखून त्यांची पूजाअर्चा आणि अुपासतापास ह्यांची सांगावें न लागतां व्यवस्था करून, तिने त्यांची शाबासकी मिळवली आहे. सुटीच्या दिवशीं वसंत तिच्या मदतीला येतो. त्याने घासावें आणि वीणाने पुसावें असा कार्यक्रम तालांत चालतो. कुठलेंहि काम हौसेने केलें म्हणजे आनंद निर्माण होतो; तेंच काम आवडीच्या जोडीदारांनी मिळून केलें म्हणजे सुखनिर्मितीचा आनंद दुणावतो. श्रम आणि काटकसर ह्यांतूनच संपत्ति निर्माण होत असते. वीणा-वसंताच्या सुखसंपदेचा झरा तोच आहे. कार्यक्षमतेपासून आनंद मिळूं लागायला वेळ लागला तरी तो आनंद अुच्च दर्जाचा आणि टिकाअू असतो हें त्यांना पटलें आहे. अविचारी, ध्येयरहित आणि कार्यशून्य माणसें सुख पांघरतात, त्यामुळे होणारी फसगत त्यांनी टाळली आहे. वीणा-वसंताचें अनुकरण करणारांना स्वत:च्या आर्थिक पायरीपेक्षा कितीतरी अुच्च दर्जाचा आनंद लाभूं शकेल. सुखाचें शिखर पायवाटेनेच चढून जावें लागतें; मोटरीचा रस्ता तेथपर्यंत जात नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 3270 दि: 1-7-95
क्रमांक 9386 नों. दि. 7252

-- १ --

# करूंया सारथी विवेकाला....

**श्री**कांत आणि विकास हे दोघे खेळगडी आणि शाळासोबती; अेकाच महाविद्यालयांतील अेकाच वर्गात शिकतात; वसतिगृहांतील अेकाच खोलींत राहतात; अेकाच क्लबांत जेवतात. श्रीकांतचे वडील आहेत असाचे वागाअीतदार आणि विकासचे वडील आहेत शाळामास्तर. श्रीकांतच्या घरचा धंदा तेजींत आहे. कॉलेज-शिक्षण ही त्याच्या बाबतींत केवळ हौसेची व कौतुकाची गोष्ट आहे. ह्याअुलट, विकासच्या शिक्षणावर त्याच्या घरचा अुत्कर्ष सर्वस्वीं अवलंबून आहे. तो मिळवता होण्याची त्याचे आअी-वडील वाट पाहात आहेत. हें सर्व विसरून विकास अितरांच्याबरोबर ओढला जाअून वेळ व पैसे ह्यांचा अपव्यय करूं लागला तर त्याचा क्षणभंगुर आनंद नुकसान-कारक ठरेल. श्रीकांत त्याचा मित्र असला तरी त्याने 'विद्या धनं अधनानाम्' हें लक्षांत ठेवलें पाहिजे. नादारींत अभ्यास करून शिष्यवृत्त्या मिळविणाऱ्या सहाध्यायाचेंच. त्याने अनुकरण करायला हवें.

सुमतीबाअींनी आपलें नांव बॅडमिंटनमधून काढून टाकण्याचें ठरविलें, ह्याचें महिला मंडळांतील खेळाडू सभासदांना मोठें आश्चर्य वाटलें. खेळ थांबविण्याचें खरें कारण त्यांनी आपल्या मैत्रिणीला कानांत सांगितलें— "आमच्या अशोकला मेडिकल कॉलेजांत प्रवेश मिळाला आहे. त्यामुळं त्यांच्या

शिक्षणाचा खर्च वाढणार आहे. तेव्हा घरच्या बजेटावर पडणारा ताण कमी करण्यासाठी मी कांही काळ माझ्या खेळावरला खर्च कमी करणार आहे. ह्यांनीहि आपल्या कांही खर्चांत कपात केली आहे. आम्हीं घरीं अेक पेअिंग गेस्टहि घेतला आहे. आमच्या संसाराचा टप्पा आता बदलला आहे. अशोकच्या शिक्षणाला प्राधान्य देण्याचा हा काळ आहे. त्याचं शिक्षण पुरं झालं की मी पुन्हा येतेंच आहे खेळायला ! "

सुमतीबाअींच्याप्रमाणे विचारपूर्वक कृति करणारे लोक फारच थोडे आढळतात. दात कोरून पोट भरत नसतें, असें आपल्या राहणीचें समर्थन करणारे कित्येक असतात. पण त्यांच्या खर्चिक वृत्तीमागील बेजबाबदार-पणा अितरांच्या लक्षांत येत नाही व त्यांच्या राहणीचें अनुकरण मात्र केलें जातें. पैशाचा प्रश्न सोडा— सुशीलाबाअींची मुलगी आता वयांत येत आहे, तिला दिवेलागणीच्या वेळीं घरांत पोऱ्याच्या संगती ठेवून आअीने आपल्या करमणुकीसाठी बाहेर जाणें किती धोक्याचें आहे ! सिंधी व पंजाबी स्त्रियांचें दर्शनी अनुकरण करणारांनी त्यांच्याप्रमाणे परिस्थितीस तोंड देण्यास तरी शिकावें ! त्यांच्या झकपकीवर टीका करणाऱ्या गवाळ्यांनी टापटीप तरी शिकावी !

प्रत्येक कुटुंबाची आर्थिक व अितर परिस्थिति अनेक प्रकारें भिन्न असते आणि प्रत्येकाचा संसार वेगवेगळ्या टप्प्यांवर आलेला असतो. आपण आपली राहणी ठरवितांना आपली कुटुंबावस्था व वयोवस्था लक्षांत घेतली नाही तर आपली फसगत होअून तोंडघशी पडण्याची पाळी येते. आपला अनेक व्यक्तींशीं व कुटुंबांशीं हरप्रकारें संबंध येतो. त्यांच्याकडे वरवर न पाहतां, त्यांच्या अवस्थेची नीट छाननी केली तरच त्यांच्याशीं वास्तविक, यथायुक्त तुलना करून हितकारक निर्णय आपल्याला घेतां येअील. सारखाच पगार मिळणाऱ्यांपैकी निपुत्रिक दंपतीने प्रत्येक आठवड्यास दोनदा सिनेमा पाहिला म्हणून शेजारच्या अष्टपुत्रा सौभाग्यवतीने तोच हट्ट धरून कसें चालेल ? कॅप्टन विलासच्या नववधूच्या लाल लिपस्टिकचें आणि पोनीटेल केशरचनेचें आजीबाअी शोभेल अशा अेखाद्या प्रौढेने अनुकरण केलें म्हणजे " बुढ्ढी घोडी, लाल लगाम " असाच प्रकार व्हावयाचा ! स्त्री-पुरुषांच्या अेकत्र भोजनाचे व खेळाचे कार्यक्रम श्रीमंत लोक आपल्या घरीं पहाटेपर्यंत निःसंकोचपणें करूं

शकतात; पण वाड्यांत किंवा चाळींत राहणाऱ्या सालस पति-पत्नींनी त्यांचें अुचित अनुकरण दिवसाअुजेडीं केलें तरी त्यांना चटोर अशी संज्ञा मिळते !

विमलाबाअींचा विवाह झाला त्या वेळीं त्या मॅट्रिकहि झालेल्या नव्हत्या. पतीला तेव्हा मिळणाऱ्या पगारांत त्यांचा संसार आरामांत चालू होता. त्यांच्या अेका शेजारणीने परिस्थितीशीं झगडून संसार सांभाळून नोकरी करीत, विद्यापीठाच्या अुच्च पदव्या कशा मिळविल्या हें विमलाबाअींनी मोठ्या कौतुकाने जवळून पाहिलें; तशी त्यांच्यांतहि चैतन्य निर्माण झालें. त्यांनीहि आपल्या पतीची संमति मिळवून, आळस झाडून, खंड पडलेलें आपलें शिक्षण पुन्हा सुरू केलें व पार पाडलें. त्यामुळे त्या आपल्या संसारसुखांत मोलाची आर्थिक भर घालून आपल्या मुला-मुलींच्या सर्वांगीण वाढीकडे लक्ष देअू शकत आहेत. विमलाबाअींनी जें करून दाखविलें तें अितर शेजारणींनाहि कमी-अधिक साधलें असतें. पण त्या गुंतल्या होत्या दुसऱ्याच गोष्टींची चर्चा करण्यांत ! आता विमलाबाअींचा हेवा वाटून काय अुपयोग ? कित्येक विद्यार्थी अेन्. सी. सी. मध्ये जी शिस्त शिकतात ती त्यांना आयुष्यभर सर्व क्षेत्रांत अुपयोगी पडते. ह्याअुलट, कांहीजण 'कवित्व' तेवढें आत्मसात् करतात !

दुसरा ज्यामुळे अुठून दिसतो, आकर्षक होतो, आनंदी आढळतो, ती गोष्ट आपणहि करावी असें आपल्याला साहजिकच वाटतें. अुत्कर्षाचें मूळ न शोधतां, आपण फक्त वरवर दिसणारी, सोयिस्कर बाब तेवढीच अुचलतों; खोलांत शिरतच नाही; महत्त्वाच्या गोष्टींचा विचारहि करीत नाही. त्यामुळे अस्सल गुणांचें अनुकरण न होतां दिखाअू गोष्टींची नक्कल केली जाते. प्रधान गोष्टींअैवजी आनुषंगिक, गौण, कधीकधी निरर्थकच नव्हे तर त्याज्य गोष्टींनाच प्राधान्य दिलें जातें. अेका चित्रपटनिर्मात्याने त्याच्या मित्र-पत्नीस सिनेमांत काम देअू केलें, तेव्हा पतीने तिची करून घेतलेली तयारी मोठी अजब होती ! त्याने तिला नवे कपडे केले, अितकेंच नव्हे, तर पुलावा खायला शिकवलें आणि सिगरेटच्या धुराची आवडहि तिच्यांत निर्माण केली ! अभिनय, गायन, नृत्य ह्यांच्यांत प्रावीण्य मिळवायचें सोडून भलत्याच बाबतींत तरबेज होअून जें काय साधलें, तें नंतर तितक्याच किंमतीचें ठरलें !

कोणतेंहि कर्म करावयाचें असो, त्याच्या परिणामाचा विचार आधी करून नंतरच तें हातीं घ्यावें. अति त्वरेने केलेल्या कर्माचा परिणाम भलताच

होतो. म्हणून आपली परिस्थिति, सामाजिक स्थान, कुवत, पात्रता, आकांक्षा, जबाबदाऱ्या ह्या सर्वांचा सारासार विचार करून धोरण आखलें पाहिजे. अनुकरणाचा मोह निर्माण करणाऱ्या फसव्या गोष्टी आजूबाजूला पुष्कळ असतात. योग्य त्या गोष्टीचें योग्य वेळीं, योग्य तेवढें अनुकरण करण्याचें तारतम्य दाखविण्यांतच खरी हुषारी आहे. अहिताचा संभव दिसूं लागतांच फार अुशीर होण्यापूर्वीच माघार घेण्यांत खरें शौर्य आहे.

डॉक्टर विवेकने मोठ्या अुमेदीने मोटर विकत घेतली; पण ती आपल्याला परवडत नाही असा अनुभव येतांच विकून टाकून तोल संभाळला. "हसायला अनेकजण आहेत, पोसायला अेकजणहि नाही" हें पक्कें ओळखून त्याने कोणाच्याहि अुपहासाची पर्वा केली नाही. आता त्याच विवेकचा मुलगा व मुलगी फटफटी व स्कूटर वापरीत आहेत; पूर्वी हसणाऱ्या अविवेकी मित्रांचीं मुलें मात्र बिचारीं रखडत आहेत. तारतम्यबुद्धि जागृत करणारा विवेकच खरा अुपकारक ठरतो. स्वत: मोहास बळी पडणारे अितरांचीहि दिशाभूल करीत असतात. त्यांच्यापासून आपण सावध राहिलें पाहिजे. विवेक सारथी नसेल तर महारथीसुद्धा यशस्वी होत नाहीत; मग सामान्य जनांची काय कथा?

★ ★ ★

# हळुवार हाताने कुसळ काढा !

अंजलिका तिच्या विवाहानंतर वसंतबरोबर चंडीगडला बिऱ्हाड थाटायला गेली तेव्हापासून तिचें बरेच दिवसांत सुमित्राकाकूंना पत्र आलें नव्हतें. जें पहिलेंच पत्र आलें त्यावरून तिला संसारांत चांगलीच गोडी लागल्याचें दिसत होतें. "वसंतला काम फार असतं; तरीपण तो माझ्यावरोबर फिरायला जायला, बॅडमिंटन खेळायला नेहमी तयार असतो," असें तिनें लिहिलें होतें. तिची अेकच तक्रार होती, की "तो सिगरेट जरा जास्त ओढूं लागला आहे. त्याचे मित्र त्याच्यापेक्षा कितीतरी जास्त ओढतात, वाटेल तेव्हा ओढतात. पण मला वाटतं, की माझ्या वसंतनं सिगरेट ओढूंच नये !"

सुमित्राकाकूंनी अंजलिकेला अुत्तर धाडलें, त्यांत तिला समजूतदारपणाचा हितकारक सल्ला दिला. त्यांचें सबंध पत्रच खाली देत आहें—

"वसंत कधीकधी सिगरेट ओढीत असे हें तुला माहीत होतं; पण आता तो जास्त ओढूं लागला आहे, असं तूं म्हणतेस. सिगरेट ओढण्यामुळं प्रकृतीस अपाय होतो हें खरं असलं आणि तें पटलं तरी सिगरेट ओढणारा धूम्रपान अेकाअेकी सोडूं शकत नाही. तेव्हा वसंतच्या सिगरेटच्या सवयीबद्दल तूं त्याला घाअीनं तीव्र नापसंती दाखवूं नकोस. त्यामुळं तुमच्या दोघांत निष्कारण संघर्ष

निर्माण होईल आणि तुझ्यापेक्षा सिगरेटची ओढ हीच प्रभावी ठरणं अशक्य नाही.

"सिगरेट अपायकारक तर खरीच; पण शारीरिक अपाय तात्काळ होत नाही व सत्वर लक्षांत येत नाही, त्याला बराच वेळ लागतो. अेक सिगरेट ओढली की तीस सेकंद आयुष्य कमी होतं, असं गणित सांगतां येत नाही. परंतु



**" सिगरेटवरील खर्चाचं बोलणं त्याच्याशीं खुबीनं काढ ..."**

सिगरेटचा खर्च परवडतो किंवा नाही हें मात्र तपासून पाहणं अगदी सोपं असतं. अंजलिका, तूं महिन्याचा खर्च मांडतेसच. त्या खर्चापैकी वसंतच्या सिगरेटवर किती खर्च होतो हें काढून पाहा. तुम्हांला अेखादी आवश्यक गोष्ट विकत घेतांना पैसे अपुरे पडतील तेव्हा हळूच सिगरेटवरील खर्चाचं त्याच्याशीं खुबीनं बोलणं काढ.

"सिगरेटसाठी अितका खर्च होतो हें वसंतला अेकदम पटणारच नाही. तेव्हा, 'दरमहा तीस रुपये खर्च होतात' असं तूं सांग. तो विचारील, 'अितके

कुठं लागतात?' मग हिशेब करून चाळीस रुपयांच्या खर्चाचा तपशील दे! म्हणजे त्याच्या कल्पनेपेक्षा आणि तूं आधी सांगितलेल्या आकड्यापेक्षाहि प्रत्यक्ष खर्च पुष्कळच जास्त होतो हें पाहून त्याला आश्चर्यच वाटेल व त्याचा परिणाम अिष्टच होअील. सिगरेट कमी करून, जरूर त्या तुझ्या आवडीच्या वस्तु तुला घेअून देण्यांत त्याला कितीतरी आनंद वाटेल. अुलट, नाखुषीनं आणि आरोग्यावरील तुझ्या व्याख्यानाच्या तिटकाऱ्यानं सिगरेट कमी ओढणं त्याला जाचकच होअील.

"माझंच अुदाहरण मी सांगतें. बापूसाहेबांना मध्यंतरीं कांही दिवस बराच प्रवास करावा लागला, तेव्हा त्यांना सिगरेटची सवय जडली. त्यांनी ही गोष्ट माझ्यापासून लपवून ठेवण्याचा खरोखरच चांगल्या हेतूनं कसून प्रयत्न केला. मला न आवडणारी गोष्ट करणं त्यांना जड वाटत होतं. पण मीं पाहिलं, की त्यामुळं त्यांनाच फार त्रास होअी. मला त्यांच्या धुराचा वास वास्तविक केव्हाच आला होता! मीं त्यांना मोकळेपणानं सांगितलं, की अुगाच कुचंबणा करून घेअूं नका. मींच त्यांचं रक्षापात्र स्वच्छ करून ठेवूं लागलें.

"कांही महिन्यांनी मात्र मीं त्यांना सिगरेटच्या खर्चाचा हिशेब अनुकूल संधि साधून दाखविला तेव्हा आपल्या संसाराची त्यामुळं ओढाताण होते हें त्यांच्या ध्यानांत आलं. लागलीच सिगरेट सोडून त्यांनी विडीचा अवलंब केला. पुढं कांही वर्षांनी आमची परिस्थिति सुधारली तेव्हा मींच त्यांना त्यांच्या आवडीच्या सिगरेट आणवून देअूं लागलें. तुझा आणि वसंतचा आमच्यापेक्षा कितीतरी अधिक अेकोपा आहे; तुम्ही दोघंहि समजूतदार आहांत. तेव्हा तूं त्याची 'व्यसनी' म्हणून हेटाळणी करूं नकोस. तो ज्या कांही सिगरेट ओढील, त्याचं सुख त्याला मिळूं दे ना! तुझ्या नापसंतीच्या टोचणीमुळं त्याचा हिरमोड होअूं देअूं नको.

"आणि खरंच! अंजलिका, वसंतच्या सिगरेटला नांवं ठेवतांना तुझ्या चहाची तुला आठवण आहे ना? दिवसांतून किती वेळां तूं चहा पितेस? वसंत अुठण्यापूर्वी दीड पेला, त्याच्याबरोबर अेक पेला, सैपाक करतांकरतां अेक पेला, चार वाजतां अेकदा आणि वसंत कचेरींतून परत आल्यावर पुन्हा अेकदा, अेवढा

चहा तुझा नक्कीच होत असेल. आल्या-गेल्याबरोबरचा चहा तो वेगळाच ! तुला खरोखरच मनापासून चहा आवडतो; पण वसंतनं त्यावर कधी टीका केली आहे का ? तो चहा पितो, पण तुझ्यापेक्षा कितीतरी कमी प्रमाणांत. तेव्हा वसंतच्या सिगरेटकडेहि तूं जरा समंजसपणें पाहा. आमच्या बापूसाहेबांच्या पद्धतीचंच अनुकरण वसंतानं करावं असं मी मुळीच म्हणत नाही. त्याला त्याच्याच पद्धतीनं सिगरेट कमी करण्यास पुरेसा अवधि दे हेंच मला सांगायचं आहे. सिगरेटचा वास तुला आवडला नाही तरी त्याच्या धूम्रपानाची तूं निर्भर्त्सना करीत नाहीस हें त्याला पटवून दिलंस की पुढील काम सोपं आहे. नवराबायकोंनी अेकमेकांच्या किरकोळ सवयी जरा संभाळूनच घेतलेल्या बऱ्या हें काय सांगायला पाहिजे ?"

"ता. क.– रोज रात्रीं निजण्यापूर्वी तुझ्याबरोबर दात स्वच्छ धुवायला वसंताला तूं सांगितलंस तर तो तत्परतेनं त्याला मान्यता देअील. प्रयोग करून पाहा !"

या पत्रावर वेगळ्या भाष्याची अर्थातच जरूर नाही.

* * *

# चढता आणि पडता काळ

ग्वाल्हेरच्या पद्मावती राजे ह्यांचा विवाह त्रिपुराच्या महाराजांबरोबर साजरा झाला, त्या वेळीं शेकडो राजे-महाराजे आपल्या परंपरागत वेषांत रत्नखचित तलवारी सावरीत अुपस्थित होते. राण्या-महाराण्यांचाहि थाट कमी नव्हता. ह्या सर्व लखलखाटांत अेक युवराज मात्र आपली नाखुषी लपवूं शकला नाही. "काय ही आत्मवंचना! कशाला ही फसवणूक!" असें पुटपुटत तो मधूनमधून पाय आपटीत होता. त्याच्या शेजारींच बसलेल्या श्रीमती ताया झिंकिन ह्या अिंग्रज पाहुणीने त्याला त्याच्या तिटकाऱ्याचें कारण विचारलें. तो म्हणाला, "बघा ना हें सगळं नाटक!" "छान आहे की! अिंग्लंड-मधेसुद्धा आम्ही जुन्या चालीरीति सोडीत नाही. राज्यारोहणाची फिल्म तुम्हीं पाहिली असेलच की!" अशी तिने त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. "खऱ्या राज्यकर्त्यांच्या बाबतींत तें ठीक आहे. पण आम्ही अिथं जमलेलीं मात्र सगळीं भुतं अन् सोंगं आहोंत! विदूषक अन् खुळचट आहोंत!" असें म्हणून तो तेथून अुठून चालता झाला.

प्रतिकूल परिस्थितीशीं सामना टाळण्याची बहुतेकांची कमी-अधिक प्रमाणांत प्रवृत्ति आणि घडपड असते. अुलटा जमाना आला म्हणजे त्याला अनुसरून बदल करायला हवा हें लक्षांत आलें तरी कृतीची तयारी चटकन्

होत नाही. माणसांत कांहीहि फरक न होतां केवळ त्याच्याजवळची पैशाची अूब कमी झाली म्हणजे त्याला कोणी विचारीनासें होतें. माणसाजवळच्या केवळ धनाला गुण चिकटविलेले असतात ह्याची प्रचीति अतिशय दु:खकारक असते आणि ती टाळण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे समाजांतलें, मित्रांतलें, शेजाऱ्यांतलें, नातेवाअिकांतलें आपलें स्थान टिकविण्यासाठी देखावा कायम ठेवून कांही काळ अुपासमारसुद्धा सहन केली जाते.

सोन्याबापूंचें अुदाहरण पाहा ना. आपली परिस्थिति खालावत आहे हें अितरांना समजलें तर ते आपल्याशीं पूर्वीप्रमाणे वागणार नाहीत ह्या भीतीनें त्यांनी आपली अवकळा लपविण्याचा किती प्रयत्न केला! त्यांनी बायकोला 'प्रकृतीसाठी' माहेरीं पाठवून दिलें आणि ज्या क्लबांत पूर्वी ते विनोदनासाठी जात असत तिथे आता तगादेदारांना चुकविण्यासाठी ते जाअून बसूं लागले. मोटर काढून टाकून आपण सायकलस्वार बनलों तर भ्रमाचा भोपळा फुटून आपण अुघडे पडूं आणि अुपहासास पात्र होअूं ह्या कल्पनेने ते बेचैन झाले. त्यांना कुठल्याच पंपावर पेट्रोलच नव्हे तर हवासुद्धा भरून मिळेनाशी झाली आणि त्यांची मोटर ओढून नेण्यांत आली तेव्हा कुठे ते ठिकाणावर आले. त्यांनी वेळींच आपण होअून आपली मोटर विकली असती तर तिच्या भरपूर किमती-मधून त्यांना आपलीं देणीं भागवून स्वत:चा संसार आणि व्यवसाय सावरतां आला असता. छपराचा आसरा आणि बायकोच्या हातची भाकरी तरी मिळत राहिली असती. अितक्या थराला गोष्टी जाण्याचीं अुदाहरणें फारशीं घडत नसलीं तरी त्यांवरून मनाच्या कमकुवतपणाचा किती घोर परिणाम होअूं शकतो हें दिसून येतें.

आपली मिळकत वाढली की पाठोपाठ खर्चहि वाढवायला मुद्दाम शिकवावें लागत नाही. तरीसुद्धा शिकविणारे पुष्कळ असतात आणि ते आपल्याला प्रिय वाटतात. रेडिओ, विजेचा पंखा, जेवणाचें टेबल, गॅसच्या शेगडचा हे जिन्नस घरांत प्रवेश करतात. रेफ्रिजरेटर; मोटर, टेलिफोन हींहि लगोलग येतात. सोफा सेटखेरीज घराची सजावट पुरी होत नाही. मुला-मुलींना कॉन-व्हेंटच्या शाळेंत पाठवायला सुरवात होते आणि आअीसुद्धा सलूनमध्ये जाअून केस बॉब करून घेअं लागते. आजवर तिसऱ्या वर्गाने प्रवास करणारे आता पहिल्या

वर्गालाहि नांवें ठेवूं लागतात; आणि नाटकगृहांत पुढच्या रांकेंत जागा मिळाली नाही की ते तडक घरीं परततात! आपल्यापेक्षा वरच्या आर्थिक व सामाजिक थरांतले मित्र आणि मैत्रिणी जोडण्यासाठी पार्ट्या सुरू होतात.

हा सर्व बदल किती झपाट्यानें घडून येतो! पण दुर्दैवाने चलती कमी झाली तर मात्र खऱ्या कसोटीची वेळ येते. कारण आपल्या राहणीचा ढंग आणि गति अुतरविण्यास हिंमत आणि मनोधैर्य लागतें; त्वरित निर्णय घेण्यास विवेक लागतो आणि तो अमलांत आणण्यास कुटुंबांतील सर्वांचें हार्दिक सहकार्य लागतें. कोणते खर्च कसे कमी करावयाचे हें ठरविणें अवघड जातें. चालत्या काळांत, पैसे हातीं येण्यापूर्वीच त्याच्या खर्चाच्या आपल्या योजना आखून तयार असतात. पण मिळकत कमी होते किंवा थांबते तेव्हा मात्र काटछाटीच्या योजनांचा विचार करण्याची प्रथमच पाळी येते. त्या बाबतींत स्वत:लाच निर्णय घ्यावे लागतात.

अैश्वर्य भोगलेल्या राधाबाअींनी पतिनिधनानंतर आपली भूमिका किती त्वरेनें बदलली! सौभाग्यधन नष्ट होतांच त्यांनी सौभाग्यचिन्हांचा तात्काळ त्याग केला. दु:ख करायला त्यांना सवडच नव्हती. मुलांबाळांच्या पोटापाण्याची, संवर्धनाची आणि शिक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर अेकदम येअून पडली होती. आर्थिक कुचंबणा आणि परावलंबी जिणें ह्यांना तोंड देण्यास त्यांना लागलीच तयार व्हावें लागलें. नोकरी-चाकरी शोधावी लागली. नव्या परिस्थितीला अनुसरून सर्व कांही बदलावें लागलें. राधाबाअींच्यासारख्या कितीतरी स्त्रियांनी दुष्ट परिस्थितीवर विजय मिळवून समाजांत आदराचें स्थान प्राप्त करून घेतलें आहे. त्यांच्या समयज्ञतेपासून बरेंच शिकण्याजोगें आहे.

मोहनराव आपल्या कंपनीच्या कामासाठी फिरतीवर जातात तेव्हा त्यांना आगगाडीचें पहिल्या वर्गाचें भाडें मिळतें. कांही दिवसांपूर्वी ते पुण्यास चक्क तिसऱ्या वर्गाच्या डब्यांतून अुतरले. "कंपनीचं काम मुंबअीलाच संपलं. दादर ते पुणें मी माझ्या अैपतीप्रमाणं तिकीट काढून आलों आहे," असा त्यांनी खुलासा केला. मोहनरावांचा हा प्रांजलपणा आणि कंपनीच्या अधिकाऱ्याची भूमिका संपतांच त्याला आनुषंगिक गोष्टी सोडून देण्याची त्यांची तयारी आयुष्यांतील अितरहि कितीतरी बाबतींत खरोखरच अनुकरणीय ठरेल.

वेदना असह्य झाल्या म्हणजे माणूस तात्काळ डॉक्टराकडे धाव घेतो; पण कळत-नकळत वजन कमी होत चाललें किंवा खाणें कमी झालें तर त्याकडे दुर्लक्ष होतें. प्राणघातक कॅन्सरचीं तीं लक्षणें असूं शकतात आणि कालहरण घातक ठरण्याची शक्यता असते. आर्थिक परिस्थिति हळूहळू खालावत जात असते, तेव्हा तिच्याकडे अशीच डोळेझाक करून माणूस आशेच्या आधारावर दिवसगत लावतो आणि त्यामुळे 'बुडत्याचा पाय खोलांत' अशी त्याची गत होते. आर्थिक दुखण्यांचें निदान आणि अुपाययोजना ह्यांच्या बाबतींतहि हयगय अुपयोगाची नाही.

★ ★ ★

--१२--

# पतीच्या उत्कर्षाची घरची आघाडी

कलकत्ता येथील अेका ब्रिटिश कंपनीनें वृत्तपत्रांत जाहिराती देअून, जबाबदारीच्या अेका जागेसाठी अुमेदवारांचे अर्ज मागविले होते. आलेल्या अर्जांची छाननी करून व लायक अुमेद्रवारांची मुलाखत घेअून त्यांचे अनुक्रम लावण्यांत आले. पहिल्या पांचजणांच्या पत्नींना नंतर मुलाखतीसाठी बोलावणें गेलें व ज्याची पत्नी नोकरीच्या गुणांस अनुरूप दिसली, त्यालाच पसंत करण्यांत आलें !

दिसायला सर्वजण सारखेच वाटले आणि त्यांच्या योग्यतेंत विशेष फरक नसला तरी त्यांच्या प्रत्यक्ष कामाच्या प्रकारांत मात्र भिन्नता आढळते. कांहींचें लक्ष कामांतच टिकून असतें, तर कांहींचें मन स्थिर राहात नाही. ह्याचें कारण पुष्कळ वेळां त्यांच्या पत्नींच्यामध्ये सापडतें. नोकराचा चित्तभ्रम कित्येक प्रसंगीं घरच्या काळजीमुळे होतो; पण कामाच्या वेळांत कामाखेरीज दुसऱ्या कशाचीहि त्याला आठवण झाली नाही तर त्याच्या हातून अुत्साहाने, हसतमुखाने, गोंधळ न होतां काम होअून त्यामुळे त्याला वढती लवकर मिळते.

नोकराच्या प्रसन्नतेच्या मागे त्याच्या गृहिणीचा हात बहुधा असतो. ज्याला वेळेवर ताजें जेवण मिळतें, ज्याच्या कपड्यांची निगा राखली जाते, ज्याच्या आवडीप्रमाणे पानसुपारी-सिगरेट टेबलावर तयार असते, खिशांत

जागच्या जागीं हातरुमाल, किल्ल्या व पैशाचें पाकीट हीं ठेवलेलीं असतात, दुपारच्या फराळाच्या डब्यांत रोज नवेनवे चवदार पदार्थ येतात अशा भाग्यवंताचें काम अेकाग्रतेने होण्यास निश्चित मदत होते. तो घरीं परत आल्यावर त्याचें सस्मित स्वागत झालें, त्याच्या थंडी-खोकल्यासाठी न सांगतां काढा तयार झाला, त्याच्या गादींतील व मच्छरदाणींतील ढेकणांचा समाचार घेतलेला असला, तर त्याचें शारीरिक व मानसिक आरोग्य कां बरें नाही टिकून राहणार ?



दुपारच्या वेळांत सासू व सून यांचें भांडण होअून...

पण तेवढ्याने मात्र भागणार नाही. पति घराबाहेर असतांना त्याला घराबद्दल यत्किंचितहि काळजी वाटतां कामा नये अशा रीतीने पत्नीचें वागणें हवें. आजारी बाळाला वेळेवर औषध दिलें जातें किंवा नाही आणि पाण्याचा चंब आंत आणून ठेवला की नाही ह्याची पतीला कामाच्या जागीं चिंता वाटू

लागली तर त्याच्या हातून नीट काम कसें होणार ? कारखानदार, व्यापारी, प्रचारक, वकील, फिरती असणारे नोकर अित्यादि लहानमोठ्या लोकांना वरचेवर परगावीं जावें लागतें. त्या वेळीं त्यांना मन घट्ट करून घरच्या अडचणी विसराव्याच लागतात. पण प्रत्येकाला तें साधत नाही. म्हणून पत्नीनेच काळजीचें कारण राहूं दिलें नाही म्हणजे झालें !

घेणेकरी किंवा वसुलीदार आला तरी त्याला योग्य अुत्तर पत्नी देअूं शकेल असा पतीला विश्वास वाटला पाहिजे. दुपारच्या रिकाम्या वेळांत सासू व सून ह्यांचें भांडण होअून दोघीहि आपली घरीं परतण्याची वाट पाहात बसल्या आहेत, असें चित्र नोकरदार पुरुषाच्या दृष्टीसमोर सारखें येअूं लागलें तर त्याच्या कामांत चुका होणारच ! कोणत्याहि अडचणीच्या वेळीं आपली पत्नी धैर्याने व समयसूचकतेने सर्व कांही तत्परतेने करील, अशी पतीला खात्री असली म्हणजे कामांत त्याचें लक्ष लागेल, फिरतीवरून परत येण्याची तो घाअी करणार नाही, अधिक माल खपवील, विम्याचें जास्त काम मिळवील व आर्थिक अुत्कर्ष साध्य करील.

पतीला किती काम करावें लागतें, किती गैरसोयी सोसाव्या लागतात, किती मानहानि सहन करण्याची पाळी येते, ह्याची पत्नीला कल्पनाहि असत नाही. त्यामुळे त्याच्या दृष्टिकोनांतून ती पाहूंच शकत नाही. तो घरीं येतो तेव्हा तो दमलेला असतो व त्याला विश्रांतीची, करमणुकीची आणि रम्य वातावरणाची आवश्यकता असते हें पत्नी बहुधा विसरते आणि घरच्या कामाला त्याला जुंपूं पाहते; नाहीतर त्याला पुन्हा घराबाहेर काढण्याच्या अुद्योगाला लागते. त्याला गृहिणीच्या हातचा चहा हवा असतो, तर पत्नीला बाहेरच्या चहाचें आकर्षण वाटतें ! पतीच्या रिकाम्या वेळांत त्याच्या सोयीप्रमाणे व अिच्छेप्रमाणे कार्यक्रम आखल्याने त्याचा शीण नाहीसा होतो व पुन्हा नव्या अुत्साहाने तो कामास लागं शकतो.

पत्नीपेक्षा पतीला बाहेरच्या जगाचा अनुभव अधिक असतो व त्यामुळे व्यवसाय कसा करावा, हें त्यालाच जास्त चांगलें समजतें, हें सर्वसाधारणपणें खरें आहे. तेव्हा नसत्या शहाणपणाच्या आविर्भावाने पतीला अुपदेश करण्याचा

खटाटोप पत्नीने न केलेला बरा. पण त्याच्या कामाची माहिती करून घेअून त्याला प्रसंगानुरूप बारीकसारीक सूचना सौम्यपणें करायला कांहीच हरकत असत नाही. मनुष्याची व प्रसंगाची पारख कित्येक वेळीं पतीपेक्षा पत्नीलाच अधिक लवकर होते; त्याचा फायदा पतीनें अवश्य करून घ्यावा. नसती अुठाठेव किंवा हस्तक्षेप न करतां, थोडेंसें मार्गदर्शन करून पतीला प्रोत्साहन देणें हुषार पत्नीला सहज साधतें.

माझ्या अेका दुकानदार-मित्राची आअी आजारी पडली तेव्हा शस्त्र-क्रियेसाठी तिला मुंबअीला घेअून जाणें त्याला जरुरीचें झालें. वास्तविक महि-न्याच्या प्रारंभींचा तो काळ होता; परंतु त्याला दुकानाबद्दल काळजी वाटली नाही. कारण त्याच्या पत्नीनें जेवणाचे डबे आणून घरकामाचा वेळ वांचविला व सर्व वेळ दुकान सांभाळलें, अुधारी वसूल केली व दररोज संध्याकाळीं पत्र पाठवून झालेल्या कामाची माहिती पतीला कळविली. ह्याच्याअुलट, पतीच्या गैरहजेरींत त्याच्या पत्रव्यवहाराकडे, निरोपांकडे व समजावून सांगितलेल्या कामांकडे पत्नीला लक्ष देतां आलें नाही तर त्यामुळे आर्थिक नुकसान होतें व त्याचें मन:स्वास्थ्यहि बिघडतें, अशींच अुदाहरणें जास्त आढळतात.

कारखानदार परगावीं गेला असतांना संबंधित सरकारी खात्याचे अधिकारी किंवा पाहुणे आले तरी त्यांचें स्वागत व पाहुणचार करावा लागतो. अशा वेळीं कारखानदाराच्या पत्नीने केलेल्या अुचित व्यवस्थेची सर कारखान-दाराच्या स्वत:च्या बादशाही आतिथ्यालाहि येणार नाही व त्याचे व्यावहारिक परिणामहि अधिक चांगले होअू शकतात. पतीला त्याचा व्यवसाय अधिक चांगला करतां यावा, नोकरींत त्याचा अुत्कर्ष व्हावा ह्यासाठी पत्नीने आवश्यक त्या गोष्टी अुत्साहानें व जाणतेपणाने केल्या तर त्यांत सर्वांचाच फायदा आहे. पुरुषाला जबाबदारीची नोकरी देतांना त्याच्या पत्नीचीहि मुलाखत घेण्याची पद्धत रूढ झाली तर कितीतरी माणकें प्रकाशित होतील !

* * *

--१३--

# गृहिणीचा वेळ वांचवा !

जयाचा वाढदिवस साजरा झाला, त्या वेळीं तिला कुणीं साडी, कुणीं कापड, कुणीं कॅमेरा अशा कित्येक भेटी दिल्या. त्या सर्वांत तिला रिस्ट-वॉचची भेट आवडली. अलंकार आणि अुपयुक्तता हीं दोन्ही त्यांत साधतात. मनगटावर घड्याळ असणें हें वक्तशीरपणाचें, अुद्योगप्रियतेचें, आधुनिकत्वाचें लक्षण मानलें जातें. त्यामुळे असें घड्याळ नसणारे लोक शहरवासीयांत मागासलेलेच समजले जातात. कांहींच्या बाबतींत रिस्टवॉच केवळ दागिनाच ठरतो, तर कांहींच्या जीवनाचें तें आवश्यक घटक बनलेलें असतें. सर्व कांही मनगटावर अवलंबून आहे !

वेळ पुरत नाही, फुरसत मिळत नाही, अशी तक्रार प्रत्येक ठिकाणीं अैकूं येते. कितीतरी कामें ठराविक वेळांत आटपावीं लागतात, त्यामुळे घड्याळाचें बंधन अनिवार्यच होतें. साहजिकच, तासाची भाषा पुरी पडत नाही, मिनिटांच्या हिशेबाने बोलावें लागतें. आणि दररोज सकाळीं रेडिओ-टाअिमप्रमाणे घड्याळ लावावें लागतें. तें पुढे-मागे गेलें तर घोटाळा होतो. शाळकरी मुला-मुलींनासुद्धा शाळा, शिकवणीचा क्लास, पी. टी., खेळ, जेवण ह्यांच्या वेळा सांभाळण्यासाठी घड्याळाची आवश्यकता भासते. गृहिणीला घरांतल्या सगळ्यांच्याच वेळा राखाव्या लागतात आणि त्यासाठी घड्याळाकडे सतत

लक्ष ठेवणें तिला भाग पडतें. तिलाहि तिचीं घराबाहेरचीं कामें असल्याने तिचें रिस्टवॉच बंद पडलें तर तिची गैरसोय व कुचंबणा होतें.

घड्याळामुळे वेळेचें भान राहण्यास मदत होतें. पण केवळ तेवढ्यानें वेळेची बचत करतां येअील असें नाही. कामें लवकर आटपावीं आणि निवांत-पणा मिळावा, असा प्रत्येकाचा प्रयत्न असतो. ज्यांना काम कांहीच नाही आणि वेळ मात्र भरपूर आहे अशांची गोष्ट वेगळी. त्यांच्यापुढे प्रश्न असणार सरवण्याचा, पुरवण्याचा नव्हे. पेन्शनर भाअूसाहेबांना कुणी मोटारींत लिफ्ट देअू केला तरी ते मोटारींत बसत नाहीत. कारण त्यामुळे जो तास अर्धा तास वांचेल, त्यांत त्यांनी करण्याजोगें कांहीच नसतें. त्यापेक्षा अिकडेतिकडे बघत भेटेल त्याच्याशीं बोलतबोलत, पायींच गेलेलें काय वाअीट ? मेथीची जुडी आणण्यासाठी ते मुद्दाम दूरच्या भाजीवाल्याकडे जातील आणि देवदर्शनाला लांबचें देअूळ निवडतील. क्लब अुघडण्याच्या आधीच ते तिथे दाखल होतील.

खाद्यपदार्थांचे डबे व बाटल्या आणि फराळाचे जिन्नस व ताज्या पोळ्या ह्यांची घरोघर वाढती खरेदी काय दर्शविते ? आजच्या गृहिणीला हे जिन्नस घरीं बनविण्यास पुरेशी फुरसत मिळत नाही; त्यापेक्षा जास्त महत्त्वाच्या कामांत ती व्यग्र असते. आयते जिन्नस विकत घेअून वेळेची बचत करणें तिला आवश्यकच झालें आहे. त्यामुळे हे जिन्नस महाग पडले तरी अखेर परवडतात. ज्या गृहिणींना नोकरीसाठी घराबाहेर जावें लागतें त्यांना घरकामांतून शक्य तेवढी मुक्तता हवी असते. कांही गृहिणी संसार सांभाळून आपलें शिक्षण पुरें करण्यासाठी आणि नव्या पदव्या संपादन करण्यासाठी धडपडत असतात, त्यांनाहि फुरतीची आवश्यकता असते. अशांची गोष्ट तर सोडाच. गृहिणी म्हणून पडणाऱ्या वाढत्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आजच्या गृहनिमग्न गृहिणीलाहि आणखी वेळ मिळाला तर हवा असतो. आवश्यक तेवढा वेळ पतीच्या रंजनाला, मुलाबाळांच्या शिक्षणाला व संगोपनाला, सासू-सासऱ्यांना सांभाळून घेण्याला, पाहुण्यांच्या स्वागताला आणि स्वतःच्या लेखन-वाचनाला देतां येत नाही. पण केवळ कांही जिन्नस बाजारांतून आणल्याने असा जादा वेळ किती मिळणार ? घरांतील बहुसंख्य कामें चालूच राहणार. तीं सर्व सुकर झालीं आणि त्यामुळे वेळेची व श्रमांची बचत झाली तरच अुपयोग.

जयाचा जयंतशीं विवाह झाला. नंतर तिने आपली शिक्षिकेची नोकरी चालू ठेवली, पण त्यामुळे तिची वेळासाठी फार ओढाताण होऊं लागली. शाळेंत जाण्यायेण्यांतच दोन तास मोडतात, हें तिला आता जाणवूं लागलें. जयंत तिला घरकामाला हातभार लावीत असे. तरीसुद्धा शाळेंत आदर्श शिक्षिका म्हणून आपला लौकिक राखायचा आणि गृहिणी म्हणून आदर्श संसार करायचा ह्या दोन्ही गोष्टी साधणें तिला कठीण जाऊं लागलें. घरांतील कामें झटपट आटोपून निवांतपणा कसा मिळवतां येईल ह्याविषयी ती विचार करूं लागली. याच सुमारास जयंतच्या वाचनांत अेक जाहिरात आली— विजेच्या घरगुती अुपकरणांची ती जाहिरात होती. तिच्यांत म्हटलें होतें, "तुमच्या पत्नीला बोलायला, जरा शांतपणें बसायला, घराचें घरपण वाढवायला वेळ मिळत नाही ना? तिची होणारी धावपळ तुम्ही बघतांच. मग तिला घरकाम हलकें करणारीं आधुनिक साधनें घेअून द्या ना! ही भेट किमतीच्या मानाने किती मौल्यवान ठरते पाहा!"

ह्या जाहिरातीने जया-जयंतच्या विचारांना चांगलीच चालना दिली. आजच्या संसारांतलीं कामें मागच्या शतकांतील साधनांनी आटपूं पाहणें व्यर्थ आहे, त्यासाठी नव्या साधनांचीच मदत घेतली पाहिजे, हें त्यांना पटलें. गोड-बोलेबाअींच्या घरीं गॅसच्या शेगड्या आहेत ह्याची जयाला आठवण झाली. गॅसवर चहा सत्वर तयार होतो आणि घाअीच्या वेळींसुद्धा पाहुण्याला नाखूष न करतां परत पाठवितां येतें; आतिथ्याला बाध न येतां गृहिणीला आपल्या नोकरीच्या व कामाच्या त्याचप्रमाणे करमणुकीच्याहि वेळा राखतां येतात. पाटीलबाअी आपल्या प्रेशर कुकरची किती प्रशंसा करतात! त्यामुळे सैपाक लवकर आटोपतो आणि सकाळ-संध्याकाळ ताजा सैपाक करणें सहज शक्य होतें. मालतीकडे अिस्त्री करण्यासाठी आयर्निंग बोर्ड आहे, त्यावर अिस्त्री करायला कंटाळा वाटत नाही. त्यामुळे लहान-मोठ्या सर्व कपड्यांना ती हौसेने अिस्त्री करते. सुधाबाअींनी आपल्या शिवणाच्या मशीनला छोटी मोटर बसविली आहे, त्यामुळे शिवणकाम सुखावह होतें. विमलाबाअींच्या स्नान-गृहांत गीझर बसविलेला आहे, तर प्रमिलाबाअींच्या घरीं कपडे धुण्याचें छोटेंसें यंत्र आहे. हे सर्व आधुनिक यांत्रिक नोकर-चाकर कामांत तत्पर असतात

आणि त्यांना हाका माराव्या लागत नाहीत. कामाच्या प्रमाणांतच त्यांना पगार द्यावा लागतो; त्यामुळे घुसफूस होत नाही.

जया व जयंत ह्यांनी ठरविलें, की घर सजविण्याच्या मागे न लागतां वेळेची आणि श्रमांची बचत करणारीं साधनेंच आधी घ्यायचीं. त्यासाठी शक्य तेवढे पैसे वांचवायचे आणि अेकअेक साधन खरेदी करून टाकायचें. ह्या खरेदीला कौटुंबिक बजेटांत अग्रस्थान द्यावयाचें. हीं साधनें कल्पनेअितकीं महाग नसतात आणि कांहींची खरेदी हप्तेबंदीने करतां येते, असें त्यांना चौकशीअंतीं आढळून आलें. विजेचा पंखा, सोफासेट, डबल बेड अित्यादींची खरेदी त्यांनी पुढे ढकलली; वर्षभर नवे कपडे न करण्याचा निश्चय केला आणि थोड्याच अवधींत त्यांनी आपलें घर कित्येक आधुनिक साधनांनी सुसज्ज केलें. गृहिणीची धावपळ आणि दगदग कमी झाली. हास्यविनोदाचें आणि खेळीमेळीचें वातावरण निर्माण झालें आणि ह्या साधनांसाठी केलेला खर्च केव्हाच भरून आला. त्यांचें घर समृद्ध झालें. वेळेची ओढाताण अशा रीतीने थांबवतां आली तर पैशाची ओढाताण सुसह्य होअू शकते; नाहीशीसुद्धा करतां येते. गृहिणीला पति, मुलेंबाळें, नातेवाअीक, मित्र-मैत्रिणी ह्या सर्वांसाठी भरपूर वेळ देतां येअून स्वत:चाहि अुत्कर्ष घडवून आणतां येतो.

★ ★ ★

--१४--

# रफू करण्याची कला

वस्त्राला छिद्रें पडलीं तर तीं विणून बुजविण्याचें कसब रफूगाराजवळ असतें. तो युक्तीने सुतें भरून संधान घडवून आणतो. छिद्रें वाढण्यापूर्वीच तीं रफू केलीं तर वस्त्राचें पोत बिघडण्याचें थांबतें. परंतु अशा छिद्रांकडे दुर्लक्ष केलें तर मात्र छिद्रें वाढत जातात व वस्त्राची नासाडी होते. आपल्या कौटुंबिक जीवनांतहि पति-पत्नींनी अेकमेकांच्या किरकोळ चुका किंवा अप्रिय बाबी समजूतदारपणाने सांधल्या नाहीत व तक्रारींचा अतिरेक केला तर संसाराचेंहि फोलकट होअून जातें.

पतीने किंवा पत्नीने अेकमेकांच्याबद्दल तक्रारींचा पुन:पुन्हा अुच्चार केल्याचीं कांही अुदाहरणें नमुन्यादाखल येथे देण्याजोगीं आहेत. पति पत्नीला म्हणत राहतो—

( १ ) नव्या पातळांनी कपाट भरलं आहे; पण माझ्याबरोबर बाहेर येतांना तुला चांगलं पातळ कधीच सापडायचं नाही !

( २ ) माझ्या आअीच्या हातच्या पोळ्यांची सर तुला कांही येत नाही.

( ३ ) कालच दळणाला पैसे दिले ते अितक्यांत सगळे संपले का ?

( ४ ) मी घरीं यायच्या वेळीं मुलांची रडारड कां चालू देतेस ?

अनुक्रम ... दि: ... क्रमांक ... नों. दि. ...

( ५ ) आम्हीं दिवसभर बाहेर कामं करायचीं आणि घरांतहि केर आम्हींच काढायचा का?

( ६ ) तुझीं माहेरचीं माणसं आलीं म्हणजे माझ्या चहा-पाण्याची तरी आठवण होते का?

( ७ ) माझ्या शर्टला तुला गुंड्या लावायच्या नसल्या तर तसं स्पष्ट सांग; नाहीतर लाव तरी.

( ८ ) माझ्या बहिणीला मीं कापड दिलं तर तुझं काय बिघडलं? तुझ्याजवळ नाही ना पैसे मागितले?




**तुटेपर्यंत ताणणें हिताचें नसतें.**

पत्नीच्याहि तक्रारी कांही कमी नसतात—

( १ ) बाकी सगळ्या मास्तरांना शिकवण्या मिळतात; मग तुम्हालाच कां नाही मिळू?

( २ ) तुमचा पगार पुरत नाही; मग अुधार घेअूं नको तर काय करूं?

( ३ ) विजयराव कचेरींतून घरीं जातांना वाटेंत वेणी घेऊन जातात; तुम्हाला माझी नाही कधी आठवण होत ?

( ४ ) शेजारचे मुकुंदराव नाही का संध्याकाळीं घरीं थांबत ? त्यांच्या-प्रमाणं तुम्हाला मुलं सांभाळायला काय झालं ?

( ५ ) रेवतीबाअींची पुरे झाली स्तुति ! वाटलं तर जा त्यांच्या घरीं राहायला ! मला नका सांगू त्यांचं कौतुक !

( ६ ) मोलकरणीच्या भांडणांत तुम्ही नका तोंड घालूं. मला तिच्याशीं दिवस काढायचे आहेत; तुम्हाला नाही.

( ७ ) सांगितलेला जिन्नस कधी वेळेवर येअील तर शपथ ! तुम्ही विसरतां का मुद्दामच असं करतां ?

( ८ ) तुम्ही दाढी करीत नाही; मग मीं तरी तुमच्यासाठी काय म्हणून नटावं ?

ह्यांपैकी कोणत्याहि अेखाद्या तक्रारीचा स्वतंत्रपणें थोडा विचार केला तर ती क्षुद्र वाटते; पण ती अेकसारखी अुगाळली गेली म्हणजे मात्र त्यांतून कटुता निर्माण होते. घरखर्चाला जरूर त्यापेक्षा कमी पैसे पत्नीला द्यावयाचे, पण त्या पैशांच्या हिशेबासाठी सतावून सोडून तिच्यावर पैसे बाजूला राखल्याचा किंवा खर्चून टाकल्याचा आरोप करावयाचा, असें कित्येक गरीब-श्रीमंत घरांतून आढळतें. आपला राग निर्दयपणें व्यक्त करणारे कांही पति निघतात, तर आंतल्या आंत धुसफुसणारे व घुमेपणाने दुःख देणारे पति-पत्नीहि असतात. ह्या शस्त्राची जखम कांही कमी वेदना देत नाही !

दुसऱ्याला कधीच स्पष्ट कांही सांगावयाचें नाही, असें संसारांत चालत नाही. तक्रारींची जाणीव कधीकधी करून द्यावीच लागते. आधी थोडी लाडी-गोडी करून मगच गाऱ्हाणें सांगितलें आणि पुन्हा थोड्या स्तुतीने समारोप केला म्हणजे गोळी घशाखाली अुतरण्यास सोपें जातें ! पण असें न करतां, नुसत्या तक्रारींचाच फाजील नेट लावला म्हणजे त्या ताणाचा परिणाम फाटण्या-मध्ये होतो. अप्रिय गोष्ट घोकत राहणें व युक्तीने आपली तक्रार पटवून देणें ह्यांच्या निष्पत्तींत जमीन-अस्मानाचें अंतर आहे. दुसऱ्याचें वर्तन आपल्या

मर्जीप्रमाणे नेहमी व्हावें, ही अपेक्षा बहुधा फोल ठरते आणि दुसऱ्यामध्ये सुधारणा घडवून आणण्याचा आग्रही प्रयत्न कळसास पोचला म्हणजे तर पति-पत्नींना अेकमेकांबद्दल शिसारी वाटूं लागते. ही अवस्था टाळण्यासाठी तुटेपर्यंत न ताणणेंच हिताचें.

पण घडतें मात्र वेगळेंच ! रात्रीं नेहमी अुशिरा घरीं येणारा पति अुपरति होअून दोनतीन वेळां मुद्दाम लवकर परत आला तर त्याला कोणती शाबासकी मिळते? "आज पत्ते खेळायला कुणी मिळालेलं दिसत नाही." किंवा "कुणीच भेटलं नाही म्हणून स्वारीचा नाअिलाज झाला असेल." अशा शेलक्या शब्दांनी त्याचें स्वागत होतें ! पत्नीने हुषारी दाखवून घरांत विशेष काटकसर केली किंवा शेजारणींच्या भांडणांतून तिने खुबीने अंग काढून घेतलें, तर पतीहि तिची प्रशंसा करीत नाही. अुलट, अगदी क्षुद्र गोष्टींबद्दल अेकमेकांची 'संभावना' करण्याची संधि कांही पति व पत्नी सहसा गमावीत नाहीत. त्यामुळे दोघेंहि असमाधानी राहतात.

जेवणांतील आवडीचा जिन्नस चांगला साधला म्हणजे अितर किरकोळ पदार्थ बिघडले तरी खपून जातें. ह्यां दृष्टीने पति-पत्नींनी अेकमेकांच्या विशेष आवडीच्या आणि हेक्याच्या बाबी सांभाळण्याचा कसून प्रयत्न केला म्हणजे अितर बाबींतील अुणेपणा झाकला जातो. विवाहानंतर कांही काळ पति-पत्नींना अेकमेकांचे दोष ठळकपणें न दिसणें स्वाभाविक आहे. पण कांही वर्षांनी दोषांची प्रखर जाणीव होअूं लागते व गुणांचा थोडा विसर पडून दोषच प्रभावी ठरून खुपूं लागतात; जिभेची धार वाढते आणि ती मोकळी सोडली जाते; पूर्वीच्या अबोल पत्नीसहि अवसान चढतें. जपून वागण्याचा हाच काळ असतो. दुसऱ्याला अप्रिय वाटणाऱ्या बाबींत विशेष दक्षता घेतली व त्याबरोबरच त्याच्या संबंधांतील आपल्या अपेक्षा आटोक्यांत राखल्या तर संसारांत छिद्रें पडणारच नाहीत. वेळींच रफू केलेलें वस्त्र दीर्घ काळ नवें राहतें हें सर्वांना माहीत आहे.

* * *

# बिऱ्हाड, घर कीं नंदनवन ?

"घरांत पाय नाही पसरायचे तर ते पसरायचे कुठे? शिस्त, हुकूम, रांग घराबाहेर नशिबांतून कधीच सुटत नाही. जरा मनासारखं वागण्याची जागा म्हणजेच घर! –" असे अुद्गार वरचेवर अैकूं येतात.

सर्वच कामें आता अितकीं कटकटीचीं झालीं आहेत. की त्यांतून मुक्तता होण्याची प्रत्येकजण वाट पाहात असतो. बाहेरच्या जगांतील गडबड, कटकट, गोंगाट, पीडा, तक्रारी, त्रास, अन्याय, मानहानि ह्यांपासून त्याला सुटका हवी असते.

रविवारीं किंवा सुट्टीच्या अितर दिवशीं बाकीच्या दिवसांचा वचपा काढण्याची अिच्छा बहुतेकांना होते. निजून अुठणें, चहापाणी, दाढी, स्नान, बाहेर जाणें-येणें, जेवण, विश्रांति, पत्ते, सिनेमा अित्यादि बाबतींत अनिर्बंध वागण्यास त्यामुळे अूत येतो. "आज रविवार आहे; अेवढाच तर आमचा हक्काचा दिवस!" असें त्याचें समर्थन केलें जातें.

कारखाना किंवा कचेरी ह्याप्रमाणे घरांतहि घंटेप्रमाणे आणि बिनमाणुसकीने कामें चालावयाचीं असतील तर घरांचें आकर्षण अुरणारच नाही. मनुष्याचें यांत्रिक युगांतील जिणें सुसह्य व्हावयाचें असेल तर त्याला घरीं विश्रांति मिळणें आवश्यक आहे. त्याचा शीण नाहीसा होअून तो दुसऱ्या दिवसाचा ताण सहन करण्यास मनाने व शरीराने ताजातवाना झाला पाहिजे.

ह्या दृष्टीने कितपत प्रयत्न केला जातो ? अनियमितपणा, गबाळेपणा, लहरीप्रमाणे ऊठ-बस आणि ये-जा, वेळीं-अवेळीं खाणें-पिणें ह्यांची खऱ्या विश्रांतीला आवश्यकता आहे काय ? बाहेर परीटघडीचे कपडे घालणारांनी घरांत मात्र कळकट व अपुऱ्या कपडयांत वावरणें जरूरच आहे काय ? कपडे अस्ताव्यस्त टाकल्याने व विस्कटलेल्या अंथरुणावर निजल्याने आनंद वाढतो काय ?

घरांतील अेखाद्या माणसाचा छांदिष्टपणा बाकीचे सांभाळून घेअूं शकतील, पण घरांत मिळवता पति असतो त्याप्रमाणेच दिवसभर कष्ट करणारी पत्नीहि असते. मुलांचे अभ्यास व त्यांचीं शाळा-कॉलेजें असतात. त्यांचे अितरहि कार्यक्रम असतात. घरांत अेखादें माणूस आजारी असतें, तर अेखादा पाहुणा आलेला असतो. अगदी लहान मुलांच्या वेळा संभाळाव्या लागतात आणि म्हाताऱ्या माणसांचीहि प्रकृति जपावी लागते. ह्या सर्वांचें मिळूनच घर बनलेलें असतें व त्या सर्वांनाच आराम हवा असतो. त्या प्रत्येकाची कांहीतरी अपेक्षा असणार व ती पुरी पाडण्यास जागेची, वेळेची, पैशाची कमतरता पडणार हें अुघड आहे. अशा परिस्थितींत प्रत्येकानेच स्वतःस जरा वळण लावून घेतलें तर सर्वांनाच सुख लागेल.

पत्ते खेळण्याची साधी गोष्ट घेतली तरी त्यांतहि नियम पाळावे लागतातच की नाही ? कोणीं कोणाचा भिडू व्हावें ह्याचा निर्णय करण्याची पद्धति ठरलेली असते. पत्ते कोणी पिचावे, कोणीं काटावे, कसे काटावे, कोणीं वांटावे, कसे वांटावे ह्याचे नियम कटाक्षाने पाळले नाहीत तर खेळाची रंगत कमी होते. अगदी गमतीखातर सहलीला जावयाचें ठरविलें तरी आपण कितीतरी बाबी आधी चर्चा करून ठरवितों. कोणीं आधी जावें, कोणीं मागाहून जावें, कोणीं कोणते जिन्नस आणावे, केव्हा निघावें, केव्हा परतावें, कोणते खेळ खेळावे, कोणते कपडे घालावे, ह्यांची योजना केली तरच सहल सुखकारक होते. घरचा व्यवहार तर सहलीपेक्षा कितीतरी जास्त खटाटोपाचा.

कुटुंबांतील घटकांचें आयुष्य चांगल्या रीतीने जावें आणि योजिलेल्या मार्गाने प्रगत व्हावें, त्यांतील सर्वांना योग्य तो वाव मिळावा, प्रत्येकाच्या जरुरी-प्रमाणे त्याची सोय व्हावी, ह्यासाठी घरच्या राहणींतहि कांही संकेत पाळणें

अगत्याचें असतें. हे संकेत सर्वांच्या हितासाठीच मुख्यत: असल्याने त्यांबद्दल तक्रारीस वास्तविक जागा राहूं नये.

सकाळीं निजून अुठण्याची, स्नान करण्याची साधी बाब घ्या. ज्याला लवकर बाहेर जावयाचें आहे, त्याला स्नानास आधी जागा मिळणें जरुरीचें असतें. वेणूताअींनी कपडे धूत बसण्याची ती वेळ नाही. प्रत्येकजण त्याच्या ठराविक वेळीं अुठला, तर घरच्या व्यवहारांची कितीतरी सोय होते. अुशिरा अवेळीं निजून अुठणें हें घरांतील अनेक अडचणींचें मूळ कारण असतें, हें जरा विचार केला तर लक्षांत येअील. नाअिलाज होअीपर्यंत लोळत राहावयाचें, प्रातर्विधींची गैरसोय झाली म्हणजे अस्वस्थता निर्माण होअून दिवसाचा प्रारंभ वाअीट व्हावयाचा, असें कित्येक ठिकाणीं आढळतें. मग प्रसन्नता निर्माण व्हावी कशी? रात्रीं ठराविक वेळीं घरांतील सर्वांनी जेवणास आलेंच पाहिजे, हा अत्यंत अुपकारक नियम किती ठिकाणीं पाळला जातो? ठराविक वेळेला—मग ती वेळ कोणतीहि असो, चहापाणी झालें म्हणजे गृहिणीला विश्रांति मिळूं शकते.

ही रोजची गोष्ट समजा सोडली; तरीपण रविवारीं तरी जरा स्वैर वर्तनाला मोकळीक असावी की नाही? जरूर असावी. पण लहरीपणा किंवा बेफिकिरी ह्यांना थारा मिळूं नये. रविवारीं दोन वाजतां जेवण्याचें ठरविल्या-वर अडीच वाजतां तरी घरीं यावें की नाही? सकाळीं सहाअैवजी दहा वाजतां स्नान करा, पण त्या वेळीं तरी स्नानास हाक मारल्यावर अुठाल की नाही?

प्रपंच हाहि अेक प्रकारचा व्यापार आहे; कुटुंबांतील सर्व लोकांची व्यवस्था पाहणारी, त्यांचा अुत्कर्ष घडवून आणणारी ती सहकारी संघटना आहे आणि तिची अुपयुक्तता माणुसकीप्रमाणेच कार्यक्षमतेवरहि अवलंबून आहे. घराकडे घर म्हणून पाहूं अिच्छिणाऱ्यांनी घराचें घरपण वाढविण्याचा आस्थापूर्वक प्रयत्न केला पाहिजे. फक्त फायदा तेवढा घेण्याची वृत्ति अुपयोगाची नाही. माठांत काय किंवा बंबांत काय, प्रत्येकाने भर घातली तरच मागाहून येणारांना त्यांचा अुपयोग. घर हें सर्व कुटुंबियांचें आहे ह्या भावनेने घराचें नंदनवन करण्यास झटणारांनाच त्याच्या फायद्याची अपेक्षा बाळगण्याचा अधिकार आहे. काम टाळून किंवा पुरेसें काम न करतां पगार अुपटणारे कांही लोक मोठ्या संघटनेंत कांही काळ खपून जातील; पण कुटुंबांतील त्यांची भूमिका अधिक जबाबदारीची व अुपकारक असावयास नको काय?

* * *

# फुकाचें जीवन तरी पाजा!

सगुणाबाअी ह्या अेका प्राथमिक शाळेंत शिक्षिका आहेत. त्यांना दरमहा जो थोडा पगार मिळतो, त्यापैकी दीड रुपयांचे दीडशे पैसे त्या मुद्दाम सुटया पैशांत करून घेतात आणि दररोज वाटेंतील पांच पंगू भिकाऱ्यांना अेकअेक पैसा दान करतात. आपल्या प्राप्तीवर आपल्यापेक्षा कमनशिबी लोकांचाहि कांहीसा अधिकार आहे, तो अधिकार ते स्वत: वजावून घेण्यास असमर्थ असले तरी आपण होअून तो मानला पाहिजे आणि आपल्या कुवतीप्रमाणे आपण दुर्बलांना मदत केली पाहिजे, अशी त्यांची श्रद्धा आहे. आपणांपैकी बहुतेकांच्या पगारांतून प्राप्ती-कर, कर्जाचा हप्ता, चहाची वर्गणी अित्यादींची रक्कम कापून घेतली जाते. वाढलेल्या दराने आपण निमूटपणें जिनसा विकत घेतों. ऋण काढून सण करतों. पण आपल्या खुषीवर अवलंबून असलेल्या लोकांबाबतच्या कर्तव्यपालनांत मात्र नाना सबबी शोधून चुकारपणा करतों. म्हणूनच सगुणाबाअींनी स्वत:वर घालून घेतलेलें बंधन व त्यांची योजना कौतुकास्पद आहे.

ह्यासारख्या कांही गोष्टी घरोघर चालू असतात. अुदाहरणार्थ, आमचे रामभाअू पगार मिळतांच आपल्या आअीला देवधर्मासाठी दोन-तीन रुपये देअून ठेवतात. त्यामुळे सासूबाअींना सूनबाअींच्याकडे अेकअेक पैसा मागत

बसावें लागत नाही. नोकराला कालवण कमी पडूं नये म्हणून तें आधी बाजूला काढून ठेवणाऱ्या गृहिणी कितीतरी आढळतील. ताक वांटणारीं, मधुकरी घालणारीं, विद्यार्थ्यांचे वार घेणारीं पुष्कळ कुटुंबें आहेत. नातलगाच्या मुलाला शिक्षणासाठी ठेवून घेणारे सत्प्रवृत्त लोक कमी नाहीत. बक्षिसें, शिष्यवृत्त्या, नादाऱ्या अित्यादींसाठी श्रीमंतांप्रमाणे गरिबांनीहि रकमा दिलेल्या आहेत.



**रामभाअू आपल्या आअीला देवधर्मासाठी दरमहा पैसे देतात.**

आपल्याला अुपलब्ध होण्याजोगा वेळ आणि आपलें अवधान ह्यांच्या बाबतींत मात्र हा संकेत आपल्याकडून अमलांत आणला जात नाही, असें बहुधा घडतें. कांहींच्याकडे आपण जरुरीच्यापेक्षा जास्त लक्ष विनाकारणच पुरवितों तर कांहींच्याकडे निष्कारण दुर्लक्ष होतें. त्याच्यामागे कांही विशेष प्रबळ हेतु किंवा विचार असतो असें मुळीच नाही. आपण अितरांची मनोगति लक्षांत

घेत नाही, जागरूक नसतों, तारतम्य बाळगत नाही अेवढेंच. त्या कारणाने वागण्यांत कोणतेंच तत्त्व राहात नाही, जीवनाला वळण असें अुरत नाही, गैरसमज निर्माण होतात. भेटेल त्याच्याशीं बोलत बसावें, जो भेटणार नाही त्याला विसरावें, गरज लागली म्हणजे खडबडून जागें व्हावें, रोजच्या जीवन-चक्रांत घरांतल्या अडचणींची व घडामोडींची फिकीर नसावी, असें कित्येक ठिकाणीं चालतें.

काम आणि विश्रांति ह्यांसाठी भरपूर वेळ दिल्यावर अुरणाऱ्या वेळेच्या विनियोगाची यथायोग्य वांटणी करणें कितीजणांना साधतें ? नको त्या बाबतींत मोहास बळी पडून वेळेचा अुधळेपणा होतो आणि खरोखर हितकारक अशा गोष्टींना मात्र साहजिकच टाळा मिळतो. पत्ते कुटत बसणारांना जेव्हा डॉक्टरां-कडून घरच्या आजाऱ्यांसाठी औषध आणण्याची आठवण होते तेव्हा दवाखाना बंद झालेला असतो. मुलांचें प्रगतिपुस्तक महिन्यांतून अेकदा पाहण्यासहि कित्येकांना सवड काढतां येत नाही. ज्याच्याकडे पाय पसरून बसायला आराम-शीर जागा आहे, खायला-प्यायला व्यवस्थित मिळतें, निंदा-कुचेष्टा यथेच्छ अैकायला व करायला सापडते, त्याच्याकडे पुष्कळ फेऱ्या होतात; पण ज्याचें आपल्यावर पूर्वी फार मोठे अुपकार झालेले आहेत, अशाला त्याच्या आजारी-पणांत सावें भेटावयास जाणेंहि पुढे ढकलण्यास क्षुल्लक निमित्त पुरतें. ह्या सर्वांचा आपल्या लौकिकावर परिणाम होत असतो; पण त्याची सहजीं कल्पना येत नाही.

आपण आपल्या रोजच्या वेळेच्या खर्चाचें पद्धतशीर बजेट आखून, दिसायला क्षुल्लक परंतु दीर्घ, सुपरिणामी अशा कित्येक गोष्टींना त्यांत वाव देअू शकूं. तशी बुद्धि आणि थोडी योजना असली म्हणजे पुरे आहे. अुपलब्ध होण्याजोग्या वेळेचा व पार पाडावयाच्या गोष्टींचा आदल्या रात्रीं आढावा घेतला व दुसऱ्या दिवशीं कोणासाठी किती वेळ राखून ठेवावयाचा आणि कशास प्राधान्य द्यावयाचें हें आगाअू ठरविलें, तर कितीतरी गोष्टी आपल्या हातून सहज पार पडतील. शनिवारीं कचेरींतून येतांना मावशीकडे जायचेंच, असें ठरविलें तरच तें जाणें होतें. केव्हातरी लवकर गेलें पाहिजे असें नुसतें म्हणत राहिल्याने तिची भेटण्याची अिच्छा अतृप्तच राहण्याची पाळी यावयाची !

कमी महत्त्वाच्या कामांचीहि अुपेक्षा केली नाही म्हणजे आपल्या पाठीमागेहि लोक आपलें नांव घेतात.

वकील, डॉक्टर, व्यापारी, कारखानदार अित्यादि धंदेवाले लोक खिशांत व टेबलावर नेहमी डायऱ्या बाळगतात व त्यांत पुढील तारखांचीं कामें नोंदून ठेवतात. कॅलेंडरावरती 'मेमो'चा रकाना अशाच नोंदींसाठी योजलेला असतो. केवळ पैशाच्या व्यवहारांसाठीच नव्हे, तर चांगुलपणाच्या व्यवहारांसाठीहि प्रत्येक घरीं अशा सोयींच्या अुपयोगाची आवश्यकता आहे. कारण घरगुती व्यवहारहि कौटुंबिक व सामाजिक जीवनाच्या दृष्टीने जिव्हाळ्याचेच असतात. ह्या नोंदींच्या आधाराने व्यवहार केले म्हणजे धावपळ होत नाही, विसराळूपणामुळे होणारी हयगय टळते, अितरांच्या मानाने आपल्या हातून अधिक औचित्य सांभाळलें जातें. आणि खरें स्वारस्य वेळ राखण्यांतच आहे.

विवाहप्रसंगीं आहेर पाठविणाऱ्यांना आभारप्रदर्शक पत्रें कितीजण धाडतात? परीक्षेला बसलेल्या, नात्याच्या व ओळखीच्या मुलांमुलींचे नंबर आधीच टिपून ठेवलेले असले म्हणजे त्यांचे पेढे येण्याच्या आंतच आपण त्यांचें अभिनंदन करूं शकतों आणि नापास झालेल्यांनाहि सहानुभूति दाखविण्याचें विसरलें जात नाही. वास्तविक, अयशस्वी झाल्यामुळे कष्टी झालेल्यांनाच आपुलकी दाखविणारांची जास्त गरज असते. आप्तमित्रांचे पूर्ण पत्ते, त्यांचे वाढदिवस, त्यांच्या मुलांबाळांचीं नांवें अित्यादि माहिती नोंदवहींत पद्धतशीर टिपलेली असेल तर तिच्या आधाराने आपण कितीतरी आनंद अनायासें प्रसृत करूं शकतों!

पुणें शहराजवळ औंध कँप येथे छातीच्या रोगांचें अिस्पितळ आहे. तेथील अेका रुग्णाला भेटावयाला त्याचा अेक मित्र दर पंधरवड्याला आगगाडींतील गर्दीला न जुमानतां येत असे. पण त्याचा पुण्यांतील जवळचा सुखाचा भाअूद अिस्पितळाकडे घरच्या मोटारींतून जाण्यासहि कधीच वेळ काढूं शकला नाही! स्वकीय आणि गोरगरीब ह्यांच्या सुखदु:खांचा परामर्ष घेअून, त्यांची विचारपूस करून त्यांची मानसिक गरज भागविण्याला फारसे शारीरिक कष्ट पडत नाहीत. आणि हे कष्ट त्रासदायक तर मुळीच होत नाहीत. अुलट ते आपल्याला परमानंद मिळवून देत असतात. भरपूर वेळ मोकळा असणाऱ्या स्वच्छंदी लोकांना

तो आनंद कसा लाभणार? अतिशय व्यासंगी अशा आस्थेवाअीक लोकांनाच तो मिळू शकतो. कारण त्याच लोकांना वेळांत वेळ काढून तो दक्षतेने अुपभोगितां येतो.

रोजच्या कामांतून, विश्रांतीमधून, आळसांतून कांही क्षण वेचून बाजूला काढून दुसऱ्यांविषयीच्या आपल्या नैतिक व सामाजिक कर्तव्यांचा थोडा विचार केला आणि त्याप्रमाणे कृति करण्याचें ठरविलें, म्हणजे सर्व कांही शक्य होतें. आस्था असल्यावर थोड्याशा सरावाने आपलें अवधान आपोआप राहूं लागतें. दुसऱ्याबद्दल माणुसकी दाखवितांना आपल्या गळ्यांत नसतें घोंगडें येअून भलत्या जबाबदाऱ्या आपल्यावर पडूं नयेत ह्यासाठी सावधगिरी बाळगणें योग्यच आहे. पण त्यासाठी धोरण म्हणून मुद्दाम डोळ्यांवर कातडें ओढण्याची किंवा आपलें अंतःकरण पाषाणासारखें कायमचेंच कठोर करून ठेवण्याची आवश्यकता नाही. जरुरीप्रमाणे मन अंमळ घट्ट करतां आलें म्हणजे पुरें आहे.

धरणें बांधून काढण्यांत आलेल्या कालव्यांतील कांही पाणी वाटेंत झिरपून, वाहून वाया जात असतें. हे पाझर व्यवस्थित अडवून शेतीकडे वळविले तर कितीतरी पडीक जमीन लागवडीखाली येअून संपन्न होते व समृद्धि आणते. वाया जाणारे क्षणहि 'सगुणाची चाड' ठेवून ह्या पाझरांप्रमाणे अनुसंधानपूर्वक कारणीं लावले तर आपलें जीवनहि प्रसन्नतेने समृद्ध होअील.

* * *

--१७--

# घरोब्यांतील मित्रमंडळी

अिंग्लंडच्या क्रिकेट संघाचा कप्तान लेन हटन ह्याने ऑस्ट्रेलियांत अुतरल्याबरोबर पत्रकारांना अेक मुलाखत दिली. तींत त्याने संघाच्या पूर्वीच्या दौऱ्यांतील सिडने येथील कसोटीच्या सामन्यामधील अेका प्रसंगाचें गमतीदार वर्णन केलें. ऑस्ट्रेलियाचा गोलंदाज मिलर हा चेंडू आपटून टाकीत होता व त्याचे ओळीने चार चेंडू हटनच्या कानाला चाटून गेले. ह्यावर कांहीतरी कावा लढविला पाहिजे असें हटनने ठरविलें; आणि त्याला आठवलें, की मिसेस हटन आणि मिलर ह्यांचा चांगला स्नेह आहे; त्यांची अिंग्लंडमध्ये बऱ्याच वेळां गाठ-भेटहि झालेली आहे. मग हटन मिलरच्या जवळ जाअून त्याला हळूच म्हणाला, "अरे, मी विसरूनच गेलों होतों. माझ्या बायकोनं तुझं कुशल विचारलं आहे; तिचे स्नेहपूर्वक नमस्कार पोचविण्यास मला सांगितलं आहे." पण त्याची ही युक्ति अुपयोगी पडली नाही. "मिलरनं पुढचेहि सगळे चेंडू तसेच टाकून माझी त्रेधा अुडविली !" असें हटनने आंबट चेहरा करून सांगितलें.

मित्रांचें अेकमेकांकडे येणें-जाणें नेहमी चालतें. ह्या मित्रांपैकी कांही-जणांची व त्यांच्या पत्नींची ओळख होते व साहजिकच त्यांतील कांहींच्या ओळखीचें स्नेहांतहि रूपांतर होतें. पतीचे जे मित्र नाहीत अशा अगदी तिऱ्हा-

अितांशीं स्त्रियांचा स्नेह बहुधा असत नाही. घरोब्यांतील स्त्री-पुरुषांच्या मैत्रीचें स्वरूप कशा प्रकारचें असावें? पतीखेरीज दुसरा पुरुष किंवा पत्नीखेरीज दुसरी स्त्री ह्यांच्याकडे पाहण्याची दृष्टि मदनाचा वेग अुत्पन्न करणारीच असणार असें ज्यांना वाटतें त्यांची गोष्ट सोडूनच येथे विचार केलेला आहे.

वास्तविक पाहतां, कौटुंबिक जीवनांतील आनंदाच्या व दुःखाच्या प्रसंगांत कितीतरी मित्र व मैत्रिणी सहभागी झालेले असतात. ह्या मंडळींचें अेकमेकांशीं वागणें अकृत्रिमच असावयास हवें. संशयाची बाधा होणार नाही अशा विश्वासाचें वातावरण त्यास अर्थातच पोषक होअील. परंतु पुष्कळ वेळां रूढ कल्पनांमुळे आणि सामाजिक दडपणामुळे योग्य त्या गोष्टी केल्या जातातच असें नाही. अगदी जवळच्या नात्याचें माणूसहि– पति आणि पत्नीसुद्धा अेक-मेकांकडून कांही अपेक्षा बाळगून असतात आणि त्या पुऱ्या झाल्या नाहीत तर त्यांची वृत्ति पालटते, तेव्हा जरा दूरच्या नातलगांच्या व मित्रांच्याहि कांही अपेक्षा असणारच. विभक्त कुटुंबपद्धतीच्या राहणीमुळें अशांचें सहकार्य दिवसानुदिवस जास्त जरुरीचें होत चाललें आहे. तेव्हा सहकार्य करणाराच्या साध्या अपेक्षांचाहि अनादर करून कसें भागेल? जरा खेळकर वृत्तीचा अवलंब करण्यास काय हरकत आहे?

माझ्या अेका मित्राच्या आजारी पत्नीला मीं मुंबअी येथे कलकत्ता मेल-मधून अुतरवून घेतलें, तिच्या वैद्यकीय तपासणीची व्यवस्था केली, डॉक्टरांनी लिहून दिलेलीं दुर्मिळ औषधें पैदा करून दिलीं आणि तिला नागपूरच्या गाडींत पुन्हा बसवून दिलें. माझ्या मित्राला ह्यासाठी नागपूरहून मुंबअीला येण्यास रजा मिळणें अशक्य होतें. त्याचें मला मागाहून पत्र आलें तें असें– "विमलने मला तुझे आभार मानावयास सांगितले आहेत. तिच्या आग्रहावरूनच मी हें पत्र लिहीत आहे. मीं विमलला म्हटलें, की तूंहि पण लिही. पण तिने ही कामगिरी माझ्यावरच सोपविली आहे." वास्तविक, विमलसारख्या सुविद्य मित्र-पत्नीने चार ओळी तरी स्वतः लिहावयास हव्या होत्या असें माझ्या मनांत आल्याखेरीज राहिलें नाही. अगदी घरगुती ओळखीच्या पुरुषांना किंवा स्त्रियांना साधें दोन बोटें लांबीचें पत्र लिहावयाची पाळी आली तर केवढी अडचण वाटते! 'सप्रेम', 'आपण', 'आपली' अित्यादि शब्द कटाक्षाने टाळण्यांत येतात. वास्तविक त्यांचें नातें कितीतरी स्नेहाचें असतें. स्त्रियांना अुद्देशून बोलतांना

किंवा लिहितांना पुरुष अेखादे वेळेस तरी वाजवी धीटपणा दाखवितील; पण स्त्रियांच्याकडून तशी अपेक्षा करणें चुकीचें ठरतें. त्यांच्या हातून शिष्टाचार पाळले न गेल्याने दुसऱ्याचा हिरमोड होण्याचे प्रसंग त्यांच्या कल्पनेपेक्षा जास्त वेळां घडतात.

मित्र परगावीं गेला असतांना त्याच्या घरीं मधूनमधून जाअून त्याच्या घरचें कुशल विचारणें व जरुरीचीं कामें करणें ह्यांत कांहीच वावगें नाही. पतीच्या मित्राच्या घरीं अडचण असेल तर त्याच्याकडे जेवणाचा डबा तयार करून पाठविण्याचें काम स्त्रियांनी अवश्य केलें पाहिजे. वसंतरावांची पत्नी परगावीं गेली होती त्या वेळीं त्यांच्या शेजारीणबाअी त्यांना रोज सकाळीं आपल्या घरच्या चहाबरोबर चहा व टोस्ट तयार करून पाठवीत असत व दूधहि तापवून ठेवीत असत. वसंतरावांची पत्नी परत आल्यावर तिने शेजारीण-बाअी व त्यांचे यजमान ह्यांना जेवावयास बोलावून आपली जाणीव व्यक्त केली; अेकट्या वसंतरावांनी केलेल्या आभारप्रदर्शनावर त्या थांबल्या नाहीत.

सुधाताअींच्या पतीच्या आजारपणांत त्याचा मित्र दिनेश ह्याने अतिशय मदत केली. त्याबद्दल सुधाताअींना वाटणारी कृतज्ञता दिनेशाच्या अंगांतील सुंदर स्वेटर अजून दर्शवीत आहे.

परस्पर सहकार्याचे कितीतरी प्रसंग येतात; ह्यापुढे ते अधिकाधिक येतील. विशिष्ट चाकोरी न सोडणारांना मात्र हें सहकार्य लाभणें कठीण दिसतें. प्रवास, यात्रा, खेळ अित्यादींपुरतेंच ह्या सहकार्याचें क्षेत्र मर्यादित न ठेवतां तें वाढविणें सहज शक्य आहे. अर्थात् सर्व कांही गोष्टी संबंधित लोकांच्या देखत अुघडपणें अनुमतीनेच केल्या पाहिजेत. म्हणजे कुटाळ मावशांच्या निंदेची धार आपोआपच कमी होअील. तारतम्य बाळगल्यावर दुसऱ्याच्या अवास्तव टीकेला भिण्याचें कारणच अुरणार नाही.

★ ★ ★

# जीव तडफडण्यापर्यंत कोंडमारा नको !

कितीतरी घरांतून नखरेदार तरुणींच्या ठळक चित्रांचीं कॅलेंडरें भिंतींवर झळकतांना दिसतात. चित्रावरील तारखांचे कागद मात्र चित्राच्या मानानें अगदीच लहान व अस्पष्ट असतात; आणि तेहि बहुतेक वेळां जुने महिनेच दाखवीत राहतात. चित्रें लावायला तारखांचे कागद हें केवळ निमित्त असतें. ह्या कॅलेंडरांना गृहिणी सहसा आक्षेप घेत नाही. कारण त्यांवरील चित्रांतील तरुणीची आणि आपल्या पतीची प्रत्यक्ष गाठभेट होण्याचा संभवच नसतो ह्याची तिला खात्री असते. पण पतीच्या खरोखरच ओळखीच्या किंवा नात्याच्या जराशा बऱ्या स्त्रीचा फोटो कपाटांतील आल्बममध्येहि ठेवूं दिला जात नाही !

तरुण-तरुणींच्या वैवाहिक जीवनांतील प्रारंभींच्या काळांत शारीरिक आकर्षणाला जबरदस्त महत्त्व असतें. मनुष्येतर प्राणी काम भागलें की अेक-मेकांस सोडून जातात; पण सुधारलेल्या मानवानें मात्र अेकाच पतीशीं किंवा पत्नीशीं विवाहाच्या बंधनांत आमरण राहावें, अशी नीति व कायदा ह्यांची अपेक्षा असते. वैवाहिक बंधनें पाळूनहि स्त्री-पुरुषांची चित्तवृत्ति कांही क्षण कळत अथवा नकळत– अितरत्र ओढली जाते, हा नित्याचा अनुभव आहे. पण केवळ त्यामुळें पतिपत्नीच्या शाश्वत नात्यास बाध येण्याचें कारण नसतें.

घरगुती बोके-संन्यासीसुद्धा सिनेमाविषयक मासिकें चाळीत बसतात. पत्नीकडे अथवा सुनेकडे तिची विशिष्ट बहीण किंवा मैत्रीण येते तेव्हा तिची विचारपूस करतांना कित्येकांचें अनुसंधान राहात नाही. आपल्या सुंदर पत्नी-समवेत रस्त्याने जातांनाहि अितर स्त्रियांकडे नजर वळविणारे पुष्कळ असतात. ज्यांना जमेल ते पत्नीला टाळून अितर स्त्रियांना सिनेमाला किंवा नृत्याला नेतात; तर कांही पुरुष पत्नीच्या देखतच अितर स्त्रियांची लाळ घोटतात. ह्या पुरुषांचें त्यांच्या स्वतःच्या पत्नीवर प्रेम नसतें असें म्हणतां येणार नाही.



**कॅलेंडरवरील सुंदर स्त्रियांचीं चित्रें गृहिणीला चालतील; पण आल्बममधे ओळखीच्या स्त्रीचा फोटो तिला खपणार नाही !**

आपल्या पतीला अितर स्त्रियांकडे आकृष्ट होण्यास संधीच मिळूं नये, असा पत्नीचा प्रयत्न असतो. सुसंस्कृत पुरुषांना अशा देखरेखीची आवश्यकताच नसते. कारण कौटुंबिक व सामाजिक बंधनें मोडण्याला ते सहसा प्रवृत्त होत नाहीत. वर्गांतील मागच्या बाकावरील विद्यार्थी त्याच्या पुढील विद्यार्थ्याला चोरून डिवचतो; पण खोडी काढणाराकडे मागे वळून नापसंती दाखविणारा

मात्र नेमका निष्कारण सापडतो ! असें येथेहि कधीकधी घडतें. साधारणतः परस्त्रियांकडे पुरुष आकृष्ट होतो त्या प्रमाणांत परपुरुषांकडे स्त्री आकृष्ट झालेली दिसत नाही; आणि ह्या आकर्षणाची तिला होणारी संवेदना ती लपवीत असते. स्वप्नावस्थेंत परक्या पुरुषासह ती रमली तरी शेजारच्या पतीला तें कसें माहीत होणार ? म्हणून तर तिने पतीला खेचलें तरी त्याला बिनतक्रार गप्प बसावें लागतें !

तरुणपणीं पति व पत्नी ह्यांना अेकत्र आणणाऱ्या व राखणाऱ्या आकर्षणाची ओढ कालांतराने कमी होअू लागते आणि व्यवहारी जीवनास प्राधान्य मिळतें. मालती-माधवचेंच अुदाहरण पाहा ना. तारुण्याचा आनंद लुटून झाल्यावर त्यांचें अेकमेकांविषयी आकर्षण पूर्ववत् अुरलें नाही. माधवची आर्थिक दुर्बलता प्रकट होतांच आपल्या अपेक्षा पार पडण्याचा संभव नाही हें मालतीला कळून चुकलें. माधवची नोकरी, त्याचें काम, त्याचा पगार, त्याचा खर्च, त्याचे मित्र, त्याचे छंद ह्या सर्वांची ती चौकशी करूं लागली. साहजिकच माधवच्या श्रेष्ठत्वाचा फुगा फुटून तो तिला टाळूं लागला.

मुलें-मुली, तरुण-तरुणी शिक्षणाच्या अेकाच चाकोरींतून जातात अेवढ्याने केवळ त्यांचा मानसिक विकास समान होतो असें नाही. आर्थिक परावलंबन, सामाजिक रूढि आणि सतत बाळंतपणें ह्यांमुळे बाहेरील जगाशीं संबंध नसलेल्या पूर्वीच्या स्त्रियांना दुर्बल पतीलाहि देव मानून त्याच्या कलाप्रमाणें मुकाट्याने वागणें क्रमागत व अपरिहार्य असे. आता अवास्तव समतेची फॅशनेबल कल्पना आणि दोघांच्या मानसिक ठेवणीमधील मूलभूत नैसर्गिक भिन्नता ह्यांचा समन्वय साधणें कितीतरी विचारी पतिपत्नींनाहि अवघड जात आहे.

पतीला तरुणपणीं पत्नीवांचून करमत नाही; पण पुढे तोच तिला विचारीनासा होतो ! असें कां घडतें हें तिला अुमगत नाही आणि तोहि तिला समजावून सांगूं शकत नाही. खरें सांगायचें म्हणजे त्याला अधूनमधून हवा असतो साधा रुचिपालट ! पण बिचाऱ्याला लंघन करण्याचेंहि स्वातंत्र्य मिळत नाही ! अशा परिस्थितींत आढळतील त्या गुणांवर समाधान मानून, त्यांवर आधारलेल्या खऱ्या सात्त्विक, टिकाअू प्रेमाची प्रतिष्ठापना वेळींच करून ठेवणें आणि तोल जाअूं न देणें हाच शहाणपणाचा मार्ग आहे.

स्त्री-पुरुषांच्या नैसर्गिक अवस्थेवर कितीहि पांघरूण घातलें, त्यांच्यावर कृत्रिम बंधनें लादलीं तरी त्यांची जन्मखोड पूर्णपणें नाहीशी कशी होणार? ती केव्हातरी अुमटल्याखेरीज कशी राहणार? हें सर्व कळतें, पण मन लवकर वळत नाही! कायदा, समाज व कुटुंब ह्यांच्या बंधनांतील पतिपत्नींनी दुसऱ्या कुणाला चुकूनसुद्धा दृष्टीनेहि शिवूं नये, असा दुराग्रह हितकारक ठरत नाही. मुख्य प्रश्न मर्यादा ओळखण्याचा आणि राखण्याचा, त्याचप्रमाणे प्रतिष्ठा सांभाळण्याचा आहे.

रेशनिंगच्या काळांत व्यापाऱ्याला सरकारी गुदामांतून वांटपासाठी शंभर शेर साखर मिळाली आणि त्याने त्यांपैकी अठ्ठ्याण्णव शेरांच्या विक्रीचा हिशेब दिला की अिन्स्पेक्टर 'बरोबर' असा शेरा देत असे. दोन टक्क्यांपेक्षा जास्त तूट वारंवार आली तरच त्याला जाब विचारला जाअी. त्याचप्रमाणे पति किंवा पत्नी आपल्या वर्तनाचा ९८ टक्के हिशेब समाधानकारक देत असतांना अुरलेल्या २ टक्क्यांकरिता छळणूक करणें कौटुंबिक व्यवहारांत अुपयोगाचें नाही. अेकमेकांचा अेकमेकाला धाक अजिबात नसेल तर तेंहि चालणार नाही! पण अेखाद्या प्रासंगिक गैरमार्गाबद्दल निमित्तावर टेकून असमंजसपणाचें कुप्रदर्शन केलें जातें तें टाळतां येण्याजोगें आहे.

अक्षम्य चुकीबद्दल वेळेवारीं कितीहि कडक शासन केलें तरी त्याबद्दल अढी राहात नाही. पण क्षुद्र गोष्टींकडे कानाडोळा करण्याअैवजी संशयी वृत्तीने त्यांना नसतें महत्त्व देअून, वेळीअवेळीं किरकीर करीत राहिल्याने मात्र प्रासादतुल्य कोठींतहि कोंडमारा होअून जातो; आणि त्यामुळे गुदमरलेला जीव मोकळ्या हवेसाठी तडफडूं लागतो. नदीचा प्रवाह अडविण्यासाठी प्रचंड धरण बांधतात, पण मर्यादेबाहेरील ओढाळ पाणी जरुरीप्रमाणे खाली सोडून देण्यासाठी धरणांतच लहान-मोठे दरवाजे करून ठेवतात, नाहीतर फुगवटयाच्या दावाने धरणच फुटून जावयाचें! घरोघरचीं भिंतींवरील कॅलेंडरें अप्रत्यक्ष रीतीने हेंच सुचवीत आहेत.

* * *

--१९--

# सुखाचा आभास– दुःखाला कारण!

अरविंदाला अशोक-सुधाच्या संसाराचा नेहमी हेवा वाटतो. केव्हाहि जा, सुधाताअी त्याचें हसतमुखाने स्वागत करणार, चहा देणार, चतुराअीने वातचीत करणार. कुठलाहि कार्यक्रम ठरवा, तीं दोघें वेळेवर अुत्सुकतेने तयार. सुधाताअींचे कपडे स्वच्छ व टापटिपीचे असणार, सैपाक साधाच केला तरी त्याला चव असावयाची. ह्याअुलट, अरविंदाच्या घरीं सर्व सुखसोयी केलेल्या असल्या तरी त्याला समाधान लाभत नाही. गृहिणीच्या हातचें ताजें जेवण त्याला स्वतःच्या घरीं कधीच मिळणार नाही. पत्नी नटेल, फॅशन करील, पण गाडीची आणि पार्टीची वेळ हटकून चुकवील! ती दुरून अुठून दिसेल; पण अनौचित्याने रसभंग करील.

अशोक-सुधाचा विवाह होअून पंधरा वर्षें लोटलीं तरी त्यांना अपत्य झालेलें नाही. त्यामुळे तीं दोघेंहि आंतून कष्टी असतात हें अरविंदाच्या लक्षांतहि येत नाही. अशोक त्याच्या मित्राप्रमाणे पदवीधर नाही; पण सुधाताअींनी मात्र विवाहानंतर कॉलेजचा अभ्यासक्रम पुरा केला आहे आणि त्या विद्यार्थिनींच्या आवडत्या शिक्षिका झाल्या आहेत. जरा दुरून पाहणाऱ्या अरविंदाला त्यांच्या संसारांतील रम्यता तेवढी दिसते; पण त्यांनी किती खंत घेतलेली आहे हें त्याला कसें कळणार?

कमल तिच्या धाकट्या जावेबरोबर बाजारांत खरेदीला गेली तेव्हा जावेने आपल्या आवडीप्रमाणे हवीं तशीं पातळें विकत घेतलीं. अिकडे कमल मात्र खट्टू झाली. आदल्याच दिवशीं ती आपल्या पतीबरोबर दुकानांत गेली असतांना, धाकट्या सुमनला वाढदिवसासाठी फ्रॉक घेण्याची तिची अिच्छा पतीने धुडकावून लावली होती. कमलच्या दिराची नोकरी मोठी व संसार लहान तर कमलच्या पतीला पगार बेताचा व संसार मात्र मोठा. अशा परिस्थितींत जावेची बरोबरी करणें व्यर्थ आहे, हें कमलला तिच्या पतीने प्रत्येक वेळीं सांगावयास पाहिजे काय ?

वास्तविक, जावेनेच कमलचा हेवा करावा अशी वस्तुस्थिति आहे. कमलचा संसार गरिबीचा असला तरी समाधानाचा आहे. आर्थिक मर्यादेंत, तिला घरांत भरपूर स्वातंत्र्य असतें. तिची आअी किंवा बहीण तिच्याकडे केव्हाहि राहावयास येअू शकतात, कमलहि त्यांच्याकडे जाते. कमलच्या जावेला मात्र माहेरीं जाण्यास किंवा माहेरचीं 'दरिद्री' माणसें घरीं आणण्यास परवानगी नाही. पतीबरोबर वावरणारी स्त्री वस्तुत: आपली प्रतिस्पर्धि आहे हें पक्कें माहीत असूनहि, तिच्याशीं बळेंच मैत्रिणीप्रमाणे वागण्याचे प्रसंग पत्नीस किती सलत असतील बरें ? तथापि, कमलच्या जावेला हें शल्य लपवून पतिप्रेमाचें लटकें प्रदर्शन करीत राहावें लागतें. कमलला मात्र वाटतें, की जाअू किती नशीबवान !

झकपक कपडे करून वावरणाऱ्या दांपत्यांच्या हावभावांवरून व त्यांच्या बोलण्याचालण्यावरून त्यांच्या खऱ्या जीवनाची, सुखदु:खाची वास्तविक कल्पना अितरांना सहजीं येणें केवळ अशक्य आहे. कांहींना सुखी जीवनाची बतावणी करावी लागते; कांही लोक आपलें दु:ख शांतपणें स्वत:च सोसतात, अितरांना त्याची जाणीव होअू देत नाहीत. पण साध्यासुध्या लोकांची मात्र त्यामुळे फसगत आणि दिशाभूल होते आणि ते आपल्या सुखदु:खांत नसत्या दु:खाची भर घालू लागतात. पैसेवाल्याची श्रीमंती अितरांच्या डोळ्यांत सलते; पण तिच्यामागील तगादा व भुतांडा त्यांना दिसत नाही. नातवाच्या मुंजीच्या वेळीं आजीला शेजारणीच्या बाळाच्या मुंजीचा श्रीमंती थाट आठवतो; पैशाच्या अभावीं शिक्षण सोडून देअून त्याच्यावर वर्तमानपत्रें विकण्याची

पाळी आली आहे हें त्या कशाला बघतील ? अितरांना विलासी जीवनाचें वेड लावणारे कितीतरी सिनेमाकलावंत दररोज झोपेच्या गोळ्या घेत असतात !

'दुरून डोंगर साजरे' अशी अेक म्हण आहे. दुरून हिरवेगार व रमणीय वाटणारे डोंगर जवळ गेलें असतां रुक्ष व भयाण दिसतात; 'जवळ जातां काटेकुटे' असा अनुभव येतो. बगीचासुद्धा सामान्यत: किती सुंदर दिसतो; पण त्यांतील झाडांची व वेलींची व्यक्तिगत नीट पाहणी केली तर काय आढळतें ? पाण्याच्या कमतरतेमुळे सुकलेलीं पानेंफुलें, वठलेल्या फांद्या, पाचोळा, बांडगुळें, कीड, वाळवी, वारुळें अित्यादींपैकी अेखादी तरी पीडा बहुतेकांच्या वांट्यास आलेली असते. झाडांचीं व वेलींचीं दु:खें माळी जाणूं शकतो; पण वरवर पाहणाऱ्या अितरांना तीं कशीं कळणार ?

सामान्य संसारिकांना अितरांचे संसार तेवढे सुखाचे दिसतात व त्यांच्याबद्दल मत्सर वाटूं लागतो. परंतु ह्या आभासामागील घुसफूस त्यांच्या लक्षांतहि येअूं शकत नाही. अितरांचें जीवन व आपलें जीवन ह्यांची पार्श्वभूमि, बैठक व परिस्थिति वेगवेगळी आहे ह्याची कित्येकांना आठवणहि होत नसते ! अमेरिकेला सकलसुखसंपत्ति-वसति मानणारे व भारतांत जन्मल्याबद्दल खिन्न झालेले कांही सुखार्थी आढळतात; ते नेमकें दु:ख तेवढें साधत असतात.

वास्तविक, सुख ही अेक मानसिक अवस्था आहे आणि सुखी दिसणें व असणें ह्यांत कितीतरी अंतर असूं शकतें. अितरांच्या दर्शनी सुखाकडे नजर लावून, अिकडे स्वत:चे संसार मात्र दु:खी करणारे व कटुता वाढविणारे स्त्री-पुरुष कल्पनेपेक्षा अधिक आढळतील. आपल्या वांट्याच्या परिस्थितींतील सुखाचे झरे शोधून काढून ते पाझरते ठेवणें आणि जीवनाची टवटवी वाढविणें प्रयत्नसाध्य आहे. मृगजळाकडे आशाळभूतपणें पाहात बसून कांहीच अुपयोग होणार नाही. भलत्या देखाव्याला किंवा फसवणुकीला बळी न पडतां, आपणांस काय शक्य आहे ह्याचें आकलन प्रथम करून घेतलें पाहिजे. मोठा बगीचा करतां आला नाही तरी खिडकींत शोभेच्या दोनचार कुंड्या ठेवायला कशाची अडचण आहे ?

★ ★ ★

--२०--

# गृहिणीच्या नोकरीचा प्रपंच

विद्याधरने कांही वर्षांपूर्वी अुतरविलेल्या विम्यांचे हप्ते वक्तशीर भरणें महागाअीमुळे व वाढत्या खर्चामुळे त्याला अवघड जाअूं लागलें. अखेर कांही हप्ते थकून, विमा पॉलिसी चालू ठेवणें त्याला अशक्य होअून बसलें. छोटचा सुधा-सुबोधाच्यासाठी दूरदृष्टीने त्याने केलेली व्यवस्था टिकूं शकली नाही आणि तो बेचैन होअून गेला.


ह्यांतून मार्ग काढण्यासाठी त्याची पत्नी लता हिने आपण होअून नोकरी करण्याची तयारी दाखविली. "माझ्या पगारांतून हप्ते भरून पॉलिसी चालू ठेवतां येअील, मुलांना शेजारच्या रमाबाअी व्यवस्थित सांभाळतील, सर्व कांही सुरळीत होअील," असें लताने सांगितलें. ती विवाहाच्या आधी नोकरी करीत होतीच; त्यामुळे तिला आत्मविश्वास होता.

विद्याधरला लताचें म्हणणें मान्य करणें भागच पडलें. त्याने तिला नोकरी मिळवून देण्याच्या कामीं खूपच खटपट केली. अखेर अेका व्यापारी मंडळाच्या कचेरींत तिला हंगामी काम मिळालें. घरचीं शक्य तेवढीं कामें नीट आटोपून ती कामाला जाअी आणि विद्याधर तिला घरकामांत मनोभावें मदत करी. पैसा कमावणें ही वास्तविक पुरुषाचीच जबाबदारी आहे असेंच विद्याधरचें खरें मत होतें; पण आता कितीतरी गृहिणी द्रव्यार्जनासाठी नोकरी

राठा ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम 32900 दि:
क्रमांक 2306 नों. दि.

करीत आहेत. मध्यमवर्गीयांच्या संसारांत ती आवश्यक अशीच बाब होऊन बसली आहे. तेव्हा आपलें कांही जगावेगळें नाही, अशी स्वतःची समजूत घालून विद्याधर आपलें समाधान करून घेई.

आपल्या आर्थिक दुर्बलतेमुळे लताला घरच्या आणि नोकरीच्या अशा दोन्ही कामांचा बोजा अुचलावा लागत आहे ह्याची जाणीव त्याला बोचत होती. लताने कधीच तसें दर्शविलें किंवा बोलून दाखविलें नव्हतें. तरीसुद्धा तिच्यावर आपण अन्याय करीत आहों ही भावना त्याच्या मनांतून जाअीना.



**गृहिणीची नोकरी संसाराला तारकच झाली पाहिजे, मारक नव्हे !**

साहजिकच तिच्यावरील घरकामाचा ताण कमी व्हावा ह्या दृष्टीने तो शेजाऱ्यांच्या कुचेष्टेकडे दुर्लक्ष करूनहि घरांतील अगदी बायकी कामेंहि करूं लागला.

विद्याधर-लताचा संसार अशा रीतीने मोठ्या समजूतदारपणें चालू होता. लताच्या मिळकतींतून विम्याचे हप्ते भरून ते पुन्हा चालू झाले, सर्वांना नवीन कपडे शिवणें शक्य झालें, विद्याधरला नवा गरम सूट मिळाला, घरांत रेडिओहि आणतां आला. सुटीमध्ये प्रवासाला दूर जाण्यासहि सवड मिळाली. मित्रमंडळींची व नातेवाअिकांची ये-जा वाढली, ती काय चहा-चिवडा-सिनेमा-खेरीज ?

साहजिकच, वाढलेल्या अुत्पन्नामुळे बचत वाढावयाच्या अैवजी आवश्यक वाटणाऱ्या खर्चाच्या बाबी वाढून बसल्या आणि लताने नोकरी करावयास लागण्याच्या वेळची ओढाताणीची परिस्थिति पुन्हा निर्माण झाली ! विमा-पॉलिसीचे हप्ते पुन्हा थकूं लागले. अपत्यांची संख्या मर्यादित राहूं शकली म्हणून बरें; नाहीतर आणखी पंचाअीत झाली असती. लताला संसारांतील तिच्य: स्थानाची व पतीच्या असाहाय्यतेची पुरी कल्पना आली व ती त्याचें प्रदर्शन करण्यास धजावूं लागली. तिची पूर्वीची शालीनता आता अुरली नाही. ती पतीची जातांयेतां अवहेलना करूं लागली आणि हळूहळू पतीचें गृहदासांत रूपांतर होण्याची पाळी आली. विद्याधरने ही भूमिकाहि नाअिलाजाने पत्करून संसारसुख टिकविण्याचा कसून प्रयत्न चालविला. लताविषयी त्याला नितान्त प्रेम होतें; तिच्या कर्तृत्वाबद्दल आदरहि होता. त्यामुळे प्रत्येक वेळीं तोच पड खाअून सावरून घेत असे.

कायम स्वरूपाची नोकरी असणारालासुद्धा ती टिकविण्यासाठी कचेरींतील वरिष्ठ व सहकारी यांच्याशीं चांगले संबंध राखणें नेहमीच आवश्यक असतें; आणि हंगामी नोकरींत व कपातीच्या काळांत अशी जपणूक तर जास्तच जरुरीची होअून बसते. लता त्या दृष्टीने विशेष प्रयत्न करूं लागली आणि विद्याधरनेहि त्याला विरोध दर्शविला नाही. कचेरींतून घरीं येण्यास तिला अुशीर होअूं लागला. सुटीच्या दिवशीं कचेरींतील मित्रांबरोबर ती सहल, सिनेमा अित्यादि कार्यक्रमांस जाअूं लागली. नाटकांत काम मिळून त्याच्या तालमीसाठी रात्रीच्या जेवणानंतर तासन्तास बाहेर घालवूं लागली. ह्या सर्वांचा अर्थ समजूनहि हतबल झालेला विद्याधर त्याला आळा घालूं शकला नाही. दृष्टीआडच्या गोष्टींकडे तो दुर्लक्ष करूं शकला; पण लताचीं कचेरींतील खासगी कामें जेव्हा घरीं येअूं लागलीं, तेव्हा मात्र घरांतील गडबडीने त्याच्यामधील पुरुषाला खडबडून जागें केलें. तथापि त्या वेळीं परिस्थिति अवसानांत राहिलेली नव्हती.

लताच्या नोकरीमुळे गृहसौख्यांत प्रारंभीं भर पडत गेली, पण आता मात्र तें सौख्य पार मावळण्याच्या मार्गाला लागलें. घरांतील कोणाचीच मन:स्थिति नीट राहिली नाही. अेका आदर्श संसाराला सुरुंग लागण्याची पाळी

आली. सुधा-सुबोधच्या हितासाठी लता-विद्याधरने अेवढे कष्ट केले; पण त्याच बालकांची अवस्था केविलवाणी झाली. त्यांच्या कोवळचा मनांवर अनिष्ट परिणाम होअू लागला. म्हणजे सबंध कुटुंबच परिस्थितीला बळी पडलें ! असें कधीतरीच घडत असलें व पत्नीच्या नोकरीच्या स्वरूपावर बरेंच अवलंबून राहिलें तरी अशा अुदाहरणांची अितरांवर प्रतिक्रिया मात्र विपरीत होते.

शाळाखात्यामध्ये शिक्षक म्हणून पति आणि पत्नी दोघेंहि काम करतात; परंतु पत्नीच्या पगाराच्या वेळीं अधिकाऱ्यांपुढे स्वतः जाअून, पत्नीचा पगार तिला मिळाल्याबरोबर तो हस्तगत करणारे पति आढळतात, हे सत्य आहे. पशासाठी पत्नीला काम करायला लावायचें, पण तिला थोडेंहि स्वातंत्र्य मिळू द्यावयाचें नाही, अशी ही वृत्ति रानटी स्वरूपाची असून चालू काळाला न शोभणारी आहे. स्वतःची आर्थिक दुर्बलता लक्षांत न घेतां पुरुषी वर्चस्व कायम राखण्याचा प्रयत्न असतो. पत्नीला सोयिस्कर नोकरी मिळणें शक्य असलें व तिच्या प्राप्तीची संसाराला गरज असली तरी कित्येक पति तिला नोकरी करूं देत नाहीत ह्याचेंहि कारण त्यामुळे पतीला वर्चस्व गमावण्याची वाटणारी भीति हेंच असतें.

घराबाहेर जाअून नोकरी करणाऱ्या कितीतरी स्त्रिया आपापल्या संसारास आर्थिक टेकू देअून ते अुभे ठेवीत आहेत. अितकेंच नव्हे, तर घराकडे लक्ष देण्यास पुरेशी फुरसत मिळत नाही ह्या जाणिवेने त्यांतील कित्येक स्त्रिया केवळ गृहिणी असणाऱ्या स्त्रियांपेक्षा अधिक दक्षतेने आपले संसार करीत आहेत. दिवसाचे चोवीस तास आअी घरीं असली तरी ती मुलांना हवी असते ! केव्हाहि खाअू मागायला, डोळ्यांत फुंकर मारायला किंवा कौतुक करायला हक्काचें व प्रेमाचें माणूस शेजारीं, हाकेच्या अंतरावर मुलांना पाहिजे असतें. पण अशा आयांना बाहेरील जगाचा अनुभव मिळत नाही आणि मुलांमुलींचे व्यापक प्रश्न त्यांना नीट समजू शकत नाहीत व ते सोडवितांहि येत नाहीत.

मिळवत्या स्त्रियांचा अनुभव त्यांना गृहिणीच्या कर्तव्यांतहि अुपयोगी पडतो. नव्यानव्या गोष्टी त्यांना बघायला आणि शिकायला मिळतात आणि तुलनात्मक दृष्टीने त्या विचार करून निर्णय घेअू शकतात. त्यामुळे मुलांमुलींना त्यांचा सल्ला अधिक पटतो व त्यांच्याबद्दल आदर टिकून राहतो. प्रत्येक गृहिणीला

अशा अनुभवाची थोडी-फार संधि योग्य वेळीं मिळाली तर तिची पात्रता वाढून कुटुंबाचें हितच साधेल. अर्थात् ह्याची मर्यादा ओळखतां व राखतां आली पाहिजे. पति आणि पत्नी ह्या दोघांच्या संस्कृतीवर व सहविचारावर तें अवलंबून राहील.

कांही झालें तरी गृहिणीची नोकरी संसाराला तारकच झाली पाहिजे; मारक कधीच होतां कामा नये. मुलांबाळांचें भवितव्य त्यावर आधारलेलें आहे. गृहिणीचें द्रव्यार्जन संसाराची आर्थिक समस्या कायमची सोडवूं शकत नाही, म्हणून केवळ तिने नोकरी करूंच नये, असें म्हणणें चुकीचें होईल. परंतु तिच्या नोकरीच्या अुपकारांतून अपकार निर्माण होअूं लागल्याचें समजलें तरी त्याला अटकाव करणें अवघड जातें, ही खरी अडचण आहे. नोकरीसाठी गृहिणीचा किती वेळ आणि जीव खर्ची पडावा हा प्रश्न तर स्वतंत्रच आहे. तिचा पगार रोजच्या घरखर्चासाठी शक्य तों न घेतां तो बाजूला टाकतां आला आणि अगदी जरुरीच्या प्रसंगींच त्याला हात लावण्याचें ठरविलें तर फारच अुत्तम. पण तसें थोडचांनाच शक्य होणार. म्हणून तर अुभयतांच्या विवेकास व समंजसपणास कळकळीचें आवाहन !

* * *

--२१--

# घरच्या गाड्यालाहि वंगण हवें !

अेक प्रदर्शन पाहावयास मी गेलों असतांना तेथील तिकिटें विकणारा व तें घेणारा अेक गृहस्थ ह्यांच्यामधील संवाद माझ्या कानांवर आला. तिकिटें विकणाराने आपल्या टेबलावर पाण्याची अेक लहानशी वाटी ठेवली होती व तिकिटें फाडतांना तो वाटींतील पाण्याने बोटें ओलीं करीत असे. हें पाहून त्या गृहस्थाला मोठें कौतुक वाटलें व त्याने तिकिटें विकणाराला आपल्याजवळची अेक सिगरेट ओढण्यास देअून आपला आनंद व्यक्त केला आणि विक्रेत्याचा आनंदहि प्रदीप्त केला.

सायकल-स्टँडवाला सायकल काढून देतो, टांगेवाला ट्रंक-वळकटीस जरा हात लावतो, रस्त्यांत अुभा राहिलेला मनुष्य थोडें बाजूला सरून वाट करून देतो. असे कितीतरी प्रसंग असतात, की ज्या वेळीं आपण दुसऱ्याच्या दक्षतेचा व मदतीचा फायदा घेतों; पण आपण नुसतें गप्प राहतों, त्याच्या चांगुलपणाची जाणीवहि दाखवीत नाही. त्यामुळे दुसऱ्यावर अन्याय होतो आणि त्याच्या चांगुलपणावर विरजण पडतें !

गंमत अशी, की आपल्यापेक्षा 'मोठ्या' माणसांच्या किरकोळ अुपकारांचेंहि आपल्याला मोठें ओझें वाटतें व त्यांचे आभार मानण्यास आपण विसरत नाही. पण आपल्यापेक्षा 'लहान' माणसांच्या बाबतींत मात्र अशी

जाण दाखविणें सोयिस्करपणें राहून जातें ! मोटारींतून अर्धा-पाव मैल ' लिफ्ट ' देणाऱ्यांच्या अुपकारांचें आपण कितीतरी चलाखीने प्रदर्शन करतों. अुलट बंद पडलेली मोटार ढकलून चालू करून देणाऱ्या पाठीमागच्या पादचाऱ्यांकडे वळूनहि न बघतां कित्येक मोटार-मालक तसेच निघून जातात !

सभेच्या स्थानीं माननीय पाहुणे आले म्हणजे त्यांना अुत्थापन देण्या-साठी मोठ्या दक्षतेने अुभा राहणारा मनुष्य जाग्यावरच बसून राहणारांच्या समुदायांत मूर्ख ठरण्याची पाळी येते ! अुपकारांबद्दल कृतज्ञता किंवा गैरसोयी-बद्दल दिलगिरी व्यक्त करणाराला असाच अनुभव येतो. चांगल्या वळणाच्या अेखाद्या विद्यार्थ्याने आपल्या प्राध्यापकाला मामुली आदर दर्शविला तरी त्याला खुशामतगार म्हणून हिणविण्यांत येतें. वास्तविक, चांगुलपणाची योग्य जाणीव दाखविल्याने प्रसन्न चित्ताचें आविष्करण होत असतें. पण त्याची चव नसणारांच्या अुघड अुपरोधापुढे चांगल्या सवयींचाहि टिकाव न लागून त्यांचें मातेरें होअू लागतें, त्यांचा विकास होणें बाजूलाच राहतें !

अितरांच्या बाबतींत योग्य जाणीव दाखविणें अिष्ट व फायद्याचें अस-ल्याचें विचारांनीं पटण्याचा कांहीतरी संभव असतो; पण अशी जाणीव दाख-विणें जवळच्याच्या– कुटुंबियांच्या बाबतींतहि अगत्याचें असतें हें मात्र क्वचितच ध्यानांत येतें. कौटुंबिक जीवनांत असे प्रसंग घटकोघटकीं येत असतात. घरगुती वातावरणांत कृत्रिमपणास स्थान असतां कामा नये; पण त्याचा अर्थ गोडवे-पणाचीहि हकालपट्टी व्हावी, असा मात्र नाही.

अगदी घरच्यानेसुद्धा आपली सोय पाहिली, आपल्यासाठी गैरसोय सोसली किंवा आपल्यामुळे त्याला त्रास झाला तरी त्याची दखल घेअून, त्याच्या चांगुलपणाबद्दलच्या आपल्या भावना प्रकट केल्या पाहिजेत. त्यासाठी विशेष श्रम पडत नाहीत; जरा सावध राहिलें म्हणजे पुरतें. त्याचा परिणाम मात्र परस्पर संबंध सुधारण्यांत व सुखकारक राहण्यांत होतो. घरची मंडळी झाली म्हणून त्यांच्या चांगुलपणास प्रोत्साहनाची आवश्यकता नसते की काय ? त्यांच्या चांगुलपणाची कोणींच पारख दाखविली नाही तरी तो आपोआप टिकून राहील, हें संभवत नाही. माया, प्रेम, औचित्य, कष्ट, स्मरण, योजना किंवा दक्षता ह्यांकडे लक्ष न देअून कसें भागेल ? घरचा गाडा झाला म्हणून तो काय वंगणाशिवाय चालेल ?

सुशीलने त्याच्या कांही मित्रांना अेका सुटीच्या दिवशीं रात्रीं जेवाय्रयास बोलाविलें तेव्हा त्याच्या पत्नीला सतत खपावें लागलें. हें त्याच्या दृष्टीस पडून तो तिला म्हणाला, "तुला अेवढा त्रास पडेल ह्याची मला कल्पना नव्हती. नाहीतर मीं अितक्या जणांना बोलावलं नसतं. मी जरा पुऱ्या तळायला लागूं का ?" अशीं पारितोषिकें मिळत गेल्यावर गृहिणीच्या श्रमांचा परिहार न झाला तरच नवल !

घंटा वाजतांच त्वरेने, आतुरतेने घराचा दरवाजा अुघडणाऱ्या पत्नीकडे ढुंकूनहि न पाहतां, पतीने सरळ आंत निघून जाणें व तिला "मीं येतांना तूं पाहिलंस वाटतं" असें म्हणून तिच्या दक्षतेबद्दल कौतुक दाखविणें या दोहींतील श्रेयस्कर कोणतें हें काय सांगावयास पाहिजे ? "मला वाटलं आज तुझ्या पुरणपोळीमुळं शाळेला अुशीर होणार; पण नेहमीच्याच वेळेला जेवण झालं की !" असें मुलांनी म्हटल्याने आओला कितीतरी धन्य वाटतें. "तुम्हाला डॉक्टरांच्याकडे फार वेळ थांबावं लागलं असेल, नाही ?" असें आजारी पत्नीने आपण होअून विचारलें तर पति औषधाला अुशीर झाल्याची तक्रार कशाला करील ?

"पाणी छान गार आहे हं !" असें म्हटल्याने तें आणून देणाराला बरें वाटतें. आपल्या अुशिरा येण्यामुळे जेवणाचा खोळंबा झाला तर निमूटपणें पानावर येअून बसल्यानेहि भागतें, तोंडानेच माफी मागावी लागत नाही. दुसऱ्याची वस्तु जागेवर ठेवावयाची राहिली तर ती आणून देतांना "मीं घेतली होती हं" असें म्हणून दिलगिरी व्यक्त करतां येते. "सासूबाओी अंजूला सांभाळतात म्हणून तर माझं बॅडमिंटन होअूं शकतं," किंवा "मला आपलं ह्या सुनेकडे राहायला आवडतं !" असें मनोगत व्यक्त करण्याची संधि न दवडणाऱ्या सुनेची किंवा सासूची प्रसन्नता घरांत निर्भेळ आनंदच खेळवणार हें अुघड आहे.

प्रत्यक्ष बोलून दाखविण्यानेच नव्हे, तर गुपचुप राहिल्याने, स्वर बदलल्याने, मानेने, चर्येने, हावभावाने आणि अितरहि कित्येक मार्गांनी प्रसंगानुरूप धन्यता दाखवितां येते, संतोष व्यक्त करतां येतो. त्यांतील रहस्य अुमगलें म्हणजे कृति सोपी आहे. कृतज्ञतेची भावना चातुर्याने व सहजतेने प्रकट करणें हा मग केवळ सरावाचा भाग आहे. कोणाहि सत्प्रवृत्त माणसाला ही हातोटी सहज साध्य करतां येण्याजोगी आहे.

★ ★ ★

--२२--

# संभाषणाचा ओघ आटूं देऊं नका !

सुरेखा सुमतीकडे गेली असतांना, सुमति तिच्याशीं मोकळेपणाने बोलली, " बाहेर सगळेजण मला चांगलं म्हणतात, पण घरांत मात्र माझं चीज होत नाही, अशी हे नेहमी तक्रार करतात. लोकांना काय माहीत, की हे घरांत घुम्यासारखे बसतात, नाहीतर वस्कन् खेकसतात ! मित्र-मैत्रिणींचं, बहिणीचं आणि भावजयांचं ते कौतुक करतील, पण स्वतःची बायको आणि मुलंबाळं ह्यांचं मात्र त्यांना सगळं वाकडंच दिसेल. अेकहि गोष्ट आमच्या तिरशिंगरावांच्या मनास येत नाही ! " त्यावर सुरेखा अुद्गारली, " म्हणतेस काय, तूं सुमति ? अितका अुमदा माणूस घरीं तुसडेपणा करणं शक्य तरी आहे का ? तुमचंच सगळ्यांचं कांहीतरी चुकत असेल ! "

बाकीच्यांना जें कविहृदय भासतें, तें घरांतल्यांना पाषाणहृदय असल्याचें रात्रंदिवस अनुभवास येत असलें, म्हणजे त्यांची कशी कुचंबणा होते, पाहा. दुरंगी वर्तनाच्या पुरुषांप्रमाणे स्त्रियाहि आढळतात. अितरांना बोलपुतळी वाटणाऱ्या पण घरांत मात्र बोलभांड असणाऱ्या स्त्रिया कांही कमी नाहीत !

कितीतरी पति-पत्नी अगदी नाअिलाज झाला तरच अेकमेकांशीं बोलतात आणि तें बोलणेंहि बहुधा बोलाचालीच्या स्वरूपाचें असतें. त्यांच्या मुलामुलींनाहि घरीं मनमुराद बोलायचें धाडस होत नाही, त्यामुळे तीं मनाचीं कुढीं बनतात.

पति-पत्नी दोघेंहि सुशिक्षित असले, तरी त्यांच्या घरीं असला प्रकार संभवतो. प्रेमविवाहितांचेंहि प्रेम थोड्याच वर्षांनी आटून जातें आणि त्यांना बोलायला जणू विषयच अुरत नाहीत! वाक्चातुर्य मग फक्त अितरांच्यासाठीच अुरतें. पति-पत्नी कधीकाळीं अेकमेकांशीं बोललीच तरी तीं बोललीं नसतीं तर बरें झालें असतें, असें म्हणण्याची पाळी येते. घरांत अेकमेकांशीं बोलण्यापासून मिळणाऱ्या आनंदाची चव नसणारांना, त्याच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता



**अेकमेकांशीं बोलण्यांत त्यांनी अवीट गोडी कायम राखली आहे.**

कशी पटणार? जीवनसाथी बनलेल्यांनी अशा रीतीने संबंध तोडावा किंवा जोडण्याकडे दुर्लक्ष करावें, हें कुटुंबांतील कुणाच्याच हिताचें होत नाही.

म्हणूनच, सुधाताअी आणि मोहनराव ह्यांचें मला मोठें कौतुक वाटतें. त्यांच्या विवाहाला दोन तपें लोटून गेलीं आहेत, तरीसुद्धा त्यांनी अेकमेकांशीं बोलण्यांत अवीट गोडी कायम राखली आहे. ते कोणत्या विषयावर बोलतात आणि काय बोलतात, ह्याला महत्त्व नाही. त्यांचा मुलगा व मुलगी ह्यांच्याशींहि ते भरपूर संभाषण करतात. संध्याकाळीं अंगणांत क्रिकेट खेळणाऱ्या त्यांच्या

छोटचा अरुणने पांच धावा काढल्या, तरी त्याची वर्दी तो धावत येअून देणार; शाळेंत गुरुजींनी शिक्षा केली, तरी तें सांगायला नाही कचरणार. तीच गोष्ट कॉलेजांत जाणाऱ्या त्यांच्या शोभाची. वर्गांतील खोडसाळपणा आणि क्रीडांगणावरील गमती ती किती रंगवन सांगते! सर्व प्रश्नांची खुल्या दिलाने चर्चा करायला कुणालाच संकोच वाटत नाही. त्यामुळे ह्या कुटुंबांत अढी आणि आडपडदा मुळीच नाही. मतभेद, गैरसमज झालेच तर ते तात्काळ दूर होअू शकतात. मुलां-मुलींच्या कानांवरून लहानपणींच योग्य गोष्टी योग्य प्रकारें गेल्या म्हणजे घरबसल्यां त्यांचें ज्ञान वाढतें, तें पुढील आयुष्यांत त्यांना अुपयोगी पडतें.

मालतीबाअींचे पति प्रख्यात सर्जन आहेत. ते कित्येक अवघड केसेसची चर्चा आपल्या पत्नीबरोबर करतात. पत्नीहि त्यांचें बोलणें मन लावून अैकते व प्रश्न विचारते. डॉक्टरसाहेबांना मालतीबाअींशीं चर्चा करावीशी वाटते तें अुगीच नाही. त्या स्वत: शस्त्रक्रिया पाहतात, पेशंटांना भेटतात, आपल्या पतीबरोबर व्याख्यानांना व प्रदर्शनांना जातात, व्यावसायिक लेख वाचतात. अशा रीतीने शक्य तेवढें ज्ञान मिळवून अधिक जिज्ञासू व हुषार श्रोती होण्याचा त्या प्रयत्न करतात. शस्त्रक्रियेला तांत्रिक बाजूप्रमाणे मानवी बाजूहि असते आणि त्या बाजूकडे पुरेंसें लक्ष देण्यास सर्जनला सवड मिळत नाही. पण त्यांची पत्नी ह्या बाबतीत त्याचें ओझें हलकें करूं शकते, कांही सुचवूं शकते. त्यामुळे त्यांना अेकमेकांचा सहवास अधिकच प्रिय होतो. अितर व्यवसायांतील लोकांनाहि हें अुदाहरण अनुकरणीय वाटेल.

कित्येक पति घरीं अबोल कां बनतात, ह्याची चौकशी केली तर क्षुल्लक बाबतींत त्याचा अुगम असतो आणि पत्नी थोडचा संयमाने तो टाळूं शकेल असें म्हणावेसें वाटतें. दिवसभर डोकें, हात आणि तोंड हीं सर्व दुखेपर्यंत श्रम करून पति कामावरून घरीं येतो न येतो तोंच त्याची वाट पाहात असलेली सहचारिणी त्याच्यावर अनेक गोष्टींचा भडिमार करूं लागते. बिचाऱ्याला हवी असते कांही वेळ शांतता आणि विश्रांति; आणि मुलांबाळांशीं दिवसभर काअू-चिअू केलेल्या पत्नीला आता हवा असतो नवरा! पति चिडखोर बनतो आणि पत्नीचा आर्जवी सहवासहि टाळून तो तडक घराबाहेर पडतो. पत्नी कष्टी होअून घराच्या दरवाजांत किंवा गॅलरींत रस्त्यावरील रहदारी पाहात अुभी राहते. पति मित्रां-

बरोबर गप्पागोष्टी करून रात्रीं अुशिरा परततो. तुटलें मन आणि फुटलें मोतीं सांधत नाही !

विवेकी पत्नींना पतींच्या सुखांतच नव्हे तर दु:खांतहि सहभागी झाल्याविना सुचतच नाही. पतीसमवेत काळजी वाहण्याचा आपला विवाहसिद्ध हक्कच आहे, असें त्यांना वाटतें. अशा स्त्रिया पतीला आधार देअून त्याला मार्गदर्शन करूं शकतात; पण पतीने मनमोकळेपणाने सर्व कांही वेळेवर सांगितलें तर ! अडचणी आवाक्याबाहेर गेल्या म्हणजे त्या पत्नीला येअून भिडतात आणि पतीला धीर देअून त्यांतून मार्ग काढण्याची तिच्यावर पाळी येते. पत्नीला विश्वासांत घेतलें म्हणजे आपली आर्थिक दुर्बलता अधिकच प्रकट होअील अशी पतीला भीति वाटत असते. कारण कुठल्याहि विषयावर बोलायला प्रारंभ झाला तरी त्यांतून पैशाचा प्रश्न अुपस्थित होतोच. पत्नीच्या समंजसपणाची पतीला खात्री नसली म्हणजे तो आधीपासूनच असा पवित्रा घेअून ठेवतो, की त्याच्याशीं बोलायला तिने धजूंच नये आणि त्याच्यावर कुचंबणेची पाळी येअूंच नये. अडचणी आणि त्यांवर अुपाय ह्यांची चर्चा पति-पत्नींमध्ये मग कशी होणार ? वास्तविक, नव्या कल्पना, नवे मार्ग सुचायला अेका डोक्यापेक्षा दोन डोकीं अधिक चांगलीं, पण दोघेंहि विवेकी आणि अेकाच ध्येयाने प्रेरित झालेलीं हवेत.

स्त्रियांच्या तोंडीं तीळ भिजतच नाही, कोणतीच गोष्ट त्यांना मनांत ठेवतां येत नाही, अशा समजुतीने आपल्या नोकरीच्या किंवा व्यवसायाच्या ठिकाणच्या गोष्टी पति घरीं सांगत नाही. पत्नीला त्या दुसरीकडून कळण्यांत कमीपणा वाटतो. पत्नीसुद्धा स्वत:च्या नोकरीच्या ठिकाणच्या किंवा आपल्या बॅडमिंटन क्लबांतल्या गोष्टी पतीला सांगण्याचें सोडून देते. कारण त्याला त्या अितक्या क्षुल्लक वाटतात, की तो धड अैकूनहि घेण्यास तयार नसतो, मग त्यांत लक्ष घालायचें दूरच राहिलें ! पुरुषांपेक्षा स्त्रियांना किरकोळ गोष्टींचें महत्त्व अधिक वाटतें, हें पुरुषांनी नेहमी लक्षांत ठेवून श्रोत्याचें काम नीट बजावायला हवें.

मनसोक्त बोलणें म्हणजे अखंड बडबड करणें नव्हे. गृहिणी सैपाक करते, तो सर्वांच्या केवळ पोटभरीचा असून भागत नाही. रुचकर, पचायला सोपे,

असेच मुखप्रिय जिन्नस ती तयार करते आणि आकर्षक रीतीने गरमागरम वाढते. जेवणारानेहि नुसतें अुदरभरण न करतां आस्वादाची प्रशंसा केली म्हणजे जेवण रंगतें. घरगुती संभाषणांतहि असेंच हवें. अेकमेकांचें मन व प्रसंग ओळखून शब्द वापरले, आपल्या बोलण्यांतील दोष मुद्दाम शोधून काढून टाळले, आपुलकी अकृत्रिम असली, म्हणजे त्यांत आपोआप आकर्षकता निर्माण होते. अैकणारानेहि अशा तन्मयतेने अैकावें की बोलणारा मनांतलें सर्व कांही सांगून टाकायला अुद्युक्त व्हावा— अर्धें लक्ष दुसरीकडे असूं नये.

दोघांच्याहि आवडीचे अुद्योग आणि छंद वाढविले म्हणजे संभाषणाला विषयांची वाण पडत नाही. मुलांशीं बोलण्याला प्राधान्य दिलें म्हणजे आअी-बापांविषयी त्यांची आपुलकी टिकून राहते व वाढते. कांही गोष्टी घरांत बोलण्याचें कटाक्षाने टाळावें लागतें, कांही गोष्टींवर कायमचा पडदा टाकावा लागतो. अशा रीतीने दुसऱ्याला व आपल्याला संतोष देअील असें भरपूर बोला; जरूर तेव्हा अबोलाहि राखा; पण सगळ्याचा अुद्देश अेकच—संभाषणाचा ओघ आटूं देअूं नका !

* * *

--२३--

# बेकारीचा दुखणेकरी !

“ रेशनिंग खात्यांतील माझी नोकरी सुटल्यानंतर बेकारीचा अनुभव मला प्रथमच आला. त्या वेळीं सौ. शांतानं धीर दिला, प्रेमळपणानं प्रोत्साहन दिलं, स्वतःचं दुःख लपविलं, शिकवण्या करून आणि डबे भरून देऊन घर चालविलं. जावेनं तिचा छळ केला तरी तिनं चुकूनसुद्धा त्याबद्दल अेक अक्षरहि अुच्चारलं नाही. अुलट माझीच ती समजूत काढायची. त्यामुळंच ही नवी नोकरी लागेपर्यंतचा दीर्घ काळ मी तगूं शकलों . . . ”

वसंताला नोकरी मिळाल्यावर त्याने आपल्या सासऱ्यांना कृतज्ञतापूर्वक लिहिलेल्या पत्रांतील हा अुतारा आहे.

काम शोधणारांच्या मानाने अुपलब्ध रोजगार कितीतरी कमी आहेत आणि मिळालेल्या नोकऱ्यांची शाश्वतीहि सांगतां येत नाही. साहजिकच बहुतेक तरुण काम लागेपर्यंत व त्यांत स्थिर होओीपर्यंत विवाहाचा विचार करीत नाहीत. तरीसुद्धा त्यांपैकी कित्येकांवर विवाहानंतरहि बेकार राहण्याची अधूनमधून पाळी येते. अशा रीतीने प्रत्येक घरांत– निदान प्रत्येकाच्या नात्यांत, रोजगार शोधणारे तरुण व वयस्क लोक असतातच.

नोकरी हुडकण्याच्या दगदगींत माणसाचें स्वत्त्व पार निघून जातें. नोकरी-साठी ज्याची विनवणी करावयाची तो स्वतः अर्जदारापेक्षा अधिक लायक

असतोच असें नाही. तरीपण त्याचे पाय धरावे लागतात; त्याची मिजास व लहर संभाळणें भाग पडतें. प्रत्येक ठिकाणीं बेकाराचा अपमान व तेजोभंग होतो. त्यामुळे त्याचें शरीर व मन हीं दोन्ही कमकुवत होऊन जातात. दिवसभर अुन्हातान्हांत वणवण, पायपीट करून तो विपण्ण मनाने घरीं परततो तेव्हा त्याचा आत्मविश्वास पूर्णपणें नष्ट झालेला असतो. त्याची प्रकृति खराब होत जाते, त्याला कपडे नीट राखतां येत नाहीत, केस कापून घेण्याचेंहि तो पुढेपुढे ढकलतो.

बेकारीच्या काळांत खरी आवश्यकता लायकी टिकविण्याची व वाढविण्याची असते; पण होतें मात्र अुलट! धातूला गंज चढला म्हणजे त्याची चकाकी नष्ट होते. पत्नीपदाची वाट पाहात बसाव्या लागणाऱ्या अुपवर सुंदरीची कमनीयता कमीकमी होत जाते; तद्वतच बेकाराची स्थिति होते. सर्वच दृष्टींनी मेटाकुटीस आल्यामुळे तो भित्रा बनतो. न्यूनगंडामुळे तो ओळखीच्या माणसांना टाळूं लागतो. तो दैववादी, अेकलकोंडा, मुखदुर्बळ व भ्याड न झाला तरच नवल!

पण हें सर्व अटळ मात्र नाही. बेकारीच्या दुखण्यास बळी पडलेल्याची त्याच्या घरीं आस्थेने शुश्रूषा होअूं शकली, त्याची मानसिक अवस्था लक्षांत घेअून त्याला प्रोत्साहन देण्यांत आलें, तर त्याच्या मनाचा तोल टिकून राहण्यास खासच मदत होअील. त्याच्या पत्नीने त्याला बाहेर पडतांना हसतमुखाने यश चिंतिलें, तो घरीं परतल्यावर त्याची विचारपूस केली, त्याच्या चिडखोरपणाकडे दुर्लक्ष केलें, त्याच्या दोषांवर पांघरूण घातलें, संयम राखून अडचणी आटोक्यांत ठेवल्या, त्याच्या लायकीवर विश्वास दर्शविला, तर त्याचें जिणें सुसह्य होअून त्याच्या त्राणाचें जतन होअील. त्यामुळे नोकरी मिळण्याची संधि येतांच ती साधण्यास तो समर्थ राहील. शक्तिपात होअूं न देणें सर्वच रुग्णांस जरुरीचें असतें.

घरांतील आजारी माणसाकडे आपण नाही का विशेष लक्ष पुरवीत? त्याची चिडचिड आपण कुठे मनावर घेतों? घरांतील कटकटी आपण कुठे त्याच्या कानांवर जाअूं देतों? "प्रकृति सुधारत चालली आहे, लवकरच आराम पडेल," असेंच आपण नाही का त्याला सांगत? त्याचें ठणकणारें डोकें व हातपाय

आपलेपणाने चेपल्याने मूळ दुखणें नाहीसें होत नसलें तरी त्याला तेवढ्यापुरतें बरें वाटतेंच की नाही ? बेकारीने बेजार झालेल्याच्या बाबतींतहि समंजसपणाची आवश्यकता असते. म्हणून त्याची पत्नी, आअी-वडील, भाअू-बहीण, भावजया अित्यादि सर्वांनी त्याच्याकडे सहानुभूतीची दृष्टि ठेवली पाहिजे. आजाराप्रमाणेच बेकारीचें गंडांतर कोणावर केव्हा येअील त्याचा नेम नाही, ह्या जाणिवेने तरी रोजगार असणारे बेकारांची अवज्ञा करण्याचे टाळतील काय ?

अर्थात् कांहींच्या दुखण्याप्रमाणे कांहींची बेकारीहि कधीकधी त्यांनीच स्वत:वर ओढवून घेतलेली असते. कारण आपल्या लायकीची किंमत बाजारभावाने किती कमी भरते, हें कटु अनुभवाने पण फार अुशिरा त्यांना पटतें. त्यामुळे होणाऱ्या चुकीचें त्यांना जें भरपूर प्रायश्चित्त भोगावें लागतें त्यांत अितरांनी निष्कारण भर घालण्याची आवश्यकता नाही. स्वत:चा रिकामटेकडा मुलगा नोकरीसाठी हातपाय हालवीत नाही आणि घरांत तो ताणून देतो तरी त्याचे वडील त्याच्या जेवणाखाणाची व कपड्यालत्त्याची व्यवस्था करून देतात, अशींहि अुदाहरणें दिसतात बिचारे आअी-वडील अशा मुलाला दुखविण्यास भितात. विवाहित मुलाच्या बाबतींत आणखी पुन्हा सून व माहेरचीं माणसें ह्यांच्याकडील पत सांभाळावी लागते. अशा बेकारांच्या दुखण्यावर वास्तविक कठोर व जालीम अुपाययोजना वेळीच करावयास हवी. ममतेमुळे किंवा सद्भावनेमुळे त्यांत ढिलाअी किंवा हयगय झाली तर रोग जुनावतो. जुनाट व हट्टी रोग अुपचारापलीकडे जातो आणि शस्त्रक्रियासुद्धा कधीकधी अुपयोगी पडत नाही, असा नित्याचा अनुभव आहे.

नोकरी नसलेल्याने आपल्या चारित्र्याने, वागणुकीने, दक्षतेने, कृतज्ञतेने, अुपयुक्ततेने अितरांची सहानुभूति कमावली आणि त्यांच्या चांगुलपणाचा वाजवीपेक्षा जास्त फायदा घेतला नाही, तर त्याचें थोडें चुकलें तरी घरांतील अितर लोक त्याला संभाळून घेतात व बरोबरीने वागतात, त्याला अुणेंदुणें बोलत नाहीत. पण अेकतर्फी चांगुलपणाची सीमा मात्र मर्यादितच राहिली पाहिजे हें अुघड आहे. ती तशी राहिली नाही तर कुटुंबांतील अेकापायी अनेकांवर अन्याय होअील; व ही गोष्ट कोणाच्याच हिताची नाही.

★ ★ ★

--२४--

# शोभेच्या स्वेटरचें रहस्य

शोभाने आपल्या पतीसाठी स्वेटर विणला, तो किती सुबक आणि सुंदर झाला ! सरस्वतीबाअींचा अेकसारखा सल्ला घेअून तिने तो पुरा केला, विणलेले स्वतंत्र भाग अिस्त्री करून नीट जोडले, गाठी आंत घातल्या आणि पतीच्या वाढदिवशीं सकाळीं त्याला तो घालायला लावून कचेरींत पाठविलें. तेथें प्रत्येकाने त्याच्या स्वेटरची स्तुति केली. सहकारी तरुणी तर स्वेटरला हात लावलावून वीण समजून घेण्याचा प्रयत्न करीत होत्या ! शोभाने सरस्वतीबाअींच्याकडे शिकण्यांत कमीपणा मानला नाही; त्यामुळेच तिच्या कलाकुसरीची अेवढी प्रशंसा होअू शकली.

घराबाहेर पडतांना पत्नी पतीला विचारूनच प्रसंगाला अनुरूप असें पातळ निवडते; वेणी नीट बसली आहे ना, ह्याची त्याच्याकडून खात्री करून घेते. आपल्या कपड्यांना डाग किंवा सुरकुत्या नाहीत ना, हें पति पत्नीला विचारतो. आरशांत पुढून आणि मागून नीट पाहूनच तीं दोघें बाहेर पडतात. अितकी काळजी घेतली म्हणजे ढोबळ दोष तरी राहून जात नाहीत; आवडी-निवडीचा किंवा हट्टीपणाचा प्रश्न वेगळा !

विजयराव आणि त्यांची पत्नी स्वतःच्या आणि अेकमेकांच्या प्रकृतीला किती जपत असतात ! जरा बरें वाटेनासें झालें की ते डॉक्टरकडे जातात;

वरचेवर दंतवैद्याकडून दात भरून घेतात. दरमहा आपलें वजन करून त्याची नोंद ठेवतात आणि त्याला अनुसरून आहार व आचार बदलतात. कांही विकृति आढळली नाही तर त्यांना चैनच पडत नाही! ती थोडी तरी सापडणें व त्यावर अुपाययोजना करणें हा त्यांचा छंदच बनला आहे! साहजिकच, त्यांच्या अुतारवयांतहि त्यांना प्रत्यक्ष दुखण्यांचा त्रास अितरांच्याअितका होत नाही. पण अतिशय थोड्यांना अशी दक्षता घेणें शक्य होओील हें मात्र खरें.



**शोभाने स्वतः विणलेला सुंदर स्वेटर पतीच्या वाढदिवशीं त्याला दिला.**

वाढत्या वयाबरोबर शारीरिक दौर्बल्य वाढत जातें, दोष निर्माण होतात. तद्वतच मानसिक ठेवणींतहि फेरफार होत जातो आणि वागणें, बोलणें-चालणें ह्यांतील चुका दृढतर होत जातात. शारीरिक विकृतीचें दुःख आपल्या स्वतःला भोगावें लागतें, त्यामुळे तें टाळण्याची आपण दक्षता घेतों व प्रकृति नीट राखण्याची शिकस्त करतों. अुलट, दूषणास्पद अशा किरकोळ सवयींचा आघात अितरांनाच सोसावा लागतो, त्यांची प्रतिक्रिया आपल्या लक्षांत सहजीं येत

नाही. बहुतेक पति-पत्नींना आंधळेपणामुळे अेकमेकांचे मोठे दोषसुद्धा दिसतच नाहीत आणि ते आढळले तरी ते नाहीसे करण्याची त्यांना आवश्यकता वाटत नाही ! "त्यांच्यांत अितके गुण आहेत, की त्यांच्या किरकोळ दोषांचा अुच्चार करणंसुद्धा पाप आहे !" असें सीताबाअींना वाटतें, तर "किती वेळां तेंचतेंच सांगायचं ?" असें दुसरे कित्येक नेहमी म्हणतात.

वास्तविक, अशा किरकोळ गोष्टीचेसुद्धा दूरवर परिणाम होत असतात हें लक्षांत येत नाही. आपल्या अपरोक्ष ह्या दोषांची चर्चा चालते, लोक नांवें ठेवतात किंवा टाळूं लागतात, मित्रमंडळींत आणि समव्यवसायी लोकांत प्रतिष्ठा राहात नाही, अितरांवर छाप पडत नाही आणि पडलेली छाप टिकत नाही ! पण ज्याची जाणीवच होत नाही त्यावर अुपाययोजना तरी कोण व कशी करणार ? आणि ही अुपाययोजना पैसे टाकून टॉनिकच्या बाटलीसारखी विकत थोडीच मिळणार ? आखाडयांतील खेळाडूंच्या चुका व त्याच्या अंगचेष्टा प्रेक्षकांनाच जास्त समजून येतात. त्याप्रमाणे आजूबाजूच्या लोकांना हें सर्व कळतें, पण ते गंमत पाहात राहून स्वत:ची फुकट करमणूक करून घेतात.

'स्वभावो दुरतिक्रम:' हें खरें असलें तरी कांही किरकोळ, अनिष्ट सवयींना मुरड घालणें कठीण जाअूं नये. सिमेंट कॉंक्रीट ओतून बनविलेल्या गच्चीच्या कठडयांचा ओबडधोबडपणा छिनीने कमी करतां येतो व त्यांतील छिद्रें सिमेंटच्या प्लॅस्टरने बुजवून कठडयांस सफाअी आणतां येते. लोकर जाडीभरडी असली तर तिचा स्वेटर मअू होणार नाही, पण तो प्रमाणशीर, नीटनेटका, झक्पक् व्हायला काय हरकत आहे ? मेहनत घेअून काळजीपूर्वक केलेला स्वस्त लोकरीचा स्वेटर, अजागळपणें विणलेल्या भारी किमतीच्या लोकरीच्या स्वेटरला मागे सारूं शकतो.

रामभाअूंना नेहमी प्रथमपुरुषी बोलण्याची सवय आहे. त्यांच्या प्रत्येक वाक्यांत 'मी' हा शब्द येणारच. बाबूराव कॉलेजमधील त्यांचे जुने पराक्रम पुन:पुन्हा सांगत बसतात– अितरांना त्यांत रहस्य वाटो अगर न वाटो. शांताबाअींना अितरांच्या समोर पतीचें नसतें कौतुक करण्याची भारी खोड आहे. मधु जेवतांना अुष्टया हातानेच भांडें धरून पाणी पितो. सुमति बोलतांना भलते

अिंग्रजी शब्द वापरते, त्यामुळे अनर्थ होतो ! कपडे चढवत व गुंड्या लावत किंवा कंबर आवळतच विनायक सामोरा येतो. दिसायला निरुपद्रवी अशा गोष्टींचा सामाजिक जीवनावर मोठाच दुष्परिणाम होत असतो.

कसा तें पाहा ! ताटांतील अन्नाचा कबुतरें नाचल्याप्रमाणे विचका करणाराला टेबलावरील जेवणाच्या मेजवानीस बोलावण्याचें धाडस केलें जात नाही. बॅडमिंटन खेळतांना पायाजवळचेंहि फूल अुचलून न देणाराला लोक भिडू म्हणून स्वीकारण्यास टाळतात. कानांतील मळ काढून तो किती निघाला हें पाहण्याची सवय असणारा सभेंत अध्यक्षपदींहि टाक अुचलून हा चाळा चालू ठेवतो ! राजाराणीच्या संसारांतील पति-पत्नीला मोठ्या समाजांत आपलें वागणें बदलतां येत नाही; प्रत्येक जिन्नस स्वत: चाखून तो दुसऱ्याला तीं दोघें आग्रहाने खाअू घालतात ! अशा प्रकारच्या सवयींबद्दल सुसंस्कृत लोकांत तिरस्कार निर्माण होतो आणि वाढत्या दर्जाबरोबर वाढता मान मिळत नाही. लोक बोलून दाखवीत नाहीत, पण पाठीवर अुपहास केल्याखरीज राहात नाहीत.

प्रत्यकाने आपल्या प्रत्येक शब्दाकडे किंवा कृतीकडे तिऱ्हाअिताच्या दृष्टीने चिकित्सापूर्वक पाहिलें, दुसऱ्याच्या मनांतील नाखुषी ओळखून त्याप्रमाणे स्वत:मध्ये सुधारणा केली, अवलोकनाला मननाची जोड दिली, शक्य तेथे दुसऱ्याचीहि मदत घेतली, तर किती बरें होओील ! जिन्नस गुणाने चांगला असला तरी तो तसा दिसावाहि लागतो. पक्वान्न अुत्कृष्ट असलें तरी तें आकर्षक रीतीने मांडून नाजूकपणें वाढलें पाहिजे. अुशी मअू असली तरी तिच्यावरील अभ्रा स्वच्छ व सुबक हवा. पायाला नीट बसणारे बूट चकाकलेहि पाहिजेत ! चांगल्या खेळाला स्टाअिलची जोड नसेल तर खेळाचें तेज पडत नाही, खेळाडूला लोकप्रियता लाभत नाही ! स्वेटरची अूब त्याच्या शानदारपणावर अवलंबून नसते, तरीसुद्धा तो नीटस विणण्याचा अेवढा खटाटोप कां केला जातो ह्याचें रहस्य स्पष्ट आहे.

स्वत:ची प्रकृति स्वत:ला नीट समजत नाही, दुसऱ्याने सांगितलें तरी तें पटत नाही, म्हणून डॉक्टराचा सल्ला घ्यावा लागतो. डॉक्टराच्या सल्ल्या-प्रमाणेच हितकर्त्या मित्राचा सल्ला पति किंवा पत्नी ह्यांना अेकमेकांच्या सल्ल्या-

पेक्षा अधिक मानवतो असा अनुभव येतो. पति पत्नीला स्पष्ट सूचना देअू शकतो, पण पत्नी पतीला तसें सांगण्यास बहुधा धजावत नाही. तिला पतीमधील अुणीवा सहन करून, स्वत:च्या समक्ष होणारी पतीची अप्रतिष्ठा हसण्यावारी न्यावी लागते. कांही कुटुंबांतून पत्नीअैवजी पतीवरच असा प्रसंग येत असेल. अशा ठिकाणीं कौटुंबिक मित्रांचें साहाय्य मिळूं शकलें व घेतलें गेलें तर कितीतरी अप्रियता टळेल. खरा प्रश्न दोषांच्या जाणिवेचा आणि ते सुधारण्याच्या तळमळीचा आहे.

माझ्या परिचयाच्या अेका दांपत्याने मोठ्या खेळीमेळीने अेकमेकांच्या कितीतरी किरकोळ चुका घालवून टाकल्या आहेत. पति-पत्नींचें हें अध्ययन व अध्यापन सतत चालू असतें. त्या दांपत्याला लोकप्रियतेचें फळ चाखावयास मिळून त्यांचा व्यावहारिक अुत्कर्षहि झाला आहे. त्याबद्दल अितरांना हेवा वाटतो; पण त्या यशामागील तपश्चर्येचा कोणीतरी विचार करतो का? शुद्ध मन, खेळकर वृत्ति आणि अुच्च राहणीची तळमळ ह्यांच्या जोडीला तारतम्य आणि सहकाराची भावना असेल तर प्रगति सोपी आहे; तिला गति येण्यालाच काय तो अवकाश.

अेक गोष्ट मात्र खरी, की कांही सवयी मोडणें जड जातें; पण त्या राहूं दिल्याने विशेष कांही बिघडत नाही. पति-पत्नींमधील वितुष्टांत भर न पडतां गोडी कायम राहून, जेवढें साधेल त्याच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न करणें हितावह ठरत नाही. आपल्या प्रीतीच्या माणसाची अितरांवर छाप पडावी, त्याची कोणीं कुचेष्टा करूं नये असें कोणास वाटत नाही? पण नुसतें वाटून काय अुपयोग? त्यासाठी जागरूकतेने व सावधगिरीने प्रयत्न केला पाहिजे ना!

★ ★ ★

--२५--

# शिंकें तुटलें आणि बोक्याचें फावलें!

पति किंवा पत्नी ह्यांची वर्तणूक बऱ्हंशीं समाधानकारक असल्यानंतर किरकोळ गोष्टींसाठी अेकमेकांची छळणूक कौटुंबिक व्यवहारांत अुपयोगाची नाही हें पटतें; पण जिथे अगदी मूलभूत बाबतींतहि प्रमाद घडून संसारास काडी लागत असेल तिथे काय वाट? ज्या चिरेबंदी बांधकामावर संसारसुखाची डौलदार अिमारत अुभी राहते त्या जोत्यांतच पाणी मुरून त्याला तडे जाअूं लागले तर काय करावयाचें?– अेकाने पत्र लिहून अशा अर्थाचा प्रश्न विचारला आहे.

हें पत्र लिहिणाराचा जिच्याशीं विवाह झालेला आहे, तिचा दुसऱ्याकडे आधीपासूनच ओढा होता ह्याची त्या बिचाऱ्याला तेव्हा काय कल्पना? कित्येक वर्षें संसार केल्यानंतर प्रकाश पडला, की त्याच्या पत्नीवर अजूनहि अग्रहक्क चालवूं पाहणारे दुसरे कांही पुरुष आहेत! तिने तशी कबुली लिहूनहि दिली आहे आणि तो दस्तअैवज त्याने बँकेंतील आपल्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टच्या कप्प्यांत बंदोबस्तानें ठेवलाहि आहे! पण तेवढ्याने तिची घसरगुंडी थांबेल अशी त्या पतीला खात्री वाटत नाही. वास्तविक, त्याच्याहीपेक्षा अधिक बिकट परिस्थितींत कितीतरी स्त्रीपुरुष जीवन कंठीत असतील. चित्रगुप्ताची वही

अशांच्या नोंदींनी भरून गेलेली असेल! पण त्यांची संख्या व माहिती कळूं शकत नाही. त्यामुळे अशा आपत्तींत सापडलेल्याला वाटतें, की फक्त त्याच्या अेकट्यावरच काय ती आकाशाची कुऱ्हाड कोसळली आहे!

ह्यांपैकी बहुतेक जण अब्रूला भिअून आपलें दुःख शक्य तेवढें झाकण्याचा प्रयत्न करीत असतात. आपल्या डोळ्यांदेखत किंवा पाठीशीं चाललेला असा दुराचार कुणाला सहन होणार? 'जे आपल्यादेखत घडत नाही त्याला आपण जबाबदार नाही!' अशा युक्तिवादाने दृष्टि चुकविणें अेवढेंच ते करूं शकतात.



... पत्नीचा असा दुराचार कोणत्या पतीला सहन होओील ?

'तिला अिथल्यापेक्षा मुंबअीची हवा जास्त मानवते,' 'तिच्या आअीच्या शुश्रूषेला दुसरं कुणीच नाही,' असें कांहीतरी कारण देअून पुरुष खानावळींतल्या आपल्या जेवणाचें समर्थन करतो. तत्सम आपत्ति कोसळलेली स्त्री तर जिवंत नरकवासच भोगत असते!

अशा प्रसंगीं मनुष्याला कांही सुचेनासें होतें; पण तो दुसऱ्या कुणाचा मनमोकळेपणाने सल्ला घेण्यास फारसा तयार नसतो. कारण ज्याला आपलें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र

अनुक्रम 32900 दि: 1.12.55
93608
क्रमांक ........ नों दि: 11219

दु:ख सांगावें तोच आणखी बभ्रा करीत सुटतो, असा कटु अनुभव त्याला आलेला असतो. त्यामुळे मुख्य दुखणें वगळूनच बाकी सर्व गोष्टींची तो अितरांशीं चर्चा करतो; आणि त्यामुळे आपली फजिती प्रकट होणार नाही अशा समाधानांत डोळ्यांवर कातडें ओढून तो दिवस काढतो.

मनुष्यप्राण्यांत ९८.५ तापाला 'नॉर्मल' ताप असें मानलें जातें. पण कित्येकांचा ताप त्यापेक्षा कमी किंवा जास्तहि असूं शकतो. नाडीचे ठोके दर मिनिटाला सुमारे ७२ पडतात. तरीहि कांहींची नाडी त्यापेक्षा कमी किंवा अधिक वेगाने धावत असते. जे नियम म्हणून सांगितले जातात ते सर्वांना कधीच तंतोतंत लागू पडत नाहीत. माणसामाणसांत थोडाफार फरक राहतोच. तथापि हें लक्षांत घेतलें जात नाही. काडीपैलवानाने लठ्ठ माणसाची चेष्टा करावी आणि मूर्खाने वेड्याला हसावें, असें नेहमीच चालतें. दुसऱ्याच्या लहानमोठ्या दुखण्याला किंवा विकाराला कांही खोल कारण असूं शकतें हें जाणून घेण्याचा कोणी प्रयत्नच करीत नाही.

मोह, फसवणूक, बेसावधपणा, कलेचा नाद, भोगविलासाची आवड, मानसिक दुर्बलता, अगतिकता, सहानुभूतीची गरज, अुपकाराची भावना अित्यादींच्या अमलाखाली 'नॉर्मल' कामवासनेचीं माणसेंसुद्धा सुकाणूवरील त्यांचा हात सुटून कधीकधी भलतीकडेच वाहूं लागतात. 'विषय सेवितां कोण तृप्त झाला ? अिंधनीं निवाला अग्नी कोठे ?' अशी मग त्यांची स्थिति होते ! वास्तविक वैवाहिक बंधन स्वीकारल्यानंतर त्याचे कायदेकानू व नीतिनियम ह्यांचें पालन बिनतक्रार करायलाच हवें. संयमी व सुसंस्कृत माणसें वाममार्गाकडे ओढणाऱ्या वासनेचा मुळांतच बीमोड करून टाकतात. अशा चारित्र्यवान् लोकांच्या आदर्शामुळेच समाजाची धारणा टिकून राहते. सत्प्रवृत्त असूनहि सर्वांना हें नेहमी साधेलच असें नाही, हें मात्र सत्य आहे. अितर मोठ्या रोगांप्रमाणे कामवासनेची ताबेदारी हाहि अेक रोग मानला तरी त्या दोहोंत फरक आहे. अितर रोगांच्या दुखणेकऱ्यांना दु:खाच्या यातना भोगत पडावें लागतें. पण कामवासनेचे ताबेदार प्रमादांचें कुपथ्य करीत राहूनहि वरपांगीं तरी सुख अुपभोगतांना दिसतात, हें दुर्दैव आहे !

कोणताहि रोग किंवा विकार बरा करावयाचा तर प्रथम त्याचें सर्व दृष्टींनी काळजीपूर्वक निदान करून, त्याला अनुसरूनच अुपचार करावे लागतात. कोणत्या हवेमुळे दमा होतो हें कळलें म्हणजे हवापालट केल्याने तो टाळतां येतो. कशाच्या संसर्गाने त्वचारोग होतो हें लक्षांत आलें तर त्यापासून दूर राहतां येतें. सासरा दृष्टीआड झाला म्हणजे तरुण सुनेवरील दडपण कमी होअून तिच्या दुखण्याचा जोर नाहीसा होतो हें समजल्यावर त्या दोघांची फारकत करतां येते.

दुखणेकऱ्याविषयी आस्था आणि आपुलकी असेल आणि दुखणेकऱ्याची वृत्तीहि सहकाराची असेल, तर त्याचा हट्टी रोगसुद्धा लवकर बरा होअू शकतो. मग आपल्या प्रीतीच्या माणसाच्या वैवाहिक नीतिविषयक प्रमादाच्या बावतींत तें कां शक्य होअू नये ? मर्यादेचें चुकूनमाकून अतिक्रमण केलेल्या अशा माणसाला रागाने, तिरस्काराने, अविचाराने, माथेफिरूपणाने तडकाफडकी लाथाडण्यांत आलें, तर त्यामुळे त्याचा आधारच अेकाअेकी सुटून जाअील; ‘ शिंकें तुटलें आणि बोक्याचें फावलें ! ’ असें घडून येअील. त्याची त्या खाअीतून सुटका होण्याची आशाच अुरणार नाही ! म्हणून शक्यतों शिंकें तुटूं न देण्याचा प्रयत्न करणेंच हिताचें होअील.

प्रतिकूल परिस्थितीमुळे आपला धीर खचूं लागला असतांना आपल्याला अनुकूल अशा कित्येक अतर्क्य घटना आपल्या दृष्टीआड, आपल्याला नकळत घडत असतात. त्यामुळे कालांतराने आपलीं संकटें परस्परच दूर होतात आणि विघ्नकर्तेहि पळ काढतात, असा अनुभव येतो. म्हणून चिकाटी धरावयास हवी. मुलावाळांचा व्याप वाढला, दूषित वातावरण सुधारलें, शेजार बदलला, बुद्धि निवळली, मन अितरत्र गुंतलें म्हणजे यक्षिणीची कांडी फिरून, अकल्पित रीतीने परिवर्तन घडून येअू शकतें. ‘ धीर तो कारण, साह्य होतो नारायण ! ’

पति-पत्नींचें अेकमेकांवर दीर्घ काल प्रामाणिक प्रेम असूनहि त्यांपैकी कोणाच्या तरी हातून तात्कालिक कारणामुळे भान न राहून, लक्ष्मण-रेषा अुल्लंघिली जाणें असंभवनीय नाही. अशा प्रासंगिक अपराधाला मोठ्या मनाने, सदयतेने क्षमा केली गेली तर चूक करणाऱ्याला पश्चात्ताप होअून सुधारणेला

संधि व प्रोत्साहन मिळेल. त्यामुळे दोघांच्यांत वितुष्ट आणणारें भूत गाडलें जाऊन, संसारसुखांत विष भिनण्यापूर्वीच तें काढून टाकणें शक्य होईल. काटयाचा नायटा होण्यापूर्वीच तो न दुखवितां काढतां आला तर हें सहज साधेल. सुधारलेल्या माणसांनी आपले प्रश्न माणुसकीनेच सोडविले पाहिजेत— पशूंची गोष्ट वेगळी !

११५१२

--२६--

# नातलगांच्या बदलत्या भूमिका

आगगाडींत माझ्याजवळच्या बाकावर शेजाऱ्यांचा मुलगा आनंद हा बसला होता. त्याला मुंबअीला नुकतीच नोकरी लागली होती व तो सुट्टीच्या निमित्ताने पुण्याला घरीं येत होता. त्याच्या मामाचे अेक मित्र शंकरराव हे शेजारच्या डब्यांत होते. त्यांनी आनंदला पाहतांच ते त्याला आपल्या डब्यांत घेअून गेले. शंकररावांच्या शेजारच्या सीटवर अेक देखणी व चलाख तरुणी बसली होती; तिच्या सहवासाचा लाभ आनंदला मिळावा हा त्याला तिकडे नेण्यांत त्यांचा हेतु. "आता आम्हीं तुझ्यासारख्या तरुण मंडळींनाच जागा खाली करून वाव दिला पाहिजे," असा शंकररावांनी खुलासा केला.

कितीतरी म्हातारे तरुणांच्यावर चोवीस तास पहारा करून त्यांच्या संसाराला विरजण लावीत असतात ! घरांतील वयस्क स्त्री-पुरुष तरुण पिढीवर अितका सल्ला जातां-येतां लादतात व कधीकधी तो अितका गैरलागू असतो, की आपण होअून तो विचारण्यास त्या पिढीला अुत्तेजनच बहुधा मिळत नाही. त्या कारणाने म्हाताऱ्या मंडळींना अुघड विरोध करून दुखवावयाचें नाही, पण आपल्याला पसंत असेल तें करायला सोडायचें नाही, अशी नीति अवलंबिणें तरुण पिढीला भाग पडतें.

'सासूसासऱ्यांना आणि आओीवडिलांना नव्या जमान्यांतील त्यांचें योग्य स्थान कळत नाही,' असें म्हणणाऱ्या तरुण पिढीला तरी स्वत:च्या भूमिकेची जबाबदारी कुठे समजते? कितीतरी स्त्री-पुरुष त्यांच्या मुलांच्या प्राथमिक गरजांपेक्षा स्वत:च्याच सुखसोयींना प्राधान्य देतांना आढळतात- आओीच्या मुद्दाम राखलेल्या नखांना नेल-पॉलिश, तर मुलांचीं वाढलेलीं नखें म्हणजे मातीच्या खाणी! आओीच्या पायांत झोकदार सँडल्स, तर बेबी पायतणें हरवते म्हणून ती अनवाणी! आओीचें पातळ अिस्त्री व स्टार्च केलेलें, तर मुलांचे कपडे मळके व चुरगळलेले! – अशीं कितीतरी अुदाहरणें देतां येतील. दिवसभर



पत्नीने आपल्या आओीला किंवा बहिणीला पत्र पाठवलेलेंहि त्याला खपत नाही!

कामावर जाणाऱ्या स्त्रियांनी सध्याकाळीं लागणारें अन्न सकाळींच शिजवून ठेवणें किंवा सकाळच्या पोळ्या आदल्या रात्रीं करून ठेवणे हें पटूं शकतें. पण क्लबांतील अथवा समाजांतील खेळांत व्यत्यय येअू नये किंवा संध्याकाळीं घराबाहेर पडायला भरपूर वेळ मिळावा म्हणून झोपेस आलेल्या मुलांबाळांना शिळें अन्न वाढणें आणि कच्चा पाव खायला घालणें ह्याचें समर्थन कसें करणार?

थोडाफार पगार मिळविल्याने आणि वाणसामान घरीं आणून टाकल्याने आपली पालकाची भूमिका पार पडत नाही, हें पुरुषांना कळावयास हवें.

प्रत्येकाला सख्खे व अितर, जवळचे व दूरचे असे मिळून कितीतरी नातेवाअीक असतात. त्यांपैकी कांहींचें मिळून अेकेक कुटुंब बनतें. त्यांतहि पति-पत्नी किंवा आअी-बाप आणि मुलेंबाळें अशांसारखीं नातीं नेहमीच विशेष महत्त्वाचीं असतात आणि त्यांस प्राधान्य मिळावयासच हवें. अितरहि कांही नातेवाअिकांना कुटुंबांत कमीअधिक महत्त्वाचें स्थान प्राप्त होतें आणि तें स्थान कुटुंबांतील घटक, त्यांची संख्या, त्यांचीं वयें, संसाराला त्यांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पूर्वी व आता हातभार, त्यांच्या गरजा, अित्यादींवर अवलंबून राहतें. कोणत्यांहि अेका भूमिकेचें अवास्तव महत्त्व दीर्घ काल टिकत नाही. मात्र स्वत:चें प्रस्थ कायम राखण्याचा व तें वाढविण्याचा जो तो प्रयत्न करतो. त्या कारणाने कुटुंबांत नव्याने दाखल होणाऱ्या व्यक्तीला फारच चातुर्याने व सावधगिरीने आपलें बस्तान बसवावें लागतें. प्रत्येक कुटुंबांत कांही चालीरीति रूढ असतात, कांही कुलधर्म असतात, ते मानणेंहि जरुरीचें असतें.

नवविवाहितांना त्यांच्या गद्धेपंचविशींत हें सर्व लक्षांत येत नाही. पति-पत्नीच्या भूमिकाच त्यांना सर्वांत महत्त्वाच्या वाटतात. माधवचेंच अुदाहरण पाहा ना. त्याच्या पत्नीने तिच्या आअीला किंवा बहिणीला पत्र पाठवलेलेंहि त्याला खपत नाही ! त्यांचा फोटोसुद्धा तिने घरांत ठेवायला तिला बंदी आहे ! पतीखेरीज तिला दुसऱ्या कोणाचीहि कधीच आठवण होतां कामा नये— आअीचीसुद्धा ! तिच्या प्रेमाचीं माहेरचीं माणसें तोडल्याने केवळ ती त्याच्या अधिक जवळ येअील ही माधवची खुळी कल्पना ! बाकीचीं पूर्वीचीं नातीं अजिबात नाहीशीं होअू शकत नाहीत, त्यांची गरजहि पण संपत नाही, हें त्याला अद्याप समजलेलें नाही.

अेरवी विवेकाने वागणारांच्याहि हातून ह्यासंबंधांत चुका घडतात. दिनेशने त्याच्याकडे माहेरपणाला आलेल्या त्याच्या बहिणीला बऱ्यापैकी पातळ विकत घेतलें की त्याच्या पत्नीने मुद्दाम जुनेरीं नेसण्यास काढावयाचीं, असें सर्रास चालतें; मग तिचें कपाट कोऱ्या पातळांनी गच्च भरलेलें

असेना का ! त्याचप्रमाणे तिच्याकडे तिची आऔी किंवा बहीण फार दिवसांनी राहावयास आली व तीं माणसें हितगुज करीत बसूं लागलीं की दिनेशच्या चिडखोरपणाला पारावार नाहीसा झालाच म्हणून समजावें ! सामान्यतः पत्नी ही पतीच्या नाखुषीपेक्षा सासरच्या अितर नातेवाअिकांच्या टीकेलाच जास्त घाबरते; तर कधीकधी पति हा पत्नीचें म्हणणें पटलें तरी आऔीची लहर अधिक महत्त्वाची मानतो; तर कधी मावशीच काय, सैंपाकाची बाऔी-सुद्धा घराची सूत्रधार बनलेली असते !

पति-पत्नीच्या भूमिकेस आपल्या अिकडील कुटुंबव्यवस्थेंत अजून तरी दुय्यमच स्थान आहे. तथापि शिक्षणाचा प्रसार, विवाहाच्या वेळचीं वधू-वरांचीं वाढतीं वयें, वंशपरंपरागत समाऔक मिळकतींचा ऱ्हास, विभक्त कुटुंबपद्धतीचा प्रसार अित्यादींमुळे परिस्थिति हळूहळू बदलत चालली आहे. मुलाला पसंत असलेलीच मुलगी आता त्याची पत्नी होऔं शकते आणि मुलगीहि नियोजित वराला कदाचित् नकार देऔल हें गृहीत धरावें लागतें. तरीसुद्धा जुन्या संस्कारांचा पगडा अद्याप कायम आहे आणि घरांत अितर नातेवाअिकांचें महत्त्व कमी होऔं लागलें असलें तरी तें नाहीसें झालेलें नाही. जमिनीचें किंवा घराचें समाऔक अुत्पन्न येत असेल तेव्हा कुटुंबप्रमुख व अितर हिस्सेदार ह्यांच्या स्थानाला भक्कम आर्थिक आधार असतो. पण केवळ नोकरी किंवा रोजगार ह्यांवरच संसार अवलंबून राहूं लागला म्हणजे रोखीने मिळवून आणणाऱ्या माणसाचीच किंमत राहून, त्याचीच पत्नी घरधनीण म्हणून वावरूं लागते. त्यामुळे म्हाताऱ्या मंडळींवरच नव्या पिढीची मनधरणी करण्याची पाळी येते.

सर्वांमध्ये समंजसपणा असेल तर सर्वांनाच सुखाने राहतां येतें; नाहीतर माणुसकीचा खून पडूं लागतो. आपण नाटकांत नेहमी पाहतों, की त्या त्या वेळीं अभिनय करीत असलेल्या पात्रांना भरपूर वाव देण्यासाठी रंगभूमीवरील बाकीचीं पात्रें जरा बाजूला सरतात, तर कधीकधी तेथून निघूनहि जातात. आलटून-पालटून सर्वांनाच पुढे येण्याची संधि मिळाली तरी नायक व नायिका ह्यांनाच जास्त प्राधान्य दिलें जातें. पण त्यांनाहि अधूनमधून मागे राहावेंच लागतें; अेकमेकांची तातातूट कांही वेळ सहन करावी लागते. कांही पात्रांना तर रूपांतर

करून 'डबल रोल' पार पाडावा लागतो. दुसऱ्याचें काम पडून आपलें काम अुठून दिसावें अशा वृत्तीचीं माणसें नाटकाचा बेरंग करतात. अुलट दुसऱ्याच्या कामास भरपूर वाव देअून प्रत्येकाने आपापली भूमिका समजून पार पाडण्याची कोशीस केली तरच नाटक रंगत जातें. सूत्रधाराने हें घडवून आणावें लागतें. पात्रांच्या मर्जीवर तें सोपवून भागत नाही. संसाराच्या रंगभूमीवरहि अशाच रीतीने भूमिका वठवणारा संच हवा.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 32960 दि.
क्रमांक 7358 नों. दि.

# आलेला डाव कसोशीने खेळायचा !

पत्त्यांच्या खेळांत प्रत्येकाच्या वांट्याला पानें तितकींच येतात, पण डाव कमीजास्त येतो. अेक्के-राजे, हुकूम, कटाप रंग, चोर-पानें अित्यादि बाबतींत प्रत्येकाचा वांटा वेगवेगळा असतो. तथापि ज्याला चांगला डाव येतो, तोच कांही प्रत्येक खेपेला जिंकत नाही. कारण कांहीकांहींना आपल्या डावाचें मूल्यच मापतां येत नाही. नीट बोलतां येत नाही आणि आपले खात्रीचे हातहि करून घेतां येत नाहीत, असें दिसून येतें. दैव देतें आणि कर्म नेतें, अशी त्यांची स्थिति होते. ह्याअुलट कांही जण आलेल्या डावाच्या कौशल्यपूर्ण योजनेने अनपेक्षित हात जमवितात आणि जिंकून दाखवितात. डाव कसा येअील हें आपल्या स्वाधीन नसतें; पण आलेल्या पानांतून शक्य तेवढे जास्त हात करणें साध्य असतें. दुर्दैवाने आपल्या वांट्याला सर्वच पानें टाकाअू आलीं तर गोष्ट वेगळी ! पण प्रत्येक वेळीं तसें घडत नाही. खेळणाराच्या चतुराअीला थोडा तरी वाव बहुधा असतोच.

दुसऱ्याला सतत चांगलीं पानें आलीं म्हणून तक्रार करायची नाही; हात सहज होतील अशी खात्री वाटली तरी गाफील राहावयाचें नाही की धांदरटपणा करायचा नाही; आपल्याला पानें कशींहि आलीं आणि भिडूने कितीहि चुका केल्या तरी शेवटपर्यंत कसोशी सोडायची नाही; असा शिरस्ता

आहे. प्रारंभीं आपल्यावर जरी कांही डाव लागले तरी त्याची कसर डाव फेडून पुढे निघूं शकते. जाणते लोक डावावर डाव चांगले येऊन सहज जिंकूं शकणारांचें विशेष अभिनंदन करीत नाहीत; वाओीट डावांचा जास्तींत जास्त चांगला अुपयोग करून न हटणारालाच ते शाबासकी देतात. खेळणाराचें कसब प्रतिकूल परिस्थितींत प्रत्ययास येतें; चांगला डाव येणारा अुगीचच आपल्या कर्तबगारीच्या भ्रमांत फुशारकी मिरवीत असतो !

पिचून वांटलेले सर्व पत्ते बाहेरच्या बाजूने सारखेच दिसतात; पण प्रत्येक पत्त्याची डावांतील किंमत मात्र निरनिराळी असते. तसेंच माणसाच्या कपाळा-



**खेळणाराच्या चतुराओीला थोडा तरी वाव बहुधा असतोच.**

वरील ब्रह्मलिखितहि वेगवेगळें असतें. कुणी बुद्धिमान, तर कुणी बुद्धिहीन असतो. कुणी निसर्गत:च सुदृढ असतो, तर कुणी रोग घेअूनच जन्मास येतो. कुणी गर्भश्रीमंत असतो, तर कुणी निर्धन कुटुंबांत निपजतो. कुणाला प्रेमळ आओी-वडिलांचें छत्र दीर्घ काळ लाभतें, तर कुणाला मातृसुख आणि पितृसुख कधीच अनुभवास आलेलें नसतें. कुणाला शिक्षणाची संधि मिळते, कुणाला

मिळत नाही. कुणाच्या घरांत अेकोपा असतो, तर कुणाच्या घरांत नेहमी बखेडे चालू असतात. अशा रीतीने प्रत्येक जण कांही गाठोड्यानिशीं विशिष्ट परिस्थितींत जन्मतो व वाढतो. त्याच्या वैयक्तिक व कौटुंबिक जीवनाची आणि सामाजिक प्रतिष्ठेची पातळी सामान्यतः त्यावरूनच ठरून जाते. तथापि कांही जण ही कोंडी फोडून शेवटच्या पाटीपर्यंत मजल मारूं शकतात, असें दिसून येतें. "दैवायत्तं कुले जन्म, मदायत्तं तु पौरुषम्" ही कर्णाची अुक्ति सुप्रसिद्धच आहे.

पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या परीक्षेंत लायकी सिद्ध होणाऱ्या सर्वच अुमेदवारांना मोठी सरकारी अंमलदारी मिळते असें नाही. वैद्यकीय तपासणी कांहींच्या आड येते आणि मग त्यांना खासगी नोकरींत कमी पगारावर दिवस काढावे लागतात. कांही कारणामुळे योग्य वयांत योग्य परीक्षा देतां आल्या नाहीत तर त्यामुळे कायमचें नुकसान होअून बसतें. जो साहेब व्हायचा, त्याला कारकुनी करावी लागते ! डॉक्टर व्हायचा, त्याला कंपाअुंडर होण्याची पाळी येते ! पण त्यामुळे हाय खाअून थोडेंच भागतें आहे ! कांहींना दुसऱ्या अेखाद्या क्षेत्रांत पुढे येअून भरपाअी करतां येते. विरंगुळा म्हणून लावून घेतलेल्या निरुपद्रवी छंदामुळे सुखाच्या वाऱ्याची झुळूक मिळून जीवन सुसह्य होतें. अितकेंच नव्हे, तर कधीकधी लौकिक व पैसाहि प्राप्त होतो. मुंबअी कॉर्पोरेशनच्या शाळांतील कांही पट्टेवाल्यांनी नोकरी आणि संसार सांभाळून हौसेने आवश्यक त्या परीक्षा दिल्या; त्यांना आता शिक्षकांची जागा मिळाली आहे. पुढे ते मुख्याध्यापकहि होतील.

लाभलेल्या पतीला भला समजणें, मिळालेल्या पत्नीला गृहलक्ष्मी मानणें, हा धोपटमार्ग सोडण्याला तसेंच विशेष विपरीत कारण हवें. जोडप्यांनी अेकमेकांच्या गुणांवर भर देअून आणि दोषांची प्रखरता कमी करून संसार हाकावा लागतो. चुकून वाकड्या वाटेने गेलेला पुन्हा सरळ मार्गावर येअूं शकतो. परिस्थिति फिरली म्हणजे वागणेंहि बदलून मिळतें करावें लागतें. अुदाहरणार्थ, मुलीच्या सासरची श्रीमंती आणि प्रतिष्ठा मावळू शकते, धंद्यांत ठोकर बसूं शकते, चांगली नोकरी असणारा पति बेकार होअूं शकतो. अशा वेळीं नको त्या प्रसंगांना तोंड देण्याची पाळी पत्नीवर येते. त्याचप्रमाणे पत्नीची प्रकृति

ढासळून गृहिणीची भूमिका पार पाडण्यास ती असमर्थ होअू शकते. विवाहाच्या वेळीं अनुरूप असलेल्या पति-पत्नींत पुढे अपायकारक तफावत आणि विषमभाव निर्माण होण्याची शक्यता असते. पत्त्यांतील भिडू हे कांही नेहमीच अेकमेकांच्या पारखीचे नसतात. तरीपण त्यांना अेकमेकाला आणि अेकमेकाच्या बऱ्या-वाअिटाला जुळवून घ्यावें लागतें. जीवनांतहि असाच संयोग घडवून आणायला नको काय? ‘जैसा जोडफळांचा सांधा, तैसा सुखदु:खाचा बांधा!’

आअी-बाप, मुलगे-मुली, सासू-सून, भाअू-बहिणी हेहि आपल्या कुटुंबाचे घटक असतात. त्यांच्यापासून आपल्याला कांही फायदे मिळतात, तेव्हा कांही तोटयांसहि आपण तयार असायला हवें. आपल्या अपत्यांपैकी गुणी निघालेल्यांचें श्रेय आपल्या स्वत:कडे घ्यावयाचें आणि बाकीच्या अपत्यांच्या बाबतींत आपला संबंध सोयिस्करपणें झटकारून कानांवर हात ठेवायचे, असें कित्येक घरांतून चालतें. वास्तविक आनुवंशिकता शास्त्राशीं हें विसंगत आहे. कारण निसर्गाचे हस्तक, ‘ज्याचें त्याला आणि गाढव ओझ्याला’ अेवढीच आअी-बापांची मर्यादित भूमिका असते. कोणत्या गुणांचीं मुलें अुत्पन्न व्हावींत हें आअी-बापांना मुळीच ठरवतां येत नाही. मग त्यांनी असा पक्षपात कां करावा?

आपल्या भावंडांची संख्या आपण ठरवूं शकत नाही; त्यांतला आपला अनुक्रमहि आपल्या हातीं नसतो. बहिणींच्यापैकी कांहींचे विवाह लवकर जमतात. कुणाला तरुणपणींच वैधव्य प्राप्त होतें, तर कुणाला अविवाहित स्थितींतच आयुष्य कंठावें लागतें. भावांपैकी कांहींच्याच शिक्षणास पैसा पुरा पडतो. कांहींना वडलोपार्जित अिस्टेट आयती अुपभोगायला मिळते, तर कांहींच्या भोगाला तिचें लचांड मात्र येतें. अेखाद्या व्यक्तीच्या दुष्कर्मामुळे सबंध घराण्यालाच कलंक लागतो आणि त्यांतील निरपराधी जीवांनाहि तोंड बाहेर काढतां येत नाही. अशा शरमिंध्या परिस्थितींतहि अुमेद खचूं न देतां मुलांबाळांच्या अुन्नतीकडे लक्ष पुरविलें तर त्यांच्या आधाराने मनुष्यांतून अुठलेल्यांनाहि पुन्हा चांगले दिवस प्राप्त होअून नव्या पर्वास आरंभ होतो, ह्याचीं कित्येक अुदाहरणें दाखवितां येतील.

जीवनकलहामध्ये टिकाव धरण्यास जे प्राणी अधिक लायक त्यांनाच चिरकाल टिकण्याचा मान मिळतो. ह्रीच गोष्ट मनुष्यमात्रासहि लागू आहे.

असमर्थ झालेल्यांची जागा समर्थांनी घ्यावी, लायकीला वाव मिळावा, कर्तबगार लोकांनी नवीं घराणीं अुदयास आणावीं, हें योग्यच आहे. अशा स्थित्यंतराची शक्यता हेंच विवेकी लोकांच्या धारणेचें जीवन आहे. रंकाचा राव होअूं शकतो. लहानपणापासून आजारी असलेला रोगमुक्त होअून दीर्घायुषी बनूं शकतो, हें आपण पाहतोंच.

आगगाडींतून व बसमधून कांही लोक अुतरतात आणि त्यांची जागा नव्यांना मिळते. पण त्यासाठी दीर्घ काळहि वाट पाहात थांबावें लागतें. प्रवास करूं अिच्छिणाराने गर्दीच्या भीतीने घरांतच बसून राहावयाचें म्हटलें तर त्याला कधीच यात्रा घडायची नाही ! आपल्या कौटुंबिक समस्यांनी घाबरून न जातां, आपण आपला अुत्साह आणि भवितव्यावर श्रद्धा टिकवायला हवी. पत्त्यांच्या खेळांत राखून ठेवलेलीं दुर्री-तिर्रीसारखीं किरकोळ पानेंहि हात देअून जातात. पण कुणाला ? शेवटपर्यंत अवधान राखील त्याला ! हताश होअून डाव अुधळणाराला नाही !

★ ★ ★

--२८--

# पाळण्याच्या परीक्षेंत रीतीलाच महत्त्व !

माझे अेक वर्गमित्र दर वर्षी त्यांच्या 'स्थळांच्या' वारींत माझ्याकडे येतात तेव्हा आमच्या बरोबरीच्यांना मुलगे व मुली किती आहेत ह्याची न चुकतां अुजळणी करतात. त्यांना स्वत:ला आतापर्यंत दोन मुलगे व चार मुली आहेत. अपत्यांच्या बाबतींत दुर्दैवी ठरल्याची जाचणूक त्यांना नेहमी कष्टी करीत असते. अितरांच्या सुटसुटीत संसारांचा त्यांना साहजिकच हेवा वाटतो. कॉलेजांत असतांना 'भारताची लोकसंख्या संपत्ति-साधनेच्या मानाने भरमसाट वाढत आहे' ह्या विषयावरील त्यांच्या मुद्देसूद भाषणास वक्तृत्वस्पर्धेंत पहिलें बक्षीस मिळालें होतें !

कुटुंब-नियोजनाच्या आवश्यकतेविषयी आता वाद अुरलेला नाही. भारत सरकार येत्या पांच वर्षांत ग्रामीण विभागांतून दोन हजार व शहरांतून तीनशे कुटुंब-नियोजनकेंद्रें स्थापन करणार असून, त्या कार्यक्रमावर पांच कोटि रुपये खर्चणार आहे. प्रत्येक दांपत्याला तीन अपत्यें असलीं म्हणजे पुष्कळ झालीं, असें मत रूढ पावत आहे. ह्यासंबंधांत वधूचें मत समजून घेण्यासाठी पाहण्याच्या वेळीं तिला प्रश्नहि विचारण्यांत येअू लागले आहेत. त्यांतील औचित्याचा भाग सोडला तरी ह्या महत्त्वाच्या बाबीच्या जाणिवेचें तें खासच निदर्शक आहे.

"तुम्हाला आणखी अेक मुलगा असायला कांही हरकत नाही," "गोऱ्या आयांनी जास्त मुलींना जन्म देणें हें त्यांचें कर्तव्यच आहे," "तुम्ही आणखी अेक चान्स घ्या; तीन मुली म्हणजे कांही फार नाहीत," "भावाला बहीण आणि बहिणीला भाअू हवाच !"– अशा तऱ्हेचा सल्ला व अुपदेश नेहमी अैकूं येतो. अपत्यांच्या संकल्पांतील मुलगे व मुली ह्यांच्यामधील अिच्छित वांटणी प्रत्यक्षांत अुतरत नाही, हें त्याचें कारण असतें. मुलीच असणारांना मुलग्याचा हव्यास असतो, तर फक्त मुलगे असणारे मुलीची हाव धरतात. त्यामुळे विवेकी मनाचीहि जागरूकता कमी होते; अपत्यांची अेकूण संख्या मर्यादेबाहेर वाढूं लागते. हवें तें दान न पडतां नको तें दान पडत राहिलें म्हणजे डाव अंगावर येतो– तसेंच कांहीसें येथे होतें.

अपत्यांच्या कमाल संख्येविषयी विचार पक्का झाला आणि त्या संख्येच्या मर्यादेंत वांटयास येणारे मुलगे व मुली ह्यांवर समाधान मानावयाचें असा निश्चय केला तरीसुद्धा हीं अपत्यें केव्हा व्हावींत हा प्रश्न अुरतोच ! आणि तो कांही कमी महत्त्वाचा नाही. म्हातारपणीं आणखी मूल न होणें अिष्ट हें अुघड आहे. रांगत पुढे येणारें बालक नव्या सूनबाअींचेंच असणार, ह्या खात्रीने पाहुणा मोठ्या अुत्सुकतेने त्याचें कौतुक करूं लागतो; पण रहस्यस्फोट होतांच गंमत अुडते ! आधीचीं अपत्यें व शेंडेफळ ह्यांत फार वर्षांचें अंतर असलें म्हणजे त्या बिचाऱ्याच्या विकासाला अडथळा प्राप्त होतो आणि थकत चाललेल्या आअीबापांना त्याच्या भवितव्याबद्दल अेकसारखी काळजी वाटत राहते.

हें शेंडेफळ सोडा, पण बहराच्या काळांतील अपत्यांचा अवतार केव्हा व्हावा ? तरुणपणीं हरिणीसारखी वेण असतांना पाळणा हलणें आअी-बाप व मुलें ह्या सर्वांच्याच दृष्टीने हितावह असतें. आअी तिच्या त्या वयांत मुलांच्या वाढीस अधिक चांगला हातभार लावूं शकते. योग्य वयांतच मनोदयाप्रमाणे अपत्यें होअून गेलीं म्हणजे राहून गेलेल्या हौसेसाठी आणखी अेकदा जुगार खेळण्यास वाव राहतो आणि आअी वयस्क होण्यापूर्वीच कर्तव्यमुक्त होअूं शकते. बापाची कौटुंबिक जबाबदारीहि त्याच्यांतील जोम नाहीसा होण्यापूर्वीच पार पडते. हें दांपत्य मग कर्तव्यपालनाच्या समाधानाने संख्येने मर्यादित आणि म्हणून कृतज्ञ अशा मुलांमुलींच्या सहकार्याने आपल्या स्वतःकडे लक्ष

देण्यास मोकळें होतें. व्रतें, यात्रा, प्रवास, छंद, समाजसेवा ह्या सर्वांस हा काळ फार सोयीचा असतो. पण योजलेलीं अपत्यें पहिल्या कांही ठराविक वर्षांत जरि झालीं नाहीत तर आओ-बापांना स्वतःच्या पुढील आयुष्याची कांहीच आखणी करतां येत नाही.

लवकर मूल झालें तर त्यामुळे आपल्या सुखांत व्यत्यय येअील अशी कित्येक नवविवाहितांना भीति वाटते. पण हें शहाणपण जरा अुशिराच सुचतें आणि ते मग ' जैसे थे ' च्या प्रयत्नास लागतात. कित्येकांना त्यांच्या शिक्षणाच्या किंवा नोकरीच्या मार्गात अपत्य न येअूं देणें अपरिहार्य असतें. विवाहानंतरच्या पहिल्या दोन-तीन वर्षांत खरोखरच समर्थनीय कारणासाठी अपत्य नको असणें वेगळें आणि त्या बिचाऱ्याची निर्मिति फाजील स्वार्थी हेतूंनी निर्दयपणें टाळणें वेगळें ! त्याचे दुष्परिणाम कधीकधी दार्घ काळ भोगत राहावे लागतात व दुरुस्तीपलीकडेहि नुकसान होअून जातें. मग कितीहि जपजाप्य व अुपासतापास केले तरी त्यांचा अुपयोग होत नाही.

अपत्यें ' किती ' आणि ' केव्हा ' व्हावीं ह्याप्रमाणेंच पाळणा किती वर्षांचा असावा हीहि बाब अत्यंत जिव्हाळ्याची आहे. आओबापांच्या सोयी-पेक्षाहि प्रत्यक्ष अपत्यांचेंच हित त्या सर्वांवर आधारित आहे. पण 'केव्हा'कडे पुरेंसें लक्ष न राहिल्याकारणाने 'किती'चेंहि अवधान राहात नाही, असें वरचेवर घडतें, आणि मग घाअीने सावरून घेण्याचा प्रयत्न केला जातो. जिवाशीं होणारा हा खेळ घातक ठरण्याचा संभव असतो. भोपळा किंवा पडवळ ह्यांचीं अळीं घालतांना बऱ्याच बिया पेरण्यांत येतात व जरूर तेवढ्या चांगल्या अुगवल्या की बाकीच्या अर्धवट रुजलेल्या अुपटून टाकण्यात येतात. मानवी जीवनांत असा प्रकार श्रेयस्कर ठरत नाही. मळ्याचा झडपा अुघडा राहूं देअून आंत घुसणाऱ्या जनावरांना बाहेर पिटाळण्यांत पायमल्लीमुळे मळ्याची नासधूस होते. त्यांना आंत शिरण्यासच प्रतिबंध करून परतविणें हेंच दक्षतेचें खरें लक्षण आहे. दांपत्याने अपत्यांची संख्या कोणत्या रीतीने नियंत्रित केली त्या रीतीवरच शारीरिक स्वास्थ्य व मनःशांति अवलंबून आहे. आणि योग्य रीतीचें ज्ञान जबाबदार तज्ज्ञांकडून वेळींच प्राप्त करून घेतलेलें असलें म्हणजे गोंधळ अुडत नाही. कोणतीहि परीक्षा असो, अुत्तरापेक्षा रीतीलाच जास्त महत्त्व असतें.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर.
अनुक्रम 32909 वि: 1.1.
क्रमांक 7346 नों. वि:

# काटेरी कुंपणें भोवती नकोत !

कांही मित्रमैत्रिणींनी कोजागिरी अेकत्र साजरी करण्याचें योजलें आणि नावीन्य म्हणून प्रत्येकान त्या वेळीं आपल्या नेहमीच्या पोषाखाअैवजी कांहीतरी फॅन्सी ड्रेस करावा असें ठरविलें. पण फॅन्सी ड्रेस आणायचा कुठून, असा बहुतेकांच्यापुढे प्रश्न पडला. कांहींनी नाटकाच्या ड्रेपरीच्या दुकानांतून भाड्याने मुकुट व दाढीमिशा आणून हौस भागविली. कांही जणींनी घागरे, गरारे, सलवार–कमीज पैदा केले. पण लीला–वसंत ह्या दंपतीने सर्वांच्यावर मात केली. ते ब्रह्मी जोडपें बनून आले ! ब्रह्मदेशीय पत्नी असलेला अेक लष्करी अधिकारी त्यांचा मित्र होता, त्यामुळे त्यांना ब्रह्मी पोषाखाबरोबर त्याला अनुरूप केशभूषेचें व रंगसंगतीचेंहि मार्गदर्शन लाभलें.

विजयरावांनी आपल्या मुलीच्या विवाहानिमित्त स्वतःच्या घरीं भोजन-समारंभ केला, त्या वेळच्या पंगतींत वेगवेगळ्या जातींचे, प्रांताचे व भाषांचेच नव्हे, तर भिन्न धर्मांचेहि लोक मांडीस मांडी टेकून आस्वाद घेत होते. स्त्रियांच्या पोषाखांतील वैचित्र्याने समारंभास विशेषच शोभा आली होती. विजयराव-विमलची मित्र-संपदा किती स्पृहणीय होती ! त्या दोघांचाहि दृष्टिकोन वास्तववादी, पुरोगामी होता, म्हणूनच त्यांच्या मैत्रीचें वर्तुळ विस्तार पावं शकलें, हें अुघड आहे. अशा दृष्टिकोनाला व्यावहारिक स्वरूप देण्याच्या मार्गांत

अडचणी कांही कमी नसतात. मुख्य म्हणजे भाषेची. त्यांचा विवाहच आंतर-प्रांतीय असल्यामुळे ते बहुभाषिक होते, म्हणून त्यांना सोपें गेलें, अितरांना जास्त प्रयत्न करावे लागतील, अेवढेंच.

दळणवळण वाढत चाललें, ये-जा होअूं लागली, नोकरी-व्यवसायांच्या निमित्ताने दूरदूरचे लोक अेकत्र येअून कामें करूं लागले, राहूं लागले, म्हणजे गावें, पेठा, वोळ, वाडे आणि चाळी ह्यांचीं जातिलक्षणें कमी होत जातात. शेजारचा बिऱ्हाडकरू आता आपलाच जातभाअी असेल असें नाही. नळावर पाण्यासाठी येणाऱ्या स्त्रियांना भांडणासाठी फक्त मातृभाषाच येअून पुरणार नाही ! आगगाडी, बस अित्यादि सार्वजनिक वाहनांतून जातांना आपला सर्वांशींच संबंध येतो. परप्रांतांत नातेवाअिकांकडे राहावयास जाणा-रांना नवेनवे लोक जवळून बघायला मिळतात. रेडिओ आणि वृत्तपत्रें ह्यांचाहि आपल्यावर परिणाम होत असतो. बाह्य जगाचें आपणांस ज्ञान होत गेलें म्हणजे आपल्याला व्यापक जगांतलें आपलें स्थान कळून चुकतें आणि दृष्टीचा आकुंचितपणा कमी होअूं लागतो. पण मूळ स्वभाव अेकाअेकीं पालटणें शक्य नसल्याने अतिशय मंद गतीने सुधारणा होते. मानसिक तयारी आणि प्रत्यक्ष कृति ह्यांत तफावत पडणें अपरिहार्य असतें. त्यामुळेच विजयरावांच्या घरच्या पंगतीप्रमाणे पंगती घरोघर होत नाहीत.

गट करून राहण्याची, वागण्याची आणि स्वतःपुरतें पाहण्याची सवय अितकी दृढमूल आणि सार्वत्रिक आहे, की ती बदललेल्या परिस्थितींतहि अजून बहुतेकांना चिकटून आहे. भारताच्या नागरिकांतील कुटीर वृत्ति राष्ट्रीयत्वाच्या पुकाराला घातक ठरणारी आहे. अेका दिलाची, अेकाच मनोभावनेने प्रेरित झालेली जनता अजून तयार व्हायची आहे. परदेशीं गेलेले हिंदी विद्यार्थी तेथे-सुद्धा जात, धर्म, प्रांत, भाषा ह्याला अनुसरून स्वतंत्र कोंडाळीं करतात. नोकरी किंवा व्यवसाय ह्यानिमित्त अेकत्र येणारे लोकहि कामावरून सुटतांच आपापल्या बिळांत जातात. पाठीवर बिऱ्हाड असणाऱ्या लष्करी लोकांच्या सामाजिक जीवनांत अशी वृत्ति साहजिकच कमी प्रमाणांत आढळते. थोडक्यांत म्हणजे वेगवेगळे लोक कधी अेकत्र आले तरी त्यांत स्वयंस्फूर्तीपेक्षा अपरिहार्यतेचा आणि कारणपरत्वाचाच भाग जास्त असतो.

बहुतेकांच्या ओळखीत परधर्मीय, परप्रांतीय, परभाषिक थोडेच असतात. मग त्यांच्यांपैकी मित्र होण्याअितपत जवळ आलेले विरळाच. विजयराव–विमल ह्या दंपतीचें अितरांनी अनुकरण केलें तर ओळखी व मैत्री ह्यांत वाढ होअू शकेल. तीं क्लबांत जातात तेव्हा सर्वांच्यामध्ये मिसळतात; कुणाचें अुणें काढीत नाहीत. बाकीचे लोक नव्या सभासदांची अुपेक्षा करतात, त्या वेळीं हीं दोघें मात्र त्यांची विचारपूस करून त्यांना आपलेसे करतात. विमलच्या भगिनी-मंडळाची अेक पंजाबी बाअी सभासद झाली, तिच्याकडे बाकीच्या सगळ्याजणी तुच्छतेने बघायच्या. तिच्या घरीं विवाहसमारंभ होता, तेव्हा विमलला मानकरणीचा मान मिळाला तो अुगीच नाही ! विजयरावांचा स्वभाव अत्यंत खेळाडू असल्यामुळे त्यांच्याभोवती तर सर्वच जण जमतात ! तेथे मनुष्यत्वाखेरीज दुसरा कसलाच प्रश्न येत नाही. विजयराव–विमलने आपले नातेवाअीक, शेजारीपाजारी व मित्रमैत्रिणी ह्यांना डावलून हे संबंध जोडलेले नाहीत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कांही लोक विश्वबंधुत्वाच्या वडेजावासाठी गोऱ्या परकीयांना जवळ करण्यांत धन्यता मानतात; पण सर्व स्वकीयांना मात्र झिडकारतात– त्यांची जातच वेगळी !

अेका सत्यनारायणाच्या समारंभाला मी गेलों होतों, तेव्हा अुपस्थितांत अनेक धर्मांचे व जातींचे लोक पाहून मला अतिशय आनंद वाटला. सर्वांनी कॉफी घेतली, परंतु त्यांपैकी कांही स्त्री-पुरुषांनी आपल्या हातांतील अुष्टचा शिऱ्याच्या बशा ‘ प्रसाद ’ हा शब्द अैकतांच खाली ठेवल्या ! हिंदूच्या घरच्या प्रसादामुळे आपल्याला बाट लागेल, असें त्यांना वाटलें असावें. ह्याच्या अुलट अुदाहरण पाहा. पंढरपूरच्या यात्रेला जाअून आलेल्या काशीबाअींनी आणलेला बुक्का त्यांच्या नातीच्या पार्शी मैत्रिणीने कपाळाला लावून घेतला, अितकेंच नव्हे, तर आपल्या आअीसाठीहि तिने पुडी बांधून घरीं नेली. महालक्ष्मीच्या वोडणाच्या वेळीं आपल्या जातीबाहेरच्याहि कांही सुवासिनींना बोलावण्याची प्रथा विद्याताअींनी पाडली आहे. त्या चैत्री हळदीकुंकवाला तर विधर्मीय स्त्रियांनाहि पाचारण करतात. जात किंवा धर्म ह्यांमुळे कोणाचाहि अनादर होणार नाही, ह्याची त्या विशेष दक्षता घेतात. जात व धर्म ह्यांचीं बंधनें झुगारून देणें श्रीमंतांना सोपें असतें. श्रीमंतांच्या स्वच्छंदी अुपभोगाला तीं बंधनें नकोच

असतात मुळी ! पण सामान्य लोकांनी पुढे पाऊल टाकण्यास निष्ठा व धैर्य लागतें.

आपल्या मित्रमंडळींच्या वर्तुळांत वेगवेगळ्या प्रकारचे लोक असणें व्यावहारिक दृष्ट्या कसें हितावह असतें पाहा. सुधाताअी हिंदी शिक्षक सनद परीक्षा पास झालेल्या होत्या; पण त्यांना हिंदीमध्ये बोलण्याचा सराव नव्हता. त्यांनी आपल्या शेजारच्या सौ. श्रीवास्तव ह्यांच्याशीं मैत्री करून त्यांच्याशीं हिंदीमध्येच बोलण्याचा परिपाठ ठेवला. त्यामुळे हिंदी माध्यम असलेल्या शाळेंत शिक्षिका म्हणून त्यांची निवड होअू शकली. रामभाअूंची तारेने मद्रासला बदली झाली, तेव्हा तेथे स्वत:चें बिऱ्हाड थाटेपर्यंत ते कृष्णमूर्तीकडे राहू शकले. त्यांचा हा तमीळ मित्र पुण्यास असतांना पत्ते खेळायला त्यांच्याकडे नेहमी येत असे. रमण युरोपच्या प्रवासाला गेला, तेव्हा त्याचा मित्र डेव्हिड ह्याच्या मदतीमुळे ठिकठिकाणच्या वाय्. अेम्. सी. अे.च्या होस्टेलमध्ये त्याची थोडक्यांत सोय झाली. सुशीलाबाअींच्या प्रदीर्घ आजारीपणानंतर डॉक्टरांनी त्यांना मांसाहाराचा सल्ला दिला. त्यांची मैत्रीण गुलनार हिला हें कळतांच ती स्वत: मटणाचे वेगवेगळे रुचकर पदार्थ करून पाठवूं लागली. जुन्या वळणाच्या पूर्णपणें शाकाहारी असलेल्या सुशीलाबाअींना पिढीजाद मांसाहारी मैत्रिणी वर्ज्य नव्हत्या म्हणूनच हें होअू शकलें; अवघड दुखण्यांतून यशस्वी रीत्या बाहेर पडण्यास त्यांना आपला विशाल दृष्टिकोन अुपयोगी पडला.

असा प्रत्यक्ष फायदा प्रत्येकाला होअीलच असें नाही. पुष्कळांना त्याची गरजहि भासणार नाही. पण परिचयाचें व मैत्रीचें वर्तुळ विस्तृत असणाऱ्या सर्वांनाच कितीतरी अदृश्य फायदे होत असतात. त्यांना व्यापक जगाची प्रचीति सहजगत्या होते, प्रवास न करतांहि नव्यानव्या गोष्टी कळतात, प्रत्येक प्रश्नाच्या अितर बाजू लक्षांत येतात, अज्ञानामुळे बसणारे आश्चर्याचे धक्के टळतात, अधिक चांगले शेजारी व नागरिक म्हणून राहतां येतें, समाजाचे जबाबदार घटक बनून राष्ट्रीयत्वाच्या भावनेस हातभार लावल्याचें श्रेय मिळतें. घर-कोंबड्यांनी कूपमंडूक वृत्ति सोडून चारचौघांना जवळ केलें तरच त्यांतून स्नेहभाव निर्माण होण्यास वाव राहणार !

तेव्हा, आपण आपल्याभोवती तारांचीं कुंपणें न अुभारतां सामाजिक दळणवळणास वाट करून देअूंया ! ह्याचा अर्थ "आवो जावो, घर तुम्हारा" असा मात्र नाही. स्वत्त्व न सोडतां आणि स्वतःचें कुल, शील, शिक्षण, राहणी, परंपरा ह्याबद्दल दुरभिमान न दर्शवितां हें दळणवळण सुकर करावयाचें आहे. परराष्ट्रीय व्यापार वाढविण्याचा आटोकाट प्रयत्न करणारे देशसुद्धा नको ती ये–जा थांबविण्याची दक्षता घेतात आणि जरुरीप्रमाणे संरक्षक निर्बंध घालतात हें आपण पाहतोंच. कोणीहि अुतारू म्हणून अुतरावें व घर करावें किंवा घर धुअून न्यावें, असें चालत नाही. कित्येकांच्या घराच्या दरवाजावर 'सुस्वागतम्' अशी पाटी लावलेली असते; परंतु आंत येण्याची परवानगी नाकारण्याच्या हक्कास त्यानें बाध येत नाही. अुपऱ्या माणसांना कांही अंतरगृहांत प्रवेश मिळत नाही. सामाजिक दळणवळणाच्या प्रोत्साहनासहि हाच नियम लागू आहे.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वागत
अनुक्रम 32 CO
क्रमांक 2306 दि: 1-1-9-55
नों क्र. 21214

REFBK-0011512

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
दा. क्र. 11512

# उद्बोधक पुस्तकें

११. **छोटयांची ओळख**– लेखक– डॉ. श्री. वि. केळकर. किंमत रु. १–५० न. पै., ट. ख. सह रु. २–१२ न. पै.

१२. **लोकभ्रम कसे नाहीसे होतील?– विज्ञानाने!** – लेखक बा. रं. सुंठणकर. किंमत रु. १–२५ न. पै., ट. ख. सह रु. १-९४ न. पै.

१३. **रेखाचित्रें**– लेखक व चित्रकार– श्री. ना. कुलकर्णी. किंमत. रु. ५, ट. ख. सह रु. ६–१२ न. पै.

१४. **दाजी**– ( भाग १ ) लेखक– ना. धों. ताम्हनकर. किं. रु. ५, ट. ख. सह रु. ५–८७ न. पै.

१५. **पाळण्यापासून शाळेपर्यंत**–मुलांची निगा कशी राखावी यासंबंधी तज्ज्ञांचे माहिती-पूर्ण लेख. किं. रु. ३. ट. ख. सह ३–८१ न.पै.

१६. **आपलें व्यक्तिमत्व कसें सुधाराल?**– लेखक– डॉ. श्री. वि. केळकर. किंमत रु. १-५० न.पै., ट. ख.सह रु.२–१२न.पै

१७. **यांत्रिकाची यात्रा**– श्री. शं. वा किर्लोस्कर यांनी लिहिलेलें कै. लक्ष्मण राव किर्लोस्कर यांचें नमुनेदार चरित्र किं. ५ रु. ट. ख. सह रु. ५–९२ न. पै

१८. **रविवार ते रविवार**–(लघु कादंबरी ) लेखक– शरच्चंद्र टोंगो. किं. रु. १–५० न. पै. ट. ख. सह रु. २–१२ न. पै.

१९. **ज्योति**– ( कथासंग्रह ) लेखिका– कै. सौ. आनंदीबाअी किर्लोस्कर. किं. ४ रु., ट. ख. सह रु. ४–८१ न. पै.

**किर्लोस्कर प्रेस, स्वार गेट, पुणें २.**